# साप्ताहिक माणूस



घरघर

पश्चिमरंग

पूर्णांक अपूर्णांक

लग्न नावाचं खग्रास ग्रहण

तू लग्न का करत नाहीस?

अमेरिकेत डोकावल्यावर

वासंतिक विशेषांक मालिका : दोन

किंमत : पाच रुपये

साप्ताहिक

# माणूस

□

वर्ष : बाविसावे

अंक : पन्नासावा

[ वासंतिक विशेषांक मालिका
अंक दुसरा ]

□

१४ मे १९८३

किंमत : पाच रुपये

□

संपादक

श्री. ग. माजगावकर

□

सहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

□

वार्षिक वर्गणी

पन्नास रुपये

□

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

□

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

□

: पत्ता :

साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव, पुणे ३०


दूरध्वनी : ४४३४५९

□

मुखपृष्ठ व आतील चित्रे :

संजय पवार

**माणूस : वासंतिक विशेषांक मालिकेतील पुढील आठवड्यात प्रसिद्ध होणाऱ्या तिसऱ्या विशेषांकात–**



# हसऱ्या गॅलरीतले शि. द. फडणीस

गेली वीस वर्षं व्यंगचित्रांच्या क्षेत्रांत आपल्या वेगळ्याच अतिप्रसन्न शैलीचा भक्कम ठसा उमटवणाऱ्या शि. द. फडणिसांची दिलखुलास मुलाखत आणि त्यांचीच खेळकर व्यंगचित्रे.

# शिवाय

## टेनिसच्या साम्राज्यातला अनभिषिक्त सम्राट

बियॉन बोर्गवरील विशेष लेख

'ब्लड कॅन्सर,' 'गोंडा जिल्ह्यातील मुक्त भ्रमंती'–पुढील भाग आणि 'पाया हादरलेली घरे' या विषयावरचे काही विशेष लेख–अनुभवकथने.

खूनखूनखून

भय चिंता घबराट
अफवा, धमक्या
समज गैरसमज
बातम्या उलट्या
सुलट्या

पकडले!
खूनी पकडले

कोर्टात हजर
गुन्हा शाबित
शिक्षा
फाशी!

अपील फेरअपील
अर्ज रिटअर्ज
विनंती दयामाया
कायदेकानून
आलटूनपालटून

फेटाळणी फेटाळणी
फेटाळणी फेटाळणी

अंमलबजावणी

## स्थगिती ! स्थगिती !

गाडीची गती तीच होती. वेळही नेहमी-चीच होती. गाडीचे थांबे तसेच मोजके होते; पण तरीही दख्खनच्या राणीचा दिमाख नेहमीचा नव्हता. पासधारकांच्या डब्यात नेहमीची जागेसाठी चालणारी धडपड नव्हती भोजनालयाच्या सेवकांची लगबग नव्हती. जवळजवळ सारी गाडी रिकामीच होती. राणी सकाळी नेहमीप्रमाणे भरभरून आली होती. मग संध्याकाळी असे का ?

भोजनालयातील व्यवस्थापकांशी मी चर्चा करू लागलो. 'असं आहे साहेब, सकाळचा गल्ला नेहमीइतकाच म्हणजे दोन-अडीच हजारांपर्यंत जातो; पण सारी प्रवासी मंडळी मद्रास एक्सप्रेसनेच पुण्याला पळतात. पाचशे रुपयांचा गल्ला जमला तरी खूप झाले. गेले. दोन महिने हीच परिस्थिती आहे. अंधार पडायच्या आत जो तो घरी पोचायला उत्सुक असतो. किती दिवस हे चालणार कुणाला माहीत !'

¤

'भटसाहेब आहेत का घरात ?'

'नाही, बाहेर गेलेत. दुपारी चार वाजे-पर्यंत येतील.'

'ठीक आहे मी चार वाजता परत येतो.'

'काही निरोप असला तर मला सांगा. मी त्यांना नक्की सांगेन.'

'नाही तसं काही विशेष काम नव्हतं, मला एक चांगल्यापैकी कुत्रं पाहिजे होतं.'

'सध्या कुत्री शिल्लकच नाहीत हो. हल्ली कुत्री व्यायच्या आत लोक येऊन सांगून ठेवतात. नंतर कुत्री घेऊन जातात. पंचवीस एक जणांची यादी अगोदरपासूनच तयार आहे; पण पूर्वीसारखं हल्ली लोक आमच्या-तर्फे कुत्री विकतच नाहीत.'

कुत्रं कसंही असलं तरी चालेल हो. गावठी सुद्धा चालेल; पण तीन चार महिन्यांचे असले पाहिजे. आम्ही कांचनगल्लीत राहतो ना ! जरा एका बाजूला घर आहे म्हणून काळजी वाटते. बघा काही तरी. भटसाहेब आले की, त्यांच्या कानावर घाला. मी संध्या-काळी पुन्हा येतो.'

¤

डिसेंबर ७६ ची अखेर जवळ येऊ लागली. कारखान्यातील दुसऱ्या पाळीची गैरहजेरी रोजच्या रोज वाढू लागली. कोणा-लाही रोजच्या कामाचा एखादे वेळेस कंटाळा येणारच. एखाद्या दिवशी एखाद्या कामगाराने दांडी मारणे काही विशेष नव्हते; पण परवा

चार, काल सहा, आज बारा. दुसरी पाळी बंद करायची वेळ आली. मग गैरहजर कामगारांना कारणे द्या नोटीस दिली.

'साहेब, कारणे द्या नोटीस मागे घ्या आणि दुसरी पाळी बंद करा.'

'अरे, अशी बंद कशी करता येईल? काही अडचणी असल्या तर सांगा; पण परस्पर ठरवून गैरहजर राहता. असे कसे करता येईल?'

'दुसऱ्या पाळीची आम्हाला धास्ती वाटते साहेब.'

'अशी कशी धास्ती वाटते? चांगले पंचवीस तीस कामगार एकत्र असता. दोन-दोन वॉचमन असतात. रस्त्यावर सध्या जोरदार गस्त चालू आहे. काही होत नाही. दुसरी पाळी बंद होणार नाही.'

'आम्हाला इथे काम करायला किंवा घरी जाताना धास्ती वाटत नाही साहेब; पण घरच्या माणसांच्या सुरक्षिततेची धास्ती वाटते. काय व्हायचे ते सगळ्यांचे एकदम होऊ दे. तुम्ही जर दुसरी पाळी बंद करणार नसाल तर आम्हाला काम नको. कामावरून कमी करा. रितसर नुकसानभरपाई द्या. परिस्थिती सुधारली की पुन्हा कामावर येऊ.'

¤

माझ्या कार्यालयात मी बसलो होतो. एकाएकी दरवाजा उघडून दोन पोलीस आत आले.

'आमचे साहेब खाली आले आहेत. तुम्हाला खाली बोलावत आहेत.'

आणीबाणीचे दिवस होते ते. मी दचकलोच. सरकारला नको असलेली मित्रमंडळी भेटून जात. फोन करत. मी चांगलाच हादरलो.

'तुमच्या साहेबांना सांगा पाच मिनिटात खाली येतो.'

तातडीने मी माझ्या इतर अधिकाऱ्यांना बोलावणे पाठवले. ते यायच्या आतच माझ्या कार्यालयाचे दार पुन्हा उघडले गेले.

'नमस्कार, मी इन्स्पेक्टर वाकटकर.'

मीही नमस्कार केला; पण माझी धास्ती त्या निष्णात अधिकाऱ्याच्या नजरेतून सुटली नाही.

'बसा, बसा, मी पोलीसखात्याचा असलो तरी 'तसल्या' कामाकरता आलो नाही. मला थोडी माहिती हवी आहे. २२९, जरा खाली जाऊन गाडीतली शिडी घेऊन या.'

२२९ ने शिडी आणली व भिंतीला टेकून ठेवली. चार-साडेचार फूट उंचीची पाइप-मधून बनवलेली शिडी होती ती.

'अशा शिड्या बनवता का?'

'बनवू की; पण एखाद दुसरी असेल तर नाही बनवणार.'

'कोणाकडे बनवून मिळेल? एकच हवी आहे म्हणून विचारतो.'

'तुम्ही भवानीपेठेत अथवा गंजपेठेत जा. ताबडतोब बनवून मिळेल.'

'ज्याला जोडकाम करता येते तो ही बनवू शकेल.'

'अशा शिड्या कोण कोण बनवतं?'

'कर्वेरोडच्या कारखान्यात अथवा तुमच्याकडे ही बनवली गेली नाही, असं तुम्ही कशावरून म्हणू शकता?'

'तुम्ही जे कारखाने म्हणत आहात ते दोनही कारखाने स्वतःचा काही दर्जा सांभाळतात. या शिडीचा पाइप पहा. याचे टोक तोडल्यासारखे दिसते आहे. आमच्याकडे ते घासूनच मग जोडले जाते. जोडकाम करताना वापरलेल्या पावडरच्या या कपच्या पहा. या कपच्या काढून टाकल्याशिवाय माझा कामगार त्याला रंग लावणारच नाही. हे काम कोणत्याही दर्जेदार काम करणाऱ्या कारखान्यात झालेलं नाही.'

'भवानी गंजपेठेत अशी किती दुकाने असतील?'

'अक्षरशः शेकडो असतील. ट्रक दुरुस्तीचे काम तिथं चालतं ना? शिवाय भंगार मालाचा व्यापारही तिथेच चालतो. या पाइपाला गंजून गंजून भोके पडली आहेत. त्याअर्थी हा पाइप भंगार मालातूनच घेतला आहे.'

'बराय, मग निघतो आता. तुमचा फारच आभारी आहे.'

'गैरसमज करून घेऊ नका; पण एक प्रश्न विचारू का?'

'जोशी-अभ्यंकर खुनातील आरोपींचा तपास लागला का हेच विचारणार ना तुम्ही? त्यालाही माझं उत्तर ठरलेलं आहे बरं का. थांबा आणि पहा. बराय येतो.'

आले तसे डुलतडुलत वाकटकर आणि २२९ निघून गेले. रात्री घरात साऱ्यांना ही हकीकत रंगवून रंगवून सांगितली.

¤

पहाटे साडेपाचला जागा झाला तो शेजाऱ्याच्या किशोरच्या मोठमोठ्याने केलेल्या आरडाओरडीने. सारी कॉलनी पाच मिनिटात रस्त्यावर आली. ठळक अक्षरांत बातमी होती. जोशी–अभ्यंकरांच्या खुन्यांना अटक. वाकटकर-पेंडसे जोडगोळी पुन्हा यशस्वी.

¤

पण या यशावर, अंमलबजावणीचं शिक्कामोर्तब अजून लांबतंच आहे. न्यायालयाने पुन्हा स्थगिती दिली आहे. आणखी किती काळ हे चालणार, कोणास ठाऊक! तोपर्यंत सगळ्यांच्याच डोक्यावर टांगती तलवार – खुन्यांच्या आणि पुणेकरांच्याही!

–रमेश जोशी


# जी. बी. पेंडुरकर आणि कंपनी

ज्युवेलर्स


न. चिं. केळकर मार्ग, दादर, मुंबई–२८

टेलिफोन : ४२२९३१६

*With Best Compliments From :*

# KAY INDUSTRIES

227, Rasta Peth
Pune 411 011



# मुखवटे थोडे बाजूला करून..

'पाया हादरलेली घरं'. या विषयाचा मथळाच फक्त बोलका. या संदर्भात तुम्ही कोणाला बोलतं अगर लिहितं करायला लागलात तर सगळे चिडीचुप ! कारण घरातली भांडणं, मतभेद वेशीवर नेऊन टांगू नयेत ही आपली संस्कृती. नवरा-बायकोचे मतभेदही असेच.

बाहेरच्याला कळू नयेत म्हणून दबल्या आवाजात विझणारे. या दबलेल्या वातावरणातूनच एक स्फोटक रसायन तयार होतं, ते कधी पेट घेईल ते कोणालाच सांगता येत नाही.

हे दबलेलं वातावरण तयार होत रहातं याचं कारण आपल्यातच आहे. यशस्वी संसार करणारी जोडपी म्हणून समाजात मिरवण्यासाठी दोन हसरे मुखवटे लग्नाच्या अक्षता पडण्याआधीच समाजानं भेट दिलेले असतात. तुमचं काम फक्त मुखवटे सांभाळणं !

हे मुखवटे थोडे बाजूला करून खरा चेहरा पाहण्याचा या वासंतिक अंक मालिकेत अंकात केला आहे. हा प्रश्न आपल्या सगळ्यांच्या अतिशय जवळचा आणि म्हणूनच शब्दबद्ध करायला अवघड. हे अवघड काम या विषयासाठी लिहिणाऱ्या सर्व लेखक–लेखिकांनी जबाबदारीनं पेललं. एका नाजूक प्रश्नावर चांगली चर्चा व्हावी व घर आणि घरातली माणसं या संकल्पनेबाबतचा एक पुनर्विचार केला जावा हे या प्रयत्नामागील उद्दिष्ट.

विनया खडपेकर यांची 'अधांतरी' ही कथा तसा विचार करायला लावणारी आहे.

तीच गोष्ट इतर लेखांची.

आपली घरं डळमळीत होण्यापाठीमागचं मुख्य कारण म्हणून सरधोपटपणे पश्चिमेकडच्या वाऱ्यांचा उल्लेख केला जातो. हा वारा खरंच नेमका कसा आहे ?

तरुण पिढीचे स्वैर विचार आणि आचार हे ही घरातल्या वातावरणावर फार जवळून परिणाम करतात. संजय पवार, डॉ. शुभदा शेळके यांचे लेख त्या दृष्टीनं खूपच बोलके आहेत.

लग्न नावाच्या खग्रास ग्रहणामुळे होरपळलेली सुशीला पाठक आणि हे होरपळणं टाळण्यासाठी घेतलेला ठाम निर्णय हे ही याच अंकात ! या विषयावरचे काही लेखच या अंकात प्रसिद्ध झाले आहेत. बाकी लेख पुढील अंकात.

असं वाटतं की घर बांधतानाच पाया भक्कम आहे की नाही हे बघायला नको का ? डळमळीत पायावर उभी असलेली घरं किरकोळ वादळवाऱ्यानंसुद्धा उन्मळून पडतात. हे मोडून पडणंच कदाचित नवीन चांगल्या जीवनाची सुरुवात असते, ही शक्यता लक्षात घेऊनच या विषयाची सुरुवात...


# अधांतरी

सकाळी आठचा सुमार होता. पूर्वेच्या बाजूनं ऊन फ्लॅटमध्ये शिरत होतं. गॅलरीच्या खुर्चीवर मृदुला बसली होती. समोरच्या टीपॉयवर दुधाचा कप होता. मघापासून दूध विनीतला प्यायला लावताना ती अगदी हैराण झाली होती. शेवटी अर्धे दूध पिऊन झाल्यावर साय आली म्हणून विनीत थुंकू लागला तेव्हा मृदुलेनंच कंटाळून माघार घेतली. विनीत आपल्या चेंडूच्या मागं दुडूदुडू धावू लागला. मग खुर्चीत आरामात टेकून मृदुला बसून राहिली. दुसऱ्या मजल्यावरच्या त्या फ्लॅटच्या गॅलरीत या ठिकाणी बसून बघितलं की, डाव्या बाजूला कॉलेजच्या मैदानातले मुलांचे खेळ दिसायचे. उजव्या बाजूला फ्लॅटच्या हॉलच्या भिंतीवर लावलेली सुंदर निसर्ग-चित्रं दिसायची. स्वयंपाक घरातले आवाज ऐकू यायचे. किंचित वळून पाहिलं की, गॅलरीच्या दोन्ही बाजूंच्या बेडरूममधल्या माणसांशी बोलता यायचं. सतीश नेहमी म्हणायचा, बघ किती छान जागी आहे आपला फ्लॅट ! समोर सगळं मोकळं मैदान म्हणजे मोठ्या मोठ्या इमारती होऊन माणसांची गर्दी होण्याची भानगड नाही. सतीशला गर्दीचा अगदी तिटकारा ! अमेरिकेत कुठं, कसं घर निवडलं आहे कोण जाणे ! आतापर्यंत तीन-चार घरं बदललीन. आता आहे ते सगळ्यात छान आहे म्हणतो. घर सुंदर असणारच फोटोत दिसतच होतं सुंदर सतीशला सुंदर मोठ्या जागेचा हव्यासच फार. इथंच नाही का त्याचा आग्रह चालला होता विनीतचा चेंडू चांगला धपकन् तिच्या पोटात बसला आणि तिची तंद्री एकदम भंग पावली. 'काय रे हे तुझं !' डोळे वटारून ती बोलली. तिनं चेंडू पकडून ठेवला. उत्तरादाखल विनीतनं तिला जोरात चापटी मारली मृदुला हसली. तिनं त्याचा एक गालगुच्चा घेतला आणि चेंडू देऊन टाकला. ऊन आता अर्ध्या गॅलरीभर पसरलं होतं. तिच्या अगदी अंगावर आलं. तिनं बाजूच्या भिंतीवर पाहिलं. फिकट हिरव्या रंगाचा चौकोन भिंतीवर उमटला होता. तिनं पुन्हा निरखून पाहिलं. मग तिच्या लक्षात आलं, तिच्या अंगावरचा रेशमी पोपटी रंगाचा गाउन ऊन पडल्यामुळं झळाळत होता. त्याचाच परावर्तित प्रकाश भिंतीवर पडला होता. सतीशनं अमेरिकेतून पाठविलेला गाऊन. तिला आता पुन्हा इच्छा झाली त्या हाउसगाउनमधील स्वतःची छबी परत आरशात पहावी. ती उठली. बेडरूममधल्या कपाटाच्या मोठ्या आरशापुढं जाऊन उभी राहिली. आत विमलाबाई स्वयंपाकाच्या मागे होत्या. बाहेर हॉलमध्ये तात्या वर्तमानपत्र वाचीत होते. सुलभा आंघोळीला गेली होती. शिरीष अजून ड्यूटीवरून आला नव्हता. मृदुलेनं डोळे भरून आरशातल्या स्वतःच्या छबीकडे पाहिलं. गोरी गोंडस शरीरयष्टी सळसळीत पोपटी गाउनमध्ये जशी काही बुडून गेली होती. त्यावरच्या जांभळ्या, गुलाबी बारीक ठिपक्यांची पखरण अगदी अंधुक हेलकाव्यालाही क्षणोक्षणी नाचत होती. गाउनची पोपटी

## विनया खडपेकर

रेशमी गोलकडा गोऱ्या गळ्याला अलगद बिलगून बसली होती. तिच्यातून निघालेल्या मुलायम चुण्याचुण्या अलगद खाली पसरत शरीराला खुलावट देत होत्या. पंखासारख्या पसरलेल्या तिरप्या रेशमी झालरींनी दंड थोडेसेच झाकून नितळ गोरे हात आणखीच मोहक केले होते. ठिपक्या-ठिपक्यांचा तो पोपटी रेशमी पसारा नक्षीदार इलॅस्टिकनं





कमरेभोवती जरा आवळून धरला होता आणि मग झोकात फुलवून, पावलं अगदी बुडून जातील इतका लांब चौफेर सोडून दिला होता. मृदुलेला इंग्लिश चित्रपटातल्या बायकांची आठवण झाली. टाचा उंच करून तिनं रुबाबात एकदोन पावलं टाकली. ती आपल्याशीच खुदकन् हसली. गोरे टपोरे गाल क्षणभर आणखीच फुलले. कानातल्या रिंगस् मजेत झुलल्या. कमरेपर्यंत रुळणारे मोकळे केस हळूच थरथरले. भुवयांच्या कमानी किंचित उंचावल्या. मृदुलेनं स्वतः-च्याच गालावर टिचकी मारली. बरोबर सतीश मारायचा तशीच. सतीश नेहमी म्हणायचा. तुझे गाल अगदी लहान मुला-सारखे आहेत–ग्लॅक्सो बेबीसारखे ! हे आठ-वून मृदुला पुन्हा अस्फुट हसली. सुलभानं येऊन कपाट उघडलं तेव्हा मृदुला भानावर आली.

'अं ! अग, झाली तुझी वेळ कॉलेजला जाण्याची ?' ती म्हणाली.

'तसा अवकाश आहे ग ! पण ड्रेस बघून ठेवते कोणता घालायचा तो ! छान दिस-तोय वहिनी, हा गाउन तुला अगदी!' सुलभा बोलली.

'पहिल्यांदा घातला तेव्हा तू पाहिला नव्हतास ना ? धुतलासुद्धा ! तरी अगदी जस्साच्या तस्सा आहे बघ !' मृदुला कौतु-कानं बोलली.

घड्याळात नऊचे ठोके पडले. मृदुलेनं मनात म्हटलं, बाप रे ! आईंचा स्वयंपाक झाला असेल. पटकन् वेणी गुंडाळून तात्यांचा डबा भरायला गेलं पाहिजे आणि त्या म्हशा-लाही पाण्यातून बुचकळून काढायला हवा ! तिनं हाक मारली, 'विदुड्या !'

दाराला असलेल्या लेटरच्या फटीतून जाड पाकीट आत पडलं. तात्यांनी ते दुरूनच ओळखलं, अमेरिकेतून आलेलं सतीशचं पत्र. त्यांनी आत हाक दिली, 'सुले, मृदुला, सतीशचं पत्र आलं आहे !' वर्तमानपत्र बाजूला ठेवून ते घाईने उठले. पाकीट हातात घेऊन, कुठे खराब होणार नाही, वरची तिकिटं फाटली जाऊ नयेत अशा बेतानं फोडू लागले.

आरशापुढं उभं राहून केस विंचरणारी मृदुला हातातला कंगवा तसाच टाकून धावत बाहेरच्या खोलीत आली. तात्या पाकीट फोडीतच होते. मृदुलेला तेवढे दोन क्षण काही धीर निघत नव्हता. ती उगीचच आपल्या मोकळ्या केसांची गुंडाळी बोटां-भोवती करीत होती आणि सोडीत होती. तात्यांनी पाकीट फोडलं तसा पटकन् एक फोटो खाली पडला. मृदुलेनं त्या फोटोवर झडप घातली.

'अय्या ! सुले, फोटो !' ती हर्षभराने चीत्कारली.

'अय्या ! होऽऽ ! वहिनी, या वेळीही फोटो पाठवले दादांनी ?' बेसिनपाशी नॅप-किन ठेवीत सुलभाही पॅसेजमधून आनंदानं किंचाळली.


'तेच [ना ! अग, बरेच दिसताहेत !' तारसप्तकात मृदुलेनं पुन्हा आवाज दिला.


पडदा बाजूला सारून सुलभा बाहेरच्या खोलीत आली.

'दादाचं पत्र आल्याचं मला जिना चढ-ताच कळलं ग वहिनी !' घरात शिरत शिरीषनं म्हटलं. उत्तरादाखल मानेला हिसका देऊन मृदुला हातातला फोटो पुन्हा पाहू लागली. विमलबाईंनी गॅस बंद केला. 'विदुड्या कुठं गेला. बाबांचं पत्र आलं म्हणावं !' असं बोलत त्याही बाहेर आल्या. सतीशचं पत्र आलं. त्याभोवती सगळं घर गोळा झालं. सतीशनं प्रत्येकाच्या नावाचं एकेक पत्र लिहिलं होतं. मृदुलेच्या नावाचं एक स्वतंत्र पाकीट होतं. शिवाय किती तरी फोटो होते. सतीशचे एकट्याचे आणि इतरां-बरोबरचे. तात्यांनी मृदुलेचं पाकीट तिच्या हातात दिलं. तिनं एकदा पाकिटाकडे पाहिलं आणि एकदा फोटोंकडे. तिला पटकन सुचे-चना, आधी फोटो पहावेत का आधी पत्र वाचावं ? हातात पाकीट तसंच धरून ती फोटो पाहू लागली. तिने एक-दोन फोटो पाहिले; पण मग ती आत पळाली. पलंगा-जवळ उभे राहून तिने गरकन् गिरकी घेतली. हातातलं पाकीट फोडलं. क्षणात तिचे डोळे भरून आले. हा हा म्हणता दोन वर्षं होऊन गेली सतीशला जाऊन ! तिन डोळे टिपले आणि पत्र वाचू लागली. सतीशचं पत्र नेहमी-सारखंच छान होतं. त्यात त्यानं लिहिलं होतं, 'सॅनफ्रॅन्सिस्कोला जाऊन आलो. तिकडच्या उंच उंच बिल्डिंग अगदी वैशिष्ट्य-पूर्ण. घरं मात्र बहुतेक लाकडाची आणि जवळजवळ; अगदी गळ्यात गळे घातल्या-सारखी ! थंड हवेमुळं सगळी बंदिस्त इकडची ही गंमत आहे, घर बंद आणि बायका मात्र उघड्या ! हसत हसत मृदुला पुढे वाचत होती– 'रस्त्यावर जागोजाग चित्रकार बसलेले असतात आणि ते तुमचं real prortrait किंवा funny portrait करून देतात. एक इंडियन मुलगी छान स्कर्ट-ब्लाऊजमध्ये होती. तर त्या चित्रकारानं तिला पोर्ट्रेटमध्ये बसवताना बिकिनीतच बसवलं ! ती बिचारी लाजेनं चूर झाली... 'संध्याकाळी त्या खेडेवजा गावातून पायी एकटाच फिरत होतो. रस्त्यावर झाडी बरीच होती. अगदी तुझ्या कोल्हापूरहून आपण जवळच काकांच्या मळ्यावर गेलो होतो ती आठवण झाली. फक्त इकडे भोवतालच्या घराघरांतून roosted meat चा वास येत होता आणि तिकडे भाकरी भाजण्याचा वास येत होता. ती भाकरीचा वास नाकात गेला

आणि इतकी तुझी आठवण झाली मृदुला, की अगदी...' मृदुलेच्या काळजात गलबललं. डोळ्यातला एक थेंब टपकन् पत्रावर पडला. तिच्या मनात आलं, ग्रीन कार्ड, पासपोर्ट, व्हिसा यंव नि त्यंव ते मारुतीचं शेपूट एकदाचं संपलं. तर आता मावशीच्या घरी लग्न ! पुढचं पत्र तिनं कसंबसं संपवलं आणि पलंगावर बसून ती अगदी मुसमुसून रडू लागली. इतक्यात विनीत आत आला आणि तिच्याकडे टकमक बघत उभा राहिला. तिने उशीच्याच अभऱ्याला घाईनं डोळे पुसले आणि त्याला हाताला धरून ती झटकन् बाहेर आली.

सगळेजण फोटो पहात होते. टी. व्ही. जवळ बसलेला हसरा सतीश, बागेत उभे राहून टाटा करणारा सतीश. क्षणभर तिची तंद्री लागली. ती तिच्या अमेरिकेतल्या सुंदर घरात खिडकीशी उभी होती आणि ऑफिसमध्ये जाताना सतीश टाटा करीत होता. 'काय कार सुंदर ग वहिनी !' सुलभाच्या बोलण्यानं ती भानावर आली. काळीशार लांबलचक कार हिरव्या लॉनपाशी उभी होती. पांढरीशुभ्र पॅंट आणि गुलाबी रेघारेघांचा फुल स्लीव्हज्‌चा शर्ट घातलेला सतीश जवळ रुबाबात उभा होता. बघता बघता तिच्या मनात आलं, ती कार, ते लॉन, तो सतीश हे सगळं सगळं माझं आहे. फक्त माझं ! बाकी कुणाचं नाही. कारण मी त्याची बायको आहे. तत्क्षणी ती अगदी रोमांचित झाली. 'खरंच किती ग छान !' ती हरखून स्वतःच्याच नादात बोलली. फोटो तळहातातून फिरत होते. नायगाऱ्याजवळचे फोटो, सॅनफ्रॅन्सिस्कोच्या चौकातले फोटो, कर्णिकांच्या फॅमिलीबरोबर ट्रिपला गेला होता तिकडचे फोटो. या वेळी कर्णिकांच्या फॅमिलीबरोबरचे किती तरी फोटो होते. आधीच्या पत्रातून कर्णिक माहिती झालेच होते. आता त्यांचे फोटो दिसत होते. त्यांच्या मोठ्या डायनिंग टेबलभोवती सगळेजण. मिस्टर कर्णिकांबरोबर टेबलटेनिस खेळताना सतीश. त्यांच्या दोन्ही मुलांच्या गळ्यात हात टाकून सतीश. मिसेस कर्णिकांकडून चहाचा कप हातात घेताना सतीश. 'काय मिसेस कर्णिक छान दिसतात ग आई! त्यांची साडी पण ...' 'आपले इतके लोक गेले आहेत तिकडे की, आता पूर्वीसारखं होमसीक 'वगैरे वाटण्याचा प्रश्न नाही. 'मला वाटतं आपल्या अगदी ओळखीतलेच दहा–पंधराजण निघतील आणि थरू थरू ओळखी काढल्या तर अगदी हव्या तेवढ्या निघतील !' असे बोलत फोटो पाहिले जात होते. गुळगुळीत, रंगीत एकापेक्षा एक सुंदर फोटो. त्यात दिसणारं चकचकीत फर्निचर ! बघता बघता प्रत्येकजण तृप्त होत होतं. मृदुला मात्र तृप्त होत नव्हती तर अधीर होत होती. कारण इतरांसाठी ते सगळं जग





दूर होतं. अगदी चंद्राइतकं दूर नव्हतं; पण अमेरिका अमेरिकेइतकं खासच दूर होती. तर ते सगळं वैभव मृदुलेच्या अगदी हाताच्या अंतरावर आलं होतं. आता कोणत्याही क्षणी ती विमानात बसणार होती आणि अल्लाद त्या जगात जाऊन पडणार होती – पूर्वेतून पश्चिमेला ! उष्ण हवेतून थंड हवेत ! काळ्या जगातून गोऱ्या जगात ! कुठून येऊन कुठच्या कुठं ! सतीशचा हात धरून. आपल्या सौभाग्याच्या अभिमानानं ती फुलून आली. 'सतीश !' 'सतीश !' तिच्या मनानं साद घातली. 'मृदुल ! मृदुल !' पत्रातले शब्द तिच्या कानात घुमले. मृदू, तू इकडे आलीस की –' 'मृदुल, तुला हे खूप खूप आवडेल –' ' मी अगदी नक्की ठरवलंय मृदुल ' – 'तुझ्या विचारांनी ते ठरवू या मृदुला ' सतीश प्रत्येक पत्रात तिला लिहीत होता. त्या शब्दाशब्दातून मृदुलचा अहंकार सुखावत होता.

सुलभानं कॉलेजला जायची तयारी केली. तात्याही ऑफिसला जायला निघाले. शिरीषनं घाईघाईनं जेवण उरकून हॉलमधल्या दिवाणवर ताणून दिली. घर रिकामं झालं. विनीतची आंघोळ उरकून मृदुला त्याला जेवण घालू लागली. 'विदुड्या, बाबांचे फोटो पाहिले का रे तू ? कसे छान छान आहेत !' विमलाबाई थोडासा सुधारस त्याच्या ताटलीत घालत बोलल्या. विदुड्याने उत्तरासाठी तोंडाने फुऽऽर करून गाल फुगवले. मृदुलेनं त्याच्या गालावर एक चापटी मारली. 'विसरू नकोस हं !

आजी काय विचारते तुला ? 'बाबांचे फोटो कसे लंगित लंगित आहेत रे विदुड्या !' तिला अगदी वाटलं विनीतनं खूप बाबा बाबा करावं; पण मृदुलाची आर्तता काही विदुड्यापर्यंत पोहोचली नाही. त्यानं अंगाच्या आळोखेपिळोखे दिले. उगीच डोळे किलकिले केले आणि उघडले. खिडकीच्या दारावर बसलेल्या चिमणीकडे पहात म्हणाला, 'चिऊऽऽ बघ !' आणि तो चिऊकडे एकटक पाहू लागला. मृदुलेला वाटलं याला एक सणसणीत ठेवून द्यावी. त्याचं जेवण उरकून,

त्याला झोपवून मृदुला गॅलरीत आली. समोरच्या मैदानात खेळ रंगला होता. पोरं ओरडत होती, 'बकॉप रे हमारा गावसकर!' तिला आठवण झाली. रविवार असला की, सतीश हमखास खेळ बघत उभा रहायचा. तिला समजावून सांगायचा, 'तो बघ तो निळी पँटवाला बॅट कशी धरतो आणि इकडचा हा किडकिडीत मुलगा कशी धरून ठोकतो. त्या जाडच्यानं खरं म्हणजे एकदम टोकापाशी उभं रहायला हवं–' सतीशच्या आठवणींभोवती मन पुन्हा रुंजी घालू लागलं. आंघोळीला जाताना दणकन् उडी मारून टॉवेल घेणारा सतीश. मृदुलानं चहाचा कप पुढं आणून ठेवला तरी टाइम्समध्ये डोकं खुपसून बसलेला सतीश. स्टुलावर पाय टेकवून बुटाची लेस बांधणारा सतीश. उंबऱ्याच्या बाहेर पाय ठेवल्यावर 'मृदुल, रुमाल दे ग!' म्हणून ओरडणारा सतीश. वाऱ्यानं पुस्तकाची पानं फडफडावीत तशा आठवणी फडफडल्या. आरशापुढं उभं राहून स्वतःच्या पीळदार दंडाकडे दिमाखात बघणारा सतीश! मृदुलाला अलगद पकडून घाबरवून टाकणारा सतीश! आपल्या बळकट मिठीत मृदुलाला मिटवून टाकणारा सतीश! त्याच्या ओठावरची बारीक रेषा, त्याची केसाळ उघडी छाती. ती बेभान झाली! दुपारचं निळं आभाळ झळझळत होतं. तिला वाटलं अगदी उंच उंच झोका घ्यावा आभाळापर्यंत. क्षणभर लहानपणची आठवण झाली. खूप उंच झोका घेतल्यावर कसं आनंदानं गरगरायला व्हायचं तसंच आता झालं. अगदी अधांतरी अधांतरी वाटायला लागलं. तिनं बाजूच्या खुज्यातलं पाणी घेतलं आणि सावकाश एवढा एवढा घोट घेत ती फुलपात्र भरून पाणी प्यायली. कसं छान शांत वाटलं! ही सतीशचीच आवड. तो नेहमी म्हणायचा, मातीच्या भांड्यातल्या पाण्याची चव कशी वेगळीच असते. ते नुसतं चाखत-माखत पिण्यानंच सगळा शीण निघून जातो. सतीशनंच आवडीनं एक खुज्या या कोपऱ्यात ठेवला होता. वारा मंद मंद येत होता. झुळकीसरशी पडद्याचे घुंगुर मृदु स्वरात रुणझुणत होते. ती रुणझुण ऐकून ती शांत उभी होती. ऐकता ऐकता का कोणास ठाऊक, त्या मृदु स्वराबरोबर मिसेस कर्णिकांचा फोटो तिच्या मनात थरथरला. थरथरत्या पाण्यात थरथरतं प्रतिबिंब दिसावं तसा पुसट. कोणतेच भाव न उमटू देता थरथरत होता. तिच्या मनात आलं, एवढा अगदी त्यांच्या एकटीबरोबर कशाला फोटो काढायला हवा होता? काही तरीच असतं कधीकधी सतीशचं!

उषा ऑफिसला जाताना दिसली. तिला वाटलं, उषानं खरंच सगळं कसं पचवलं असेल! एक वेळ मृत्यू पचवता येईल; पण हे असं! तिच्या पहिल्या मंगळागौरीला उषाचं पाचवं वर्ष होतं. कशी सुंदर सजून आली होती पूजेला! त्या वेळी वाटलं पण नव्हतं हिच्या वाट्याला असं काही येणार आहे! चांगला आर्किटेक्ट नवरा. दोन गोड मुली. पैशाला काही कमी नव्हतं. बेटर प्रॉस्पेक्ट्स म्हणून इग्लंडला गेला आणि बघता बघता तिकडे दुसरं प्रकरण सुरू झालं! अगदी घटस्फोट घेण्यापर्यंत पाळी आली! उषाकडे बघितलं की तिचा नवरा मृदुलेला आठवायचा. किती साधा, सभ्य. डोळ्याला चष्मा. साधे कपडे. तो इथपर्यंत प्रकरण करील हे मृदुलेला किती दिवस पटतच नव्हतं; पण ते खरं झालं होतं. तिला शंका आली हल्ली हल्ली असं काही जास्तच ऐकू येतंय की काय! ती टीव्ही-वरची अनाउन्सर नाही का, दोन मुलांची आई; पण एका सिंध्याबरोबर पळून गेली! मृदुलेचं मन चाळवलं. क्षणभर पुन्हा मिसेस कर्णिकांचा चेहरा मनात थरथरला. तिनं कठड्यावर टक्टक् वाजवलं, खुर्ची उगीचच हलवली. स्टुलावर पडलेलं मासिक चाळलं; पण मन काही ताळ्यावर यायला तयार नव्हतं. त्यांचं इतकं प्रेम होतं की, संशयाचं गालबोट लागणंसुद्धा तिला अगदी अपमानास्पद वाटत होतं; पण तिच्या प्रेमाला न जुमानता ते नको त्या वाटेनं भरटकत निघालं.

गेल्या काही पत्रांत मिसेस कर्णिकांचं वर्णन जरा जास्तच ऐकू येत होतं. 'मृदुला, तुला पत्रं कशी लिहावीत ते कळतच नाही! मिसेस कर्णिक पत्रं छान लिहितात. मी कामासाठी शिकॅगोहून न्यूयॉर्कला गेलो होतो तेव्हा त्यांनी आवर्जून मला पत्र पाठवलं होतं! तू आलीस की दाखवीन!' मृदुलेच्या अगदी आत आत कळ उठली. तिला अतिशय अगतिक, अस्वस्थ वाटलं. कठड्यावर दोन्ही हात गच्च धरून ती उभी राहिली आणि डोळे मिटून तिनं एक दीर्घ श्वास घेतला. तिच्या मिटल्या डोळ्यांसमोर सतीशचा चेहरा आला आणि पाठोपाठ कर्णिकबाईंचा!' 'त्या हसत चहा देत आहेत आणि ते दोघे खूप बोलत आहेत. त्यांनी चट्कन शेकहॅन्ड-सुद्धा केला तिकडच्या सर्रास पद्धतीप्रमाणे!' एवढ्यात विमलाबाईंचा आवाज आला, 'मृदुला, झोपला असला विनीत तर चल ग जेवायला!' मृदुला झट्कन आत आली. तिनं टेबलावर दोघींची ताटं घेतली. वाढून घेता घेता ती म्हणाली, 'छान आलेत नाही का हो आई सगळेच फोटो! तो सतीशचा चहा घेतानाचा तर खूपच छान आहे नाही का?' नको असलेलं मिसेस कर्णिकांचं नाव तिनं उच्चारायचं टाळलं. ती आतुरतेनं बघत होती विमलाबाई काय म्हणतात! तिला वाटत होतं त्यांनी म्हणावं – चहा घेतानाचा इतका काही नाही ग, मला तो दुसराच आवडला!

'हो तर. सतीश म्हणजे जाईल तिथं सगळ्यांना आपलंसं करून घेईल. आता बघ कोण कुठच्या त्या कर्णिक आपलेपणानं करताहेत त्याचं! म्हणजे दुखलंखुपलं काळजी वाटत नाही शिरीषमध्ये हे नाही. एकटा एकटा बसेल!' विमलाबाई बोलल्या. मृदुलेची निराशा झाली. 'आणि सतीशचा फोटो काढायचा छंद! ज्याचे त्याचे फोटो काढायचे! म्हणून तर माणसं फारच लवकर जोडली जातात!' अगदी सहजपणे मृदुला बोलून गेली. आपण असं का बोललो हे नंतर तिच्या लक्षात आलं. तिला स्वतः-चीच लाज वाटली. स्वतःच्या मनातला किंतु तिला अगदी नको-नकोसा झाला. किती गाढ विश्वास होता तिचा आणि सतीशचा एकमेकांवर! असा किंतु येणंच तिला क्षुद्र-पणाचं वाटत होतं 'मृदुला, गेलीस की, पहिल्यांदा विदुडचाचे फोटो काढून पाठव बरं का! त्या लाल ड्रेसमध्ये कारवर बसवून काढ! सतीशला म्हणावं, मी मुद्दाम सांगि-तलंय!' विमलाबाई म्हणाल्या– 'अहो आई, त्याला सांगायला का हवय फोटो काढायला? आपण पाहून कंटाळू; पण तो काढायला कंटाळणार नाही!' वाटीत ताक ओतून घेत मृदुला म्हणाली. किंचित थांबून ती पुढं म्हणाली, 'मी तर अगदी ठरवलंय गेल्या-

बरोबर मिसेस कर्णिकांचा आणि माझा मिळून एक फोटो काढायचा. त्यांना इथून काही तरी भेट न्यायला पाहिजे नाही का ? इतकं करतात त्या सतीशसाठी म्हणजे !' स्वतःच्या मनातल्या किंतुपासून दूर पळण्यासाठी ती बोलली आणि तिला अगदी हलकं हलकं वाटलं. जसं काही सतीशवर संशय घेऊन तिनं त्याच्यावर केलेल्या अन्यायाचं परिमार्जन झालं. 'तुझंच जाण्याचं केव्हा जमतंय कोणास ठाऊक ! एकेक करता सगळं झालं तर आता तुझ्या मावशीकडेच लग्न निघालं !' विमलाबाई पाण्याचा तांब्या तिच्याकडे सरकवीत म्हणाल्या. 'हो ना ! आता हे मावशीच्या घरचं पहिलंच कार्य ! थांबलं नाही तर वाईट दिसेल ! अजून तारीख पक्की होत नाही मुहूर्ताची !' सावकाशपणे एकेक घास घेत मृदुला बोलत होती.

'त्या पलीकडच्या बिल्डिंगमधल्या चितळ्यांच्या मुलाचं ठरलं वाटतं ग लग्न !'

'देण्याघेण्याचं चिक्कार ठरलंय. सुलभाची मैत्रीण आहे न लीना ती सांगत होती. मुलीकडचे तिच्या ओळखीचे आहेत.'

'असंच का, त्या देसायांकडेसुद्धा बरं का—

अशा सगळ्या बोलण्यात मिसेस कर्णिक कुठच्या कुठे वुडून गेल्या. मृदुलेला अगदी मोकळं मोकळं वाटलं. मघाशी आलेला सगळा ताण निघून गेला. स्वतःच्या मनाची आता तिला गंमत वाटली. कुठच्या कुठे भरकटलो होतो आपण ! विमलाबाईही बाहेर जाऊन आडव्या झाल्या. गाणं गुणगुणत तिनं टेबल आवरलं. भांडी जागेवर ठेवून ओटा धुऊन टाकला. मग फोटोंचं पाकीट घेऊन ती बेडरूममध्ये आली. पलंगावर लोळत लोळत प्रत्येक फोटो अगदी सावकाशीनं पाहू लागली. मिसेस कर्णिकांच्या आणि सतीशच्या फोटोशी ती थांबली. तिला हसू आलं काय मूर्खपणा आपला ! किती साधा फोटो !

सगळ्या फोटोंची उजळणी झाल्यावर तिच्या मनात आलं, लगेच लिहावंच सतीशला पत्र. बेल वाजली. कामवाली असणार. मृदुलेनं उठून दार उघडलं. कामवाली आत आली. दार लावून परत येता येता तिच्या मनात आलं, तिकडे गेल्यावर मोलकरीण नाही. सतीशनं तसं लिहिलंच होतं. शिवाय नोकरीही करावी हे बरं, नाही तर घरी बसून एकटं एकटं वाटेल. तिकडच्यासारखं शेजारी वगैरे भानगड नाही. कामात मी मदत करीन. तुला वाचून आश्चर्य वाटेल पण मी हल्ली चक्क चक्क स्वयंपाकसुद्धा करतो. मिसेस कर्णिकांनी शिकवलाय. तिच्या डोळ्यांसमोर दृश्य आलं, ओट्यापाशी उभा राहून सतीश फोडणी देतो आहे. तिला एकदम हसू लोटलं. पेन सरसावून ती सतीशला पत्र लिहायला बसली. 'प्रिय सतीश, तुझं पत्र मिळालं. फोटो सगळे छानच आहेत. आम्ही सगळ्यांनी पाहिले.' पुढे काय लिहायचं त्याचा ती विचार करू लागली; पण पुढं पत्राला शेंडीच फुटेना. मृदुलाचं हे नेहमीचंच होतं. खूप लिहावंसं तिला वाटे; पण लिहायला बसली की, मनातलं सगळं कुठेच्या कुठं पळून जात असे. ती आपली लिहायची, 'दादाची पल्लवी आता शाळेत जायला लागली. आपला विदुड्या खूप बोलतो, बाबा बाबा म्हणतो. मी कोल्हापूरला जाऊन आले. तिकडे थंडी खूप आहे.' सतीश तिला लिहायचा. 'अग, इकॉनॉमिक्स घेऊन ग्रॅज्युएट झालेली तू ! अशी काय पत्र लिहितेस ? तिकडच्या वर्तमानपत्रात येणाऱ्या घडामोडी लिही. मनात इतक्या गोष्टी येत असतात ते सगळं लिही. म्हणजे पत्र इंटरेस्टिंग होतं.' खरंच सतीश किती छान लिहितो पत्र ! पत्रातून अगदी बोलतो आहेसं वाटतं. मग पुन्हा ते वाक्य तिच्या मनात घुमलं, 'मिसेस कर्णिक पत्र छान लिहितात !' तोंड वाकडं करून ती आपल्याच मनात म्हणाली–त्यात काय मेलं, नाही जमत एकेकाला ! काय बिघडतं पत्र लिहिता नाही आलं तर ? तिनं कागदपेन बाजूला सारलं. उगीचच फालतू गोष्टींचं कौतुक करण्याची सतीशला सवयच आहे. काय म्हणे नवरा महिन्यातला पाऊण महिना टूरवर असतो आणि त्या एकट्या वर मॅनेज करतात. शिवाय नोकरी करतात. घर मॅनेज करतात मॅनेज करतात म्हणजे काय स्वतःच्या नवऱ्याचं आणि मुलांचच ना करतात ! कारखाना तर मॅनेज नाही ना करत ? एवढं तर सगळ्याच बायका करतात आणि नोकरी नोकरी काय प्रस्थ ? या मुंबईतल्या हजारो बायका नोकरी करून घरचं करतात–आई चांगल्या दोन दोन महिने गावाला गेल्या तर मीच नाही का सगळं केलं ? कौतुक काय तिकडे नोकर नसतात; पण यंत्र असतात ना ! रेडीमेड तर आणतात ना जी ती वस्तू ! मग काय डोंबलाचं मॅनेज करायचं !— विचारांची गाडी अशी उताराला लागली तेव्हा तिला स्वतःचाच राग आला. का आपण पुन्हा एवढं अडकतोय या बाईमध्ये ? असं डळमळणं म्हणजे तिला स्वतःचा पराभव आणि सतीशचा अपमान वाटत होता. मोलकरीण जाते म्हणून सांगून निघून गेली. दाराचं लॅच बरोबर लागल्याचं तिच्या कानांनी सवयीनं टिपलं. तिनं झोपायचा प्रयत्न केला; पण झोप लागेना.

ती उठली. तिनं उगीचच घरभर एक फेर मारली. बाहेरच्या खोलीत येऊन ती वर्तमानपत्र चाळू लागली. शिरीष, विमलाबाई शांत झोपल्या होत्या. तिच्या मनात आलं, ही सतीशची रक्ताची माणसं. ही प्रेम करतात सतीशवर. तरी माझ्याइतकं नाही. माझा सगळा जीव एकवटला आहे त्याच्यासाठी. हे सगळेजण स्वतःच्याच व्यापात असतात. शिरीष, सुलभा मधेच म्हणतात, 'दादाचं पत्र येऊन बरेच दिवस झाले नाही का ? दादाला जाऊन किती दिवस झाले बरं ?' पण मला म्हणजे कसं पत्र आलं नाही की सुचेनासं होतं आणि आलं की दिवसभर आनंदानं तळमळायला होतं. हे पती–पत्नीचं नातचं वेगळं. इतकं जवळचं नातंच नाही. म्हणून तर कोल्हापूरच्या कुठच्या कोपऱ्यातून ती आली आणि बघता बघता सतीशचं सर्वस्व झाली ! सतीशनं कधी तरी लिहिलं होतं, 'एका हॉटेलमध्ये कोबीची भाजी खाल्ली आणि आईच्या हातच्या भाजीची खूप आठवण झाली ! टेबलटेनिस खेळायला गेलो की शिरीषची आठवण होते. साठ्यांच्या मुलीचं गाण्याचं वेड अगदी सुलभासारखं. स्टडीग्रुपची डिस्कशन ऐकली की वाटतं तात्यांना फार आवडतील आणि मृदुला तू ? तुझी आठवण ? ती अमुक एका गोष्टीत नाहीच. ती अगदी सतत माझ्याबरोबर असते सावलीसारखी !' हे आठवून ती मोहरली. तिला लहानपणी आजीनं सांगितलेली रुक्मिणीच्या मिठाची गोष्ट आठवली. कृष्णाला इतक्या बायका ! त्याने सांगितलं ही मला श्रीखंडासारखी आवडते. ती बासुंदीसारखी आणि रुक्मिणी ? ती मिठासारखी ! रुक्मिणी चिडली. मग कृष्णानं दुसऱ्या दिवशी सगळा मिठाशिवाय स्वयंपाक करायला सांगितला,

पंगतीत कोणी जेवेचना ! मिठाशिवाय कशाला चव नाही असं म्हणू लागले. रुक्मिणीला स्वतःचं महत्त्व कळलं. ते आठवून मृदुलेला वाटलं या जुन्या पुराणातल्या गोष्टी बाई गंमतीदारच एकेक ! तिला वाटलं सतीशनं लिहिलेलं सावलीसारखी आठवण आणि ही कथा प्रकार एकच ! माझ्याइतकं जवळचं, माझ्याइतकं प्रिय सतीशला दुसरं काही असूच शकत नाही. माझ्याशिवाय त्याचे, त्याच्याशिवाय माझे चालूच शकत नाही !

बेडरूममध्ये काठी सपकन् पडल्याचा आवाज आला म्हणून ती आत आली. मांजर खिडकीतून पळून जाताना काठी पडून आवाज आला होता. बरं तर बरं विनीतच्या अंगावर नाही पडली. ती येऊन पुन्हा पलंगावर बसली विनीत चुळबुळला. तसं तिनं त्याला थोपटलं बघता बघता ती भूतकाळाच्या बोगद्यात शिरली. पाच वर्षांपूर्वी मृदुलेचं लग्न ठरलं ते किती सहज ! तिच्या मावशीनं सतीशचं स्थळ सुचवलं. सतीशला पत्रिका वगैरे बघायची भानगड नव्हती चार दिवसात सतीश तिला पहायला आला. गौर वर्णाची, गोंडस बांध्याची, गोड चेहऱ्याची पण नकट्या नाकाची मृदुला त्याला आवडली. घराच्या बाहेर पडताना सतीश किंचित वळला. मृदुलेकडे पाहून त्यानं एक स्मित केलं आणि मग मृदुला स्वतःची राहिलीच नाही ती तत्क्षणी सतीशची झाली ! सतीशनं दोन दिवसात होकार कळवला. लगेच बैठक झाली. नंतर साखरपुडा. महिन्यानंतरचाच मुहूर्तही धरला. लगेच हॉल, कुंकुमपत्रिका एकच गडबड उडाली. सगळं इतकं वेगात घडत होतं की, मृदुलेला जसं काही कळतंच नव्हतं. मैत्रिणी चेष्टा करीत होत्या. मृदुला हसत होती, लाजत होती. दागिने चमकत होते. कोऱ्या साड्यांच्या घड्या या हातातून त्या हातात फिरत होत्या तळणाचे वास दरवळत होते. त्या सगळ्या गलबल्याच्या मध्यभागी असलेली मृदुला धुंद होती ! तिच्या डोळ्यांसमोर सतीशची मूर्ती तरळत होती. कानात त्याचंच नाव गाजत होतं ओठात त्याचंच नाव गुणगुणत होतं. बाकी नुसतं पार्श्वभूमीसारखं जाणवत होतं. मृदुलेला वाटलं हे सगळं त्या देवानंदच्या सिनेमातल्या गाण्यासारखं झालंय. एकच गाणं सुरू असताना तो तिला पहायला येतो, लगेच लग्न ठरतं. ती त्याच्या घरात येते. अगदी आरशापुढं उभी राहून केस विंचरू लागते, तरी तेच गाणं सुरू असतं. चिमणीनं भुरकन् उडून या झाडावरून त्या झाडावर घरटं करावं तशी मृदुला माहेराहून सासरी आली. मृदुला देशमुख मृदुला पुरोहित झाली! पाच वर्षांपूर्वी मृदुला या घरात आली तेव्हा अगदी हुरळून गेली होती. एखाद्या सुंदर चित्रातच आपण प्रवेश केला असं तिला वाटलं. पाच खोल्यांचा तो प्रशस्त फ्लॅट. दर्शनी मोठ्या खोलीतल्या भिंतीवर दोन सुंदर रंगचित्रं होती. दिवाणवर मऊ गाद्या होत्या. नक्षीदार डिझाइनच्या चादरी त्यावर आरामात पसरल्या होत्या. तुकतुकीत चॉकलेटी पॉलिशच्या लांबट आडव्या कपाटावर टी व्ही. विराजमान झाला होता. छताच्या दिव्याला जाळीदार शेड होती. दारांना फिकट रंगाचे झुळझुळीत पडदे होते. तिचं कोल्हापूरचं घर मोठं होतं; पण जुन्या अंधाऱ्या वाड्यात होतं, असं हे नव्हतं. ती प्रत्येक खोलीतून हिंडली घर कसं सुखी समाधानी आधुनिक दिसत होतं. जसा काही त्या सुखासमाधानाचा, आधुनिकतेचा प्रकाश घरातल्या वस्तूच्या कणाकणावर, प्रत्येक माणसाच्या चेहऱ्यावर पडला होता. सतीश हौशी होता. खूप बोलायचा. संगीत, नृत्य, आर्ट गॅलरी कुठच्या कुठच्या कार्यक्रमाला तिला घेऊन जायचा. तिच्या एका मैत्रिणीच्या सासरी रात्री आठच्या आत घरी आलंच पाहिजे असा दंडक होता. दुसरीकडे सिनेमाला जायचं तर दीर-नणंद सगळ्यांचं लटांबर घेऊन जावं लागेल. मृदुलेकडे असा कहार नव्हता. प्रत्येकाचा दिनक्रम वेगळा होता. कोणी कोणाच्या पायात पाय घालत नव्हतं. दोघंच दोघं अगदी उशीरापर्यंत भटकायचे. सतीशला विशेष सिनेमा आवडत नव्हता. मृदुलेला फारच आवडायचा. सतीशनं तिला मुंबईची अगदी सुंदर सुंदर थिएटर्स हिंडवली. प्रत्येक वेळी तो सांगायचा, इथलं इंटेरियर असं आहे, तिथलं असं होतं. हे असं नको होतं. ते तसं चांगलं होतं.' मृदुलेला त्यातलं फारच थोडं कळत होतं; पण त्याला असं रंगून जाऊन बोलताना पहायलाच तिला आवडायचं. ती तन्मयतेनं ऐकत रहायची, तिच्या त्या तन्मय नजरेचीच त्याला धुंदी चढायची. दोन जिवांभोवती रेशमी धागे गुंफीत रात्री पळाल्या. दिवस उडाले. तो तिला सांगायला लागला, काकूबाईसारखी रोज रोज साडी नेसू नको. एवढं मोठं कुंकू लावू नको ! ती त्याला सांगायला लागली, असा भांग चांगला दिसतो. तो सेन्ट भलताच उग्र वाटतो. पुरोहितांच्या मोठ्या वर्तुळात त्या दोघांचं लहानसं बेट झालं. भांड्याला भांडं लागायचं ते लागलंच; पण घर हादरवून टाकणारा मोठा आवाज झाला नाही ! विमलाबाईंनी सुलभाला म्हटलं, ' तू कर जा अभ्यास. वहिनी आवरेल वाळलेले कपडे !' मृदुलेनं सतीशला म्हटलं, ' रोज तूच का आणणार भाजी ? शिरीषला सांग की चार दिवस !' पण सगळ्यांच्या समंजसपणानं हे सगळं जागच्या जागीच विझलं इतरांबद्दल तक्रारी करण्यानं ते अधिक जवळ आले. हळूहळू आपण कोणत्या मुलीवर कशी लाइन मारली ते सतीशनं तिला सांगून टाकलं. मुलींनी त्याची कशी फजिती केली, त्यानं मुलींची कशी फजिती केली हेही अगदी खुल्लंखुल्लं सांगितलं कॉलेजमधल्या एका मुलीनं पुस्तकातून कशी चिठ्ठी पाठवली, ट्रिपमध्ये अंधारात एका मुलानं कसा पटकन तिचा हात पकडला ते मृदुलानं सतीशला सांगितलं. त्यांच्यात आता गाढ विश्वास आला. पूर्ण समरसता आली सतीशनं घरात पाऊल टाकलं की, त्याच्या चेहऱ्याकडे न बघताच तिला कळू लागलं आज याचं ऑफिसमध्ये बिनसलं आहे. मृदुला पाठमोरी असली तरी सतीशच्या लक्षात येऊ लागलं आज तिचं डोकं दुखत आहे. विनीतचा जन्म झाला. घर गजबजून गेलं. सतीशच्या अमेरिकेला जाण्याची बोलणी सुरू झाली विनीत सहा महिन्यांचा झाला आणि सतीश अमेरिकेला जायला निघाला. आता त्या दोघांनाही एकमेकांबद्दल खात्री होती; पण तरीही दृढ आलिंगनात त्यांनी एकमेकांना निष्ठेची मूक वचनं दिली. सतीश निघून गेला त्याची नियमित पत्रं येत होती. फोन येत होते. तो तिकडे कंटाळला, त्रासला वाटलं तर ती इकडे अस्वस्थ व्हायची. तो तिकडे रमला, गुंगला वाटलं तरी तिला इकडे हुरहूर लागायची. त्याच्या पत्रातल्या शब्दांचा आधार अगदी घट्ट घट्ट पकडत त्याच्यावर विश्वासू लागली 'एक सांगतो मृदुल–' 'हे अगदी पक्कं बरं का मृदुल–' मृदुल ! मृदुल ! मृदुल ! मृदुल !'

बेल वाजली. मृदुलेनं जाऊन दार उघडलं. सुलभा आत आली. मृदुलेला हायसं वाटलं. एकटं एकटं असलं की मन फार वाहात जातं वाटेल तसं. दार लावून आत येत ती म्हणाली, 'अगदी कंटाळा आलाय सुलभा, आपण भजी करू या का ग ?' बेस्ट आयडिया वहिनी !' विनीत उठून येऊन

विमलाबाईंच्या पायाशी खुडबुडू लागला. त्याही उठून बसल्या, सगळ्या घराला जाग आली. मृदुलेचं सैरभैर झालेलं मन आपोआप आवरलं गेलं. तिनं विमलाबाईंसाठी चहा ठेवला. ती कांदे चिरायला बसली. 'एकदम सनसनाटी न्यूज वहिनी!' सुलभा आत येत म्हणाली,

'आमचा तो केमिस्ट्रीचा डेमॉन्स्ट्रेटर नाडकर्णी सांगते ना मी तुला? त्याच्याशी शीला लग्न करतेय ग!'

'अय्या! कोण शीला? अग, पण तो नाडकर्णी मॅरीड म्हणालीस ना?' मृदुला कांदे चिरताना एकदम थबकून बोलली.

'अग हो ना! त्याचं आणि बायकोचं पटत नव्हतं. त्याला ती मुळात पसंतच नव्हती म्हणे! वडिलांच्या प्रेशरनं लग्न केलं होतं. ती गावीच असते. हा तिकडे फिरकतच नाही!' सुलभानं एका दमात सांगून टाकलं.

'अग, पण पहिल्या बायकोचा काय डिव्होर्स घेणार?'

'हॅट ग! माहिती कुणाला? पण म्हणतात डिव्होर्स बायको देणार नाही. हे धर्मेंद्र–हेमामालिनी टाइप होणार!' बशा टेबलावर काढून घेत सुलभा बोलली.

'पण शीलानं तरी असं कशाला करायचं ग? तिचं स्वतःचं नुकसानच. मला हे पटतच नाही!' विळी ठणकन् बंद करीत मृदुला म्हणाली.

'अग, केवढ्यांदा विळी बंद केलीस. पातं तुटेल की!' पीठ भिजवत सुलभा म्हणाली; पण ती काय बोलली ते मृदुलापर्यंत पोहोचलंच नाही.

'पण नाडकर्णी किती सभ्य, साधा मनुष्य दिसतो ग! शीलासुद्धा!' चिरलेले कांदे ओटयावर ठेवत मृदुला स्वतःशीच बोलल्यासारखी पण मोठ्यानं बोलली.' ही साधी साधी वाटणारी माणसंच असलंच काही तरी करतात! उपाच्या नवऱ्याचं काय? बघ, तेल एवढं घेऊ?' कढईत तेल ओतत सुलभा म्हणाली.

मृदुला कढईत पहात होती; पण तिचं लक्ष नव्हतं. तिच्या डोक्यात नाडकर्णी–शीला, उपा–इंग्लंडचा नवरा असा सगळा गुंता सुरू झाला होता. 'अग वहिनी, तेल पुरेल का एवढं?' सुलभानं पुन्हा विचारलं. मृदुला भानावर येऊन म्हणाली, 'हं तापू दे तेल! आईना चहा नेऊन दे!' गुंता चक्रासारखा पुन्हा डोक्यातून फिरू लागला. त्या गुंत्यात सतीश आणि मिसेस कर्णिकही घुसू पहात होते. वाळवणावर आलेल्या कावळ्याला तत्परतेने हाकलावे तशी ती त्यांना त्या गुंत्यापासून दूर ठेवत होती.

'वहिनी, अग, इथेच 'गणेश' थिएटरला 'गृहप्रवेश' सिनेमा लागलाय–जाऊ या?' सुलभानं कल्पना मांडली. तिनं एकदम हो म्हटलं आणि घाईनं भज्यांचा घाणा घातला. सगळ्या गुंत्यापासून पळून जायला सिनेमा एकदम बरा वाटला. भज्यांचा वास आला तसा शिरीषही आत आला. भजी खाता खाता सिनेमाचा बेत अगदी पक्का झाला.

शिरीष तिकिट काढायला पुढं धावला. त्या दोघी आपलं आवरू लागल्या. हे टॉप्स बरे आहेत, मी ही चेन घालते. ती साडी मी नेसू का? तिच्यावर स्लीवलेस ब्लाउजच बरा दिसेल अशी त्यांची चर्चा सुरू झाली. मृदुलेला अगदी तरतरी आली. दुपारभर कसा अगदी डोक्यावर ओझं असल्यासारखा शीण आला होता.

चित्रपट सुरू झाला. संजीवकुमार–शर्मिला सुखी जोडपं. त्यांचं घर, त्यांचा मुलगा, त्यांचं नव्या घराचं स्वप्न. मृदुला गुंग झाली. असंच मस्त जमायचं तिचं आणि सतीशचं, सतीश कंजूष नव्हता; पण असंच बजेट दाखवायचा. तिला वाटायचं ही साडी घेऊ–ती साडी घेऊ; पण सतीशला कायम वाटायचं, साड्या हव्यातच कशाला एवढ्या? त्यापेक्षा पुस्तकं घेऊ. शो-पीस घेऊ. पडद्यावर सारिकानं प्रवेश केला. मृदुलेच्या विचारांची साखळी तुटली. सारिकानं संजीवकुमारला चहा दिला. मृदुलेच्या काळजाचा ठोका चुकला. तिनं वर्तमानपत्रात चित्रपटाची कथा आधीच वाचली होती. आता संजीवकुमार सारिकाच्या प्रेमात सापडणार, तो पत्नीशी घटस्फोट घेऊ म्हणणार! शी: उगीचच आलो या सिनेमाला. टेनशन पुन्हा. आधीच नाही लक्षात आलं. क्षणभर मृदुलेचा श्वास रोखला गेला. तिला सतीशची अगदी तीव्रतेनं आठवण झाली. त्याच्यावरचा तिचा विश्वास या क्षणी पार उडाला! क्षणभर तिला वाटलं सुलभाला म्हणावं, 'सतीश असं काही करेल का ग?' पडद्यावर संजीवकुमार–सारिकाचं प्रेम रंगू लागलं. ते दोघे हॉटेलच्या उंच गच्चीत जाऊन बसले. मृदुला स्वतःच्या फ्लॅशबॅकमध्ये शिरली. एकदा ती सतीशला म्हणाली होती, 'धर्मेंद्रला कसं हो काही वाटलं नाही, एक बायको असताना हेमाशी लग्न करायला?' सतीश जोरात हसून म्हणाला, 'काय हरकत आहे? अरे मिया बिबी राजी खरं सांगू मृदुला, हेमामालिनी-सारखी भेटली ना कुणी तर माझासुद्धा भरवसा नाही. तू नकटी आहेस नुसती!' मृदुलानं त्याच्या पाठीत एक जोरात धपका घातला आणि ती म्हणाली, 'जा. कोणत्या हेमामालिनीबरोबर जायचं तिकडे! मी पण गाठू शकते कोणी तरी अमिताभ, धर्मेंद्र!' 'हिअर यू आर. दॅट्स द स्पिरिट; पण काहीही म्हण मृदुला, अफेअरमध्ये थ्रिल वाटणारच. आपल्या आई–वडिलांच्या पिढीनं उगीच नसती बंधनं घालून घेतली. जे भोगता येईल ते भोगावं!' मजेत तोंडाची अशी वाफ दवडण्यात दोघांचाही छान वेळ जात होता. पडद्यावर संजीवकुमारनं शर्मिलेला आपलं प्रेमप्रकरण सांगून टाकलं. मृदुला डोळ्यात प्राण आणून पाहू लागली. कानात प्राण ओतून ऐकू लागली. कांगावा न करता


**जगन्नाथ गंगाराम पेडणेकर**

**ज्युवेलर्स**

सोने, चांदी व मोत्यांच्या दागिन्यांचे व्यापारी

खांडके बिल्डिंग नं. ९, रा. के. वैद्य रोड, दादर, मुंबई २८

**सोने, चांदी व मोत्यांचे दागिने ऑर्डरप्रमाणे अल्प मुदतीत बनवून दिले जातील व तयार दागिने हजर स्टॉकमधून मिळतील.**

शर्मिला धोरणानं वागत होती. अखेरीस संजीवकुमारनं सारिकाकडे पाठ फिरवली. मृदुलेनं निश्वास टाकला. मृदुलेच्या मनात आलं, अखेरीस नवरा–बायकोचं नातंच पक्कं, कायमचं. बाहेर पडताना शिरीष म्हणाला, 'जाम बोअर झालं बाबा! कसला स्लो पिक्चर होता!' 'तुम्हाला काय ते फास्ट पाहिजे का? पहिल्या भेटीत प्रेम, लगेच गळयात गळा घालून लोळत गाणं; पण प्रत्यक्षात कुठं असं असतं?' मृदुला आपला मुद्दा मांडीत म्हणाली.

'आणि मग याच्यात दाखवलं तसं तरी प्रत्यक्षात कुठं असतं?' हे असं प्रत्येक पुरुषाचं दुसरं प्रकरण असतं का? साली किती तरी जणांनी चघळून चोथा केलेली गोष्टच पुन्हा पुन्हा दाखवतात!' शिरीश सिगरेट शिलगावत म्हणाला.

'अरे, पण प्रत्यक्षात घडत असतं पुन्हा तेच तेच. वहिनी, मला जाम नाडकर्णी आणि शीलाची आठवण होत होती.' सुलभानं संभाषणात भाग घेतला.

'पण असं क्वचित् कुठं तरी काही तरी घडतं. जिकडे तिकडे नाही घडत. नाटक-सिनेमातून असले प्रेमाचे त्रिकोण सर्रास दाखवत असतात. इतकं प्रत्यक्षात मुळीच नसतं.' मृदुला एकदम हिरीरीनं बोलू लागली. बोलत असतानाच तिच्या डोळयांसमोर सतीशच्या पत्रातला मजकूर येत होता, '–मिसेस कर्णिक खूप हुषार आहेत. नवरा कामानिमित्त जगात कुठे कुठे फिरत असतो. त्या नोकरी करून एकटया घर मॅनेज करतात. सगळया रेसीपीज बनविण्यात एक्सपर्ट अगदी चाइनीज फूडपासून! मी त्या फॅमेलीत इतका फ्रेंडली झालो आहे की, प्रत्येक रविवारी जेवायला त्यांच्याकडेच असतो. मग मिस्टर कर्णिक असोत नाहीत तर नसोत! माझ्यासारखा जातीचा खवैय्या जेवायला असला की, हौसेनं स्वयंपाक करावासा वाटतो असं सुधाताई म्हणतात. अमेरिकन् राजकारणापासून भारतीय संगीतापर्यंत सगळयावर गप्पा मारणार!' ते पत्र मनात अगदी ऐकू येत असताना मृदुला ठासून सांगत होती. 'मैत्री असू शकते सुलभा, म्हणून काही कोणी वाटेल तसं वाहात नाही. विशेषतः लग्न झालं असताना. अग, जबाबदारी वाटतेच पुरुषाला सुद्धा. असली दुसरी बाई समजा जास्त हुषार, सुंदर म्हणून काय लगेच बायकोशी काडीमोड घेऊन दुसरीशी लग्न करायला जात नसतात सगळी! संसार केल्यावर प्रेमच इतकं निर्माण होतं की, दुसरीकडे वळणंच कठीण!

'ते सांगू नकोस वहिनी! अमिताभ-रेखा दिलीपकुमार-आस्मा अग, आपल्या मराठी लेखकातसुद्धा ते आनंद साधले नाही का? पन्नाशीनंतर वीस वर्षं केलेला संसार त्यागून दुसरीशी लग्न करणारे!' सुलभा म्हणाली.

'पण अमिताभनं रेखाला आणि दिलीपकुमारनं अस्माला सोडलंच् ना! मृदुला तावातावानं म्हणाली, लेखकमहाशयाचं नाव तिनं सोयिस्करपणे गाळून टाकलं. 'शेवटी सोडलं; पण मुळात प्रकरण झालंच ना!

'एक बायको असताना दुसरी मागे येते, हाच आमच्या पुरुषांच्या जातीचा विजय आहे. एकपत्नीत्वाचा कायदा झक मारतो! शिरीष मृदुलेला डिवचीत बोलला.

'चूप रे! तू एक मुलगी गटवून दाखव, मग तुझ्या जातीच्या विजयाचं बोल! एका मुलीच्या मागं दोन काय दहा मुलगे असलेले मी दाखवते तुला!' सुलभानं त्याला परस्पर कटवलं.

'पण निसर्गात पहा सुलभा तू, एक कोंबडा असतो. त्याच्यामागे किती तरी कोंबडया जातात. काळवीट एक. त्याच्याबरोबर हरिणींचा कळप!' शिरीष आपला मुद्दा स्पष्ट करत होता.

'पण आपण काय कोंबडे आणि हरीण आहोत का? माणसं आहोत ना चांगली. त्यांच्यासारखं कशाला वागू आपण?' मृदुलेनं सवाल केला. यावर शिरीषला उत्तर सुचेना. 'पण मला काय म्हणायचंय–' शिरीष सांगत होता.

घर आलं होतं. 'बाई विदुडयानं किती त्रास दिलाय कोणास ठाऊक!' ती एकदम म्हणाली आणि धावत जिन्याच्या पायऱ्या चढली. विनीत चमच्यानं ताटली वाजवीत मजेत टेबलापाशी बसला होता. मृदुलेला हायसं वाटलं. बाहेरच्या खोलीत काका आणि तात्या गप्पा मारीत होते. 'चहा दे ग नेऊन' विमलाबाई म्हणाल्या. चहा देऊन बसत मृदुला म्हणाली, 'कधी आलात काका? आम्ही सिनेमाला गेलो होतो–' 'अग बाई, आता परत जाण्याची सुद्धा वेळ झाली! काय कधी बसणार प्लेनमध्ये?' काका बोलले.

'अजून काही मुहूर्त मिळाला नाही काका!'

'लवकर जा बरं का? नाही तर सतीश पाहील गोरी मड्डम!' काका म्हणाले आणि खो खो हसले.

'पाहू दे हो! मी कशाला काळजी करू? तुम्ही एवढे सगळे आहात ना काळजी घ्यायला?' ती बोलली आणि कपडे बदलायला उठली. कपडे बदलून ती जेव्हा स्वयंपाकघरात आली. तेव्हा तात्यांच्या आणि काकांच्या गप्पा पुन्हा रंगल्या होत्या. तात्या म्हणत होते. 'लोक तिकडून परत येत नाहीत रे! सतीश बघू काय करतो.' काका सांगत होते, 'कशाला येतील? एकदा बघितल्यावरच मी म्हणतो, अमेरिका म्हणजे पृथ्वीवरचा स्वर्ग!' 'अरे, पण त्या स्वर्गात शेवटी सुख आहे का? कशाला ते हरे राम हरे कृष्णच्या मागे धावतात? सेक्सफ्रीडम, घटस्फोट या सगळयातून अस्वास्थ्य येतंय.'

'हा आपला भ्रम आहे. घटस्फोटांमुळं त्यांचं काहीही बिघडलेलं नाही. आज ते जगाचे राजे आहेत! आपल्याकडे कैक संसार असे आहेत की, त्यापेक्षा त्यांचे घटस्फोट परवडले म्हणायची वेळ येते!' काकांनी मूठ आपटत आपले विचार मांडले. आतून मृदुला ऐकत होती. 'काय बोलता तुम्ही काका? घटस्फोटांमुळं किती इनसिक्युअर्ड वाटतं तिकडे सतीश म्हणतो.' ती आतून मोठया आवाजात म्हणाली.

'–मी तुला सांगतो ग बाई, जगातला कोणताही माणूस शेवटी सुख शोधत असतो. या बाबतीत ते पुढं, आपण त्यांच्या मागून जातो. आज जे जे अमेरिकेत आहे ते ते उद्या आपल्याकडे येणार आहे. व्यक्तिस्वातंत्र्याचं सुख डोळयाला दिसलेलंच नसतं, माहितीच नसतं तोपर्यंत जे काही आहे त्यालाच सुख म्हणावसं वाटतं.' काका हात मांडीवर आपटीत बोलत होते. मृदुला येऊन दारात उभी राहिली. 'आता असं बघ मृदुला, सतीशनं म्हटलं असतं सिनेमाला जायचं नाही तर तू चांगलं घर डोक्यावर घेतलं असतंस. तुझ्या आजी-पंजीला सिनेमा माहीतच नव्हता आणि नवऱ्याचं ऐकायची इतकी सवय होती की, एखादी गोष्ट नको म्हटली तर नको! त्यांचं सुख त्या मर्यादेतच होतं. तसं आपल्या सुखाभोवती आपल्या मर्यादा आहेत. अमेरिकनांना या मर्यादा असह्य वाटू शकतात. कारण त्यांनी त्याबाहेरचं सुख अनुभवलंय. नवरा-

बायकोची ब्रह्मदेवानं मारलेली गाठ त्यांनी त्याच्याकडून काढून घेऊन स्वतःच्या हातात धरली आहे !' काकांचा बोलण्याचा स्वर. इतका ठाम होता की, तिला आत आत कुठं तरी कोसळल्यासारखं झालं.

'हा एक विचार पटतो तुझा. प्रतिष्ठेच्या कल्पनेत अडकून पूर्वी चार-चार भावांची कुटुंब सतत खदखदत एकत्र नांदत होती. आज आपण ती कल्पनाच सोडली ! संबंध निकरावर येऊनसुद्धा हल्ली नवरा-बायको एकत्रच रहाताना दिसतात. कारण संस्कार, प्रतिष्ठेची कल्पना सुटली नाही. पुढे ती सुटू शकेल !' तात्या बोलले. मृदुलेच्या जिवाचं पाणी पाणी झालं. ती मनाशीच म्हणाली—खरंच की ! उषाचा नवरा, नाडकर्णी शीला सगळ्यांनी प्रतिष्ठेची कल्पना सोडलीच की! उद्या सतीश सोडेल ? काळ्या मांजराचे तोंड चुकवावे तसा तिने तो विचार चुकवला. ती घाईघाईने मनाला सांगू लागली. प्रतिष्ठा-बितिष्ठा काही नाही. आमचं प्रेमच आहे.

'हं ! तेच आहे. पूर्वी बायकांना आवाजच नव्हता. पैशानं त्या परावलंबी होत्या. हजार हजार रुपये कमावणाऱ्या या हल्लीच्या मुली किती दिवस ऐकतील ? त्यांनी का ऐकावं ?' काका म्हणाले.

'अहो, पण तडजोड कुठेही करायला लागतच की !' मृदुला बोलली.


'ते बरोबर ग ! पण तडजोडीच्या कल्पना व्यक्तिगणिक वेगळ्या—देशागणिक वेगळ्या!' तात्या म्हणाले. 'आपल्याकडेसुद्धा घटस्फोट हा शब्द अस्तित्वात आहे. म्हणजे कोणत्या तरी कारणांनी ती कल्पना अस्तित्वात होती. पुन्हा तिचा आधार घेतला जातो आहे.' काका म्हणाले.

सकाळपासून मृदुलेच्या मनात नुसती पडझड चालली होती. जुन्या संस्कारांनी कोरून दिलेल्या लेण्यात ती जी उभी होती त्यातून आपोआप बाहेर येत होती. शेकडो वर्षांच्या त्या परंपरेनं तिच्या मनावर कोरले होते—

'असो स्मशानीची राणी ! पतिगृही पत्नी राणी !' ती त्या लेण्यात सुवात होती. त्यातून बाहेर पडण्याची तिला आतापर्यंत आवश्यकताच वाटली नव्हती; पण फुलाने ठरविले आपण नमते फुलून बसायचे तरी ते कधीच शक्य नसते. ऊन त्याला चटके देते. पाऊस त्याला झोडपून काढतो. मृदुला त्या लेण्यातून बाहेर पडली होती. म्हणजे सतीश या व्यक्तीवरचा तिचा विश्वास उडाला असे नाही; पण पती—पत्नीचे अतूट नाते ! ज्या जमिनीवर ती उभी होती ती जमीनच हादरू लागली. मग 'पतिगृही पत्नी राणी' या सुवचनाला आपोआप तडे गेले. ज्या परंपरेनं ते सुवचन सांगितले होते त्याच परंपरेनं तिला बजावलं होतं, 'साप म्हणू नाही घाकला, नवरा म्हणू नाही आपला!' आता ते बजावणंच तिच्या कानात घणघणू लागलं. ती व्याकूळ झाली.

अंधार पसरला होता. बाकीची सगळी-जणं झोपून गेली. मृदुलाच जागी तळमळत होती. अंधाराच्या पार्श्वभूमीवर तिला काय काय दिसत होतं — नाडकर्णी शीलाला मिठीत घेऊन बायकोला सांगत होता, तू मला नको आहेस — मिसेस कर्णिकांनी केलेल्या चाइनीज डिशचं सतीश भरभरून कौतुक करीत होता — संजीवकुमार—सारिका कॉलेजमध्ये गप्पा मारीत होते. घरी शर्मिला त्याच्या कपड्यांना इस्त्री करीत होती — 'काहीही म्हण अफेअरमध्ये थ्रिल असतं मृदुला' — उषाचा नवरा गोऱ्या बायको-बरोबर पार्टीच्या झगमगाटात मद्य घेत होता—'घटस्फोट' हा शब्द आपल्याकडेही अस्तित्वात आहेच — सतीश मिसेस कर्णिकला म्हणत होता, 'चला ऑफिसपर्यंत ड्राइव्ह करतो मी तुम्हाला' वर्तमानपत्रातली बातमी 'मैत्री—करार' करता येतो — एक कोंबडा त्याच्या मागे अनेक कोंबड्या — 'साधी दिसणारी माणसं असलं काही तरी करून जातात — कृष्णाला रुक्मिणी मिठासारखी आवडायची; पण बाकीच्या सगळ्यासुद्धा कशाकशासारख्या आवडायच्याच की — सगळी चित्रं, आवाज अगदी कल्लोळ करीत एकमेकात मिसळून गेले होते. बाकी सगळं घर कसं शांत झोपलं होतं. सकाळी ती म्हणाली होती, ही रक्ताची माणसं सतीशची पण माझं आणि त्यांचं रेशीम—नातंच त्या सगळ्यांच्या वर आहे. मला त्याच्यावाचून सुचत नाही. आता तिला वाटू लागलं छे: छे: माझंच नातं फार तकलादू आहे. ते तोडू म्हटलं तर तोडलं जाऊ शकतं. सतीशनं जरी लिहिलं असक्या बाईमुळं आईची आठवण होते, तमक्या मुलीचं गाण्याचं वेड सुलभा-सारखं आहे. तरीही त्या जराही हालल्या नव्हत्या. हा दुसऱ्या कुणाला आई मानेल ही भीती विमलाबाईंना कधीच नव्हती. रक्ताच्या नात्याला substitute नसतो. आई वारली आणि वडिलांनी दुसरे लग्न केलं तर आलेली स्त्री त्या मुलांची कायम सावत्र आई असते; पण त्या पुरुषाची मात्र सावत्र पत्नी नसते. जशी पहिली तशीच दुसरी ! शंभर टक्के substitute. तिची एक मैत्रीण म्हणायची, 'काय ग, बघायला येणारा प्रत्येक मुलगा माझा नवरा अशी कल्पना करता येते. लग्नानंतरही असं होऊ शकेल ! निष्ठा आपली संस्काराची म्हणून !' मृदुला तेव्हा तिला मूर्ख म्हणून हसली. आता या क्षणी ते शहाणपणाचं वाटू लागलं. मृदुलेला वाटलं उद्या सतीशनं मला सोडलं तर ही माणसं माझी रहाणार नाहीत. तात्या—सुलभा-आई कोणी कोणी माझे रहाणार नाहीत. मी इथं रहाणारच नाही ! उषा नाही का माहेरी निघून आली ? माहेर रक्ताचं ते काही तुटणार नाही ! तिनं विनीतच्या अंगावरून हात फिरवला. मग तिला जाणवलं, मी समजा गेले निघून तरी ही माणसं विनीतच्या पाठीमागं येतीलच. विनीतचं आणि त्यांचं नातं कधीच तुटणार नाही ! तिला वाटलं त्या घराशी ती जोडली गेली आहे विनीतच्या धाग्यानं, सतीशच्या नाही. विनीत तिचा होता. सतीशचा होता. त्यांचा सगळ्यांचा होता. त्या सगळ्यांमधला कधीच न तुटणारा शाश्वत दुवा होता. तिचा गोंधळ झाला. या इतक्या अशाश्वत, तकलादू नात्यातून या अशा शाश्वत नात्याचा जन्म होतो ! शतकानुशतकं हे चक्र सुरू आहे. की, की पुढे जन्म घेणाऱ्या या शाश्वत नात्यामुळं आधीच्या अशाश्वतालाही एक शाश्वती येतेच ? हे काहीच खरं नाही. कारण कधीकधी हा नवा जन्म होत नाही तरीही माणसं अगदी एकरूप झालेली दिसतात, तर कधीकधी हे शाश्वत नातं निर्माण होऊनही त्याला जन्म देणारे दूर जातात !

माणसाचं मन ! माणसाचं मन ! माणसाचं दैव ! माणसाचं दैव ! भोवतालचा अंधार अगदी गर्द होता. तिचे डोळे जड झाले. स्वप्नात ती विनीतला घेऊन विमानात बसली होती. खिडकीतून खाली पहाताना तिला सगळं अगदी पोकळ पोकळ वाटत होतं. खूप भीती वाटत होती. आधार ! आधार ! ती म्हणत होती. कोणी तरी सांगत होतं, विमानाला जमिनीचा आधार नसतोच; पण ते सुरक्षित पोचणार आहे. अपघात फार क्वचित होतो ! O




‘ हिचं लग्न करायचं ’
असा निर्णय वडील माणसांनी
घेतल्यावर आमच्यातल्या
संघर्षाला तोंड लागलं…

●

**नीलिमा देशपांडे**

‘ तू लग्न का करत नाहीस ?’
हा प्रश्न आजवर अनेकांनी अनेक संदर्भात मला विचारला आहे. प्रश्न विचारणाऱ्या व्यक्तीच्या समजून घेण्याच्या कुवतीप्रमाणं मीही वेळोवेळी वेगवेगळी उत्तरं दिली आहेत; पण– आज मात्र हा प्रश्न मीच मला स्वतःला विचारते आहे. म्हणजे थोडासा आपणच आपला शोध घ्यावा असा प्रयत्न करतेय. कशासाठी ?

एखादा निर्णय आपण घेतो तो कधी विचारपूर्वक तर कधी त्या त्या वेळी सामोऱ्या येणाऱ्या परिस्थितीमुळे नाइलाज होतो म्हणून. आपले निर्णय वेळोवेळी पाहून, पारखून घेणं अशा वेळी

आवश्यक ठरतं! थोडंसं सिंहावलोकन केलं की, त्या मार्गावरचे खाचखळगे लक्षात येतात आणि पुढील मार्गाविषयी विचार करता येतो.

लग्नाबद्दलच्या माझ्या पूर्वीच्या आणि आजच्या अपेक्षांमध्ये बदल झाला का? कशामुळे? अशा प्रश्नांचा गुंता या विचारामागे आहे. मी यापुढे लग्न करणार की नाही? केलं तर त्यामागील भूमिका काय असेल? हा भागही यामध्ये येतोच.

एक सर्वांत प्राथमिक आणि तेवढीच महत्त्वाची गोष्ट म्हणजे रूढार्थाप्रमाणे चारचौघींसारखा चिमणा-चिमणीचा संसार ही कल्पना माझ्या व्यक्तिमत्त्वाला, स्वभावाला मानवण्यासारखीच नाही. अगदी प्रारंभापासूनच मी कधी श्रीमंत, सुशिक्षित, पगारदार, प्रतिष्ठित अशा पतीची आणि भौतिक समृद्धी असलेल्या संसाराची स्वप्नं पाहिली नाहीत. सामाजिक ऋणाची जाणीव असल्यानं ते फेडण्यासाठीच काही तरी करावं आणि माझे हे विचार समजावून घेऊन त्यात मला सहकार्य देणारा पती असावा ही साधी, सरळ अपेक्षा होती.

त्यामुळं 'हिचं लग्न करायचं' असा निर्णय वडील माणसांनी घेतल्यावर आमच्यातील संघर्षाला तोंड लागलं! नोकरी, घरदार, शिक्षण यापलीकडे काही तरी शोधण्याचा अट्टाहास घरच्यांना तापदायक वाटू लागला. हुंडा द्यायचा नाही, लग्नासाठी जास्त खर्च करायचा नाही या माझ्या अटी घरच्यांना जाचकच वाटत होत्या. अत्यंत संवेदनाक्षम अशा वयात लग्न ठरविण्याची एक बैठक मी पाहिली. बाजारभाव करतात तशी हुंड्याची चर्चा ऐकली, हुंड्यापायी ते लग्न मोडलेलं पाहिलं. या सर्व घटनांचा फार खोल परिणाम माझ्या नकळत माझ्यावर झाला.

'मुलगी दाखविणे' हा प्रकार तर प्रथमपासूनच मला चीड आणणारा; पण सुरुवातीच्या काळात मी फारसा विरोध करू शकले नाही. मात्र एक-दोन प्रसंग असे अनुभवले की, त्यानंतर मी सगळ्यावर बहिष्कारच घातला. एम. ए. करतेय हे माहीत असूनही माझ्यासमोर वाचण्यासाठी वर्तमानपत्र टाकले गेले तेव्हा माझा संताप मी कसा आवरला होता हे मलाच माहीत!

आश्चर्य म्हणजे माझ्या आईवडिलांना यात अपमानास्पद असं काही वाटलंही नाही. दुसऱ्या एका प्रसंगी 'सालंकृत कन्यादान करून द्या!' असा निरोप आल्यावर मीच नकार देऊन माझा विरोध नोंदवला.

असे अनुभव घेत-घेतच लग्न, पती, त्यानंतरचे सहजीवन याविषयीचे माझे विचार ठाम आणि स्पष्ट होत गेले. रूढ विवाहपद्धतीमध्ये आपल्याला पाहिजे तसा पती मिळणं अशक्यच आहे याची स्पष्ट जाणीव झाली. याशिवाय माझी मतं, माझे विचार यांची चौकशी करण्याइतकं सौजन्य मला एकाही मुलाकडे वा त्याच्या आई-वडिलांकडे आढळलं नाही. मला शिवण, भरतकाम येतं की नाही, स्वयंपाक येतो का याविषयी त्यांना उत्सुकता होती; पण माझं आयुष्य कसं असावं याबद्दलचे माझे विचार त्यांना आवश्यक वाटत नव्हते. म्हणजेच स्त्रीत्वाविषयीच्या त्यांच्या ठाम भूमिका होत्या. माझ्या विचारांना अनुभवांची पार्श्वभूमी असल्यानं मी पुढं ठाम भूमिका घेतली आणि माझ्या विचारांशी सुसंगत असणाऱ्याशीच मी लग्न करेन, अन्यथा मला लग्नाची गरज नाही असा निर्णय घेतला.

या निर्णयानंतर अर्थातच घरात मोठं वादळ उठलं. भावनांना आवाहन करण्याचे बरेच प्रयत्न वडील माणसांकडून झाले. वेगळ्या वाटेनं चालताना मला होणारा त्रास मी आधीच गृहीत धरला होता; पण वडील-माणसांना 'समाज काय म्हणेल' याची काळजी माझ्या सुखापेक्षा अधिक होती. त्यांना समाजाकडून, नातेवाइकांकडून झालेल्या त्रासाचा राग त्यांनी बरेचदा माझ्यावर काढला. प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष दडपण माझ्यावर आणण्याचे प्रयत्न केले. 'म्हातारपणी तुला कोण' असा बागुलबुवाही माझ्यासमोर उभा केला; पण भावनांच्या आहारी न जाण्याचा स्वभावविशेष असल्यानं आणि निर्णय विचारपूर्वक घेतलेला असल्यानं या भावनिक दडपणाला मी बळी पडले नाही.

या दडपणामुळं माझं मानसिक स्वास्थ्य अर्थातच बरेचदा ढळत असे. बुद्धिबळात समोरच्याची चाल आधीच ओळखून आपली चाल खेळावी लागते. याचा प्रयोग मला बरेचदा करावा लागला.

मला सतत असं वाटतं की, मुली सुखी-समाधानी व्हाव्यात म्हणून त्यांचं लग्न करण्यापेक्षा आपली जबाबदारी पूर्ण करण्याची अधिक घाई वडील माणसांना झालेली असते. 'एकदा तुझं लग्न झालं की आमची जबाबदारी संपली' हे उद्गार सर्वच मुलींना ऐकावे लागतात. कोणतीही नवी गोष्ट करायचं मुलीनं ठरवलं तर 'लग्नानंतर नवऱ्याच्या घरी काय करायचं ते करा.' असं म्हणून मुलीला गप्प बसवलं जातं. मुलीचं स्वतंत्र व्यक्तिमत्त्व कोणत्याही प्रकारे घडू नये अशीच आमची कौटुंबिक आणि सामाजिक रचना आहे.

मी साधारणपणे आठवीपासूनच शिक्षणाच्या निमित्तानं कधी वसतिगृहात, कधी पेइंग गेस्ट म्हणून, कधी स्वतंत्र जागा घेऊन घराबाहेर राहिले. साहजिकच माझं स्वतंत्र व्यक्तिमत्त्व विकसित झालं. लहान-मोठ्या, बऱ्या-वाईट प्रसंगांना तोंड देण्याची, निर्णय घेऊन ते अमलात आणण्याची माझी प्रवृत्ती या घराबाहेरच्या वास्तव्यामुळं अधिकच विकसित झाली. त्यामुळं समर्पित वृत्ती, दुसऱ्यावर अवलंबून राहणं, आपल्या दुर्बलतेचं भांडवल करणं या गोष्टी मला कधीच जमल्या नाहीत आणि आज विसाव्या शतकाच्या शेवटीसुद्धा स्त्रीचं इतकं स्वतंत्र स्वयंपूर्ण होणं समाजाला मान्य होत नाही, किंबहुना आवडत नाही असा माझा अनुभव आहे.

लग्नाबद्दलचे, त्यानंतरच्या आयुष्याबद्दलचे माझे विचार अधिक ठाम झाले ते मैत्रिणींच्या लग्नानंतर. माझ्या कोणत्याही मैत्रिणीचं जीवन लग्नानंतर विकसित झालं नाही. लग्नापूर्वीचं आपलं कर्तृत्व, आपले विचार, आपली ध्येयं, आपल्या आवडीनिवडी त्या पूर्णपणे विसरल्या. इतकंच नव्हे तर त्याबद्दल त्यांना अजिबात खंत वाटत नाही हे मला जाणवलं. मी अधिकच अंतर्मुख झाले नाटकात सुरेख काम करणारी, मधुकर तोरडमलांसारख्या अभिनेत्याकडून अभिनंदन स्वीकारणारी माझी एक मैत्रिण आता मराठीतील उत्कृष्ट नाटकं पाहूसुद्धा शकत नाही! अर्थशास्त्रात विलक्षण गती असणारी दुसरी मैत्रिण घरखर्च मांडण्याइतकाच अर्थशास्त्राशी संबंध ठेवून आहे. उत्तम आर्किटेक्ट म्हणून नाव कमावणारी आणखी एक मैत्रिण आता मुलाला चित्र काढून देऊन आपली तहान

भागवते. असे का ? लग्नापूर्वीच्या आपल्या आवडीनिवडी, आपले नाद, कार्यक्रम पुरुष पूर्ववत् सुरू ठेवू शकतो; पण ती सवलत स्त्रीला मिळत नाही. हे योग्य आहे का ?

माझ्या मते लग्नाचा अर्थ एकाने समर्पण करणे आणि दुसऱ्याने ते स्वीकारणे असा आणि इतकाच नसून दोघांनी एकमेकांच्या व्यक्तित्वविकासाला पूरक होऊन समृद्ध सहजीवन जगणे असा आहे. स्त्रीही शिकलेली आहे, तिला विचार करता येतो,स्वतःचे स्वतंत्र मत असू शकते, याची फारशी जाणीव आजही मला समाजात दिसत नाही.

स्त्रीस्वातंत्र्याची टोकाची भूमिका मला मान्य नाही. स्त्रीकडे मातृत्वाचा स्वाभाविक गुणविशेष असल्याने पुरुषापेक्षा वेळप्रसंगी तिला अधिक तडजोडी कराव्या लागतात ही वस्तुस्थिती मी स्वीकारलेली आहे. विशेषतः पुढील पिढीवर सुयोग्य संस्कार करणे ही स्त्रीची प्रवृत्ती ठरते. स्त्रीस्वातंत्र्याची आधुनिक कल्पना स्वैराचाराकडे आणि अनिर्बंध स्वातंत्र्याकडे झुकते असं मला वाटतं म्हणून मला ती मान्य नाही; परंतु स्त्रीचं 'स्वतंत्र व्यक्तिमत्त्व समाजानं मान्य केलं पाहिजे हा मात्र माझा प्रथमपासूनच आग्रह आहे आणि तो चुकीचा आहे असं अद्यापही मला वाटत नाही. कमवणारा पुरुष आपल्या इच्छेप्रमाणे पगारातली काही रक्कम खर्च करू शकतो. हीच सवलत स्त्रीला का नसावी ? तिला तिच्या पगारातला काही भाग समाजासाठी, स्वतःच्या आवडीनिवडींसाठी किंवा आई-वडिलांसाठी खर्च करावासा वाटला तर पतीची परवानगी का लागावी ? पण असे होत नाही. पत्नीने प्रत्येक गोष्ट आपल्या संमतीने, इच्छेप्रमाणे करावी अशीच बहुसंख्य पुरुषांची इच्छा असते. पुरुषप्रधान संस्कृतीमध्ये यापेक्षा वेगळे घडण्याची अपेक्षाच नाही.

माझ्या लग्नाच्या निर्णयामागे 'करिअर'चा विचार अर्थातच आहे. आज ज्या क्षेत्रात, ज्या वर्तुळात मी काम करते, तिथं मी माझा स्वतःचा ठसा निर्माण केला आहे. माझ्यापुढं निरनिराळ्या संधी हात जोडून उभ्या आहेत. अशा वेळी फक्त लग्नासाठी या सर्वांवर पाणी सोडण्याची माझी तयारी नाही. शिवाय या क्षेत्रात पदोपदी पुरुषांबरोबर वावरणे, त्यांच्याशी बोलणे, त्यांच्याबरोबर हिंडणे या गोष्टी अपरिहार्य आहेत. अशा वेळी पत्नीवर विश्वास ठेवणारा आणि तिला समजून घेणारा पती मिळणं कठीणच !


इथे 'करिअर म्हणजे नोकरी' असं चुकीचं समीकरण मात्र मी मांडणार नाही. नोकरीशिवायही 'करिअर' करता येते; वाढवताही येते. एखाद्या विषयाचा, कार्याचा ध्यास घेणं, त्यासाठी स्वतःला झोकून देणं हाही माझ्या मते 'करिअर'चाच भाग आहे. त्यामुळं अशा 'करिअर'ची संधी मिळाली तर पुढचा-मागचा विचारही न करता मी नोकरी सोडून त्या कार्यात स्वतःला झोकून देईन !

अर्थात माझ्या या अपेक्षा पूर्ण करणारा पती मिळणारच नाही असं मला वाटत नाही. तशी शक्यता कमी असली तरी मी पूर्णपणे नाकारीत नाही आणि या अपेक्षा पूर्ण झाल्या तर मी लग्न करेनही. कारण लग्न न करण्याचा काही माझा निश्चय नाही. मात्र त्यासाठी माझ्या मार्गाबाहेर मात्र मी जाणार नाही. या मार्गानं जाताना कोणी असा परिचित भेटला, मित्र झाला, दोघांनाही 'लग्न करावं' असं वाटलं तर मी लग्न करेन; पण तसं झालं नाही तरी मला वाईट वाटणार नाही. आपलं आयुष्य कसं घालवायचं याचा निर्णय मी खूप विचारपूर्वक घेतला आहे. माझ्या या आयुष्यासकट मला सामावून घेणारा पती भेटला तरी उत्तम आणि नाही भेटला तरी खंत नाही ! ○

*With Best Compliments From :*

**PAULSON PAINT CELLULOSE WORKS**

*Factory :* Dr. Choith Ram Gidwani Road,
Behind R. K. Studio, Chembur,
BOMBAY - 400 074



आपापला राजपुत्र सुरुवातीला
सापडतोच असं नाही.
कधी कधी राजपुत्राच्या वेषात
चक्क हुजऱ्या असतो ! . . .

•

डॉ. शुभदा शेळके

# पूर्णांक अपूर्णांक

मला समजायला लागल्यापासून चांगलं आठवतंय, माझ्या आई-बाबांनी त्यांची मतं, विचार आमच्यावर कधी चुकूनसुद्धा लादले नाहीत. इतकंच काय पण आम्हा आवडींबद्दलही, अमुक एक आवडलंच पाहिजे, अमुक एखादी गोष्ट केलीच पाहिजे किंवा परीक्षा जवळ आलीय अभ्यास केलास की नाही ? वगैरे आग्रहसुद्धा धरलेले आठवत नाहीत. हे अगदी सगळ्या बाबतीत, मग तो एखादा खेळ असू दे, छंद असू दे, अभ्यास असू दे किंवा मित्र-मैत्रीण असू दे. त्यांनी आम्हाला आमच्या बुद्धीनं, मतानं 'निवड' करायचं स्वातंत्र्य दिलं. याचं महत्त्व मला तीव्रतेनं लक्षात आलं ते मी माझ्या मित्रांशी मैत्री केल्यावर. तेव्हा मी दहावी-अकरावीत असेन. माझी आई देखील स्वतंत्र वृत्तीनं

वाढली होती. तिनं सांगितलं, हे बघ मित्र असणं गैर नाहीत; पण आपल्या समाजात ते चालत नाही. तेव्हा तुझे मित्र वगैरे जे कोणी असतील ते इथं घरी येऊ देत. घरात तुम्ही गप्पा मारा; पण रस्त्यात उभं राहून तासन् तास बोलत राहिलेलं मला काही आवडणार नाही. कारण लोकांची तोंडं काही धरता येत नाहीत. आईसुद्धा माझ्या मित्रांशी अगदी मोकळेपणानं वागायची. त्यांचं खाणं-पिणं, एखादा पदार्थ विशेष केला की त्यांना आवर्जून बोलवायची, एखादं कामही हक्कानं सांगायची. त्यामुळं आजूबाजूला इतरत्र जसा 'मुलगा-मुलगी' म्हणून त्यांच्या मैत्रीला एक चोरटेपणाचा वास अपेक्षित होता तसा आमच्या बाबतीत कधी प्रश्न उद्‌भवला नाही.

मला वाटतं, स्वातंत्र्य ही चीजच अशी आहे की, तिचा आतला पापुद्रा हा नेहमीच जबाबदारीचा असतो आणि लहानपणापासूनच स्वातंत्र्य असं अंगवळणी पडत गेलं की, आपलं अंतर्मन त्याची जबाबदारीही अचूक पेलत जातं. अर्थात या दोन्ही गोष्टी इतक्या स्वाभाविकपणे घडतात की त्याचं नेमकं असं भानही नसतं.

पुढे कॉलेजमध्ये गेल्यावरही आर्टस सायन्स अशा भिन्न शाखांतून आपआपला मित्रपरिवार वाढल्यानंतरही, एकाच ठिकाणी रहात असल्यानं आमची मैत्री कायम राहिली. इतकंच नाही तर उत्तरोत्तर वाढत गेली. मला कॉलनीत मैत्रिणी नसून मित्रच असल्यामुळं आमच्याबद्दल भरपूर चर्चाही व्हायची. मी स्वतः जेव्हा याबद्दल विचार करायला लागले तेव्हा माझ्या असं लक्षात आलं की, मला, माझ्या बरोबरीच्या मुलींच्या विश्वात बिलकूलच रस नव्हता. भरतकाम, विणकाम, फॅशन्स, प्रसाधनं यापेक्षा कुठल्या तरी विषयावर मोठमोठ्यानं वाद घालणं, चर्चा करणं, हिंडणं, भरपूर वाचणं यात मला खरा रस वाटायचा. त्यामुळं कोणताही नवा अनुभव हा माझ्या मित्रांना मी जितक्या सहजपणानं मोकळेपणानं सांगत असे तोच मैत्रिणी म्हणवणाऱ्यांना सांगताना मला नेहमी प्रश्न पडायचा. हळूहळू असं जाणवत गेलं की, दोन मित्र किंवा दोन मैत्रिणी यांच्यापेक्षाही मित्र-मैत्रीण हे नातं अधिक जवळकीचं आहे. कारण त्यात दोन वेगळ्या विचारविश्वांची, वेगळ्या भावविश्वांची देवाण-घेवाण असते. यातले अहंपणाचे तरतम भाव हे अगदी भिन्न असतात आणि म्हणूनच ते एकमेकांचे उणे-अधिक, वेगवेगळ्या पातळ्यांवर सहज समजू शकतात. अगदी शारीरिक पातळीशिवाय एकमेकांना जिज्ञासा, ज्ञान, संवेदनक्षमता पुरवू शकतात.

म्हणजे असं, एवढ्या तासन्‌तास आम्ही काय गप्पा मारत होतो ? तर पुढच्या काही महत्त्वाकांक्षा, भवितव्याचे काही आडाखे, आयुष्याचं तेव्हा जाणवलेलं तत्त्वज्ञान, त्याचबरोबर एखादं आवडलेलं न आवडलेलं पुस्तक, नाटक, सिनेमा, कविता, भाषण, खेळ, नट-नट्या वगैरे असंख्य लहान-मोठ्या गोष्टींमधून आम्ही एकमेकांना वाढायला मदत करत होतो. यातूनच आमच्या बुद्धीच्या, भावनेच्या, विचारांच्या, समंजसपणाच्या अनेक पातळ्या विस्तार पावत होत्या. आमच्यापैकी प्रत्येकजण आपआपल्या क्षेत्रातील आवडीचे अनुभव एकमेकांना सांगायला उत्सुक असे. यात वादावादी, भांडाभांडी होऊनही आमच्या मतांची, आग्रहांची, तत्त्वांची आणि अनुभवांची देवाण-घेवाण होत होती.

शेवटी व्यक्तिमत्त्व म्हणजे तरी काय ? केवळ दिसणं नव्हे तर असणं; हसणं, बोलणं, चालणं या शारीरिक क्रियांबरोबरच, विचार करणं, भावनांचे बंध जपणं, काही एक मूल्यांनी आयुष्य जगणं आणि हे सर्व ज्या शरीराद्वारे एकतानतेनं व्यक्त होतं तेच व्यक्तिमत्त्व. म्हणजे आम्ही एकमेकांचं व्यक्तिमत्त्वच घडवत होतो. ही घडण फक्त स्वातंत्र्यापोटीच होत असावी. कारण माझ्या आजूबाजूला अनेकांना ते झगडून मिळवताना मी पाहिलंय; पण अशा वेळी लहानपण जर झगडण्यात गेलं तर नको त्या आडनिड्या वयात ते स्वातंत्र्य नेमकं मिळतं किंवा अचानक अनुकरणापोटी, उद्वेगापोटी असं स्वातंत्र्य लुबाडून घेतलं तरी त्याची जबाबदारीही पेलता येत नाही, ओळखताही येत नाही. इथं मात्र मग फक्त तोलच जाऊ शकतो. असंही आमच्या आसपास घडत होतं.

ग्रॅज्युएट झाल्यानंतरही लग्नाचा वगैरे काही खास असा विचार केला नव्हताच किंवा माझ्या तिन्ही मित्रांपैकीच कोणाशी तरी करावं असंही काही पक्कं ठरवलं नव्हतं. मात्र त्यापैकीच एकाशी भावनिकदृष्ट्या जरा जास्त वेवलेंग्थ जुळत होती एवढं खरं. माझ्या घरी मला याही निवडीचं पूर्ण स्वातंत्र्य होतं. त्या वेळी माझ्याच कॉलेजमधील, माझ्याच विषयातील एका अत्यंत बुद्धिमान आणि तरल संवेदनक्षमता असलेल्या एका मित्रानं मला लग्नाबद्दल विचारलं. तेव्हा मला एक गोष्ट तीव्रतेनं जाणवली की, कितीही जवळची आणि चांगली मैत्री असली तरी त्या मैत्रीला शरीरपातळीवा संपर्क येऊ पहातो म्हटल्यावर माझं मन ती कल्पनाच स्वीकारू शकत नाही आणि त्याच क्षणी हेही जाणवलं की, वेवलेंग्थ जुळणारा माझा मित्र आणि मी बऱ्यापैकी एकमेकात गुंतलेले आहोत. याचाच अर्थ, पुष्कळदा आपल्याला काय हवंय, आपल्याला काय नकोय हे स्पष्ट झालं की, त्यावरून जास्त चटकन कळतं. म्हणूनच माझ्या कॉलेज–मित्राला त्याच्याबद्दल नितांत आदर असूनही त्याच्या बुद्धिमत्तेचा मोह दूर सारून मी स्पष्ट नकार दिला. मी आणि माझ्या मित्रानं तेव्हाच विवाहाचा निर्णय घेतला !


माझ्या दृष्टीनं ही 'निवड' आयुष्याच्या अतिशय महत्त्वाच्या बाजूशी निगडित असते. कारण विवाहामध्ये शारीरिकपातळी ही अपरिहार्य असते. समजायला लागल्यापासून प्रत्येकाच्या मनात आयुष्याच्या जोडीदाराबद्दल 'राजपुत्राची' किंवा 'परी' ची एक प्रतिमा असते मुख्यतः ही संकल्पना त्या त्या व्यक्तीच्या पूर्णत्वाच्या कल्पनेशी संबंधित असते. कारण व्यक्ती ही स्वतःचे अपूर्णत्व ओळखून असते आणि म्हणूनच प्रेम हे त्या पूर्णपणाच्या संकल्पनेबद्दल असतं. व्यक्ती गेल्यावरही प्रेम कायम रहातं त्याचं कारणही हेच. आपल्या अंतर्मनामध्ये आपल्याबरोबरीनं ही भावप्रतिमा वाढत असते. याची संपूर्ण जाणीव त्यामुळं व्यक्तीच्या फक्त अंतर्मनालाच असते. एवढ्याचसाठी ही 'निवड' केवळ बौद्धिक किंवा भावनिक नसून, ती एकात्म अशा आत्मिक स्वरूपाची असते, कारण त्यात शरीरमनासह संपूर्ण व्यक्तिमत्त्वच गुंतत असतं. 'Sex is not the cause, but an effect and an expression of a person's sense of his own Value हे Ayn Rand या लेखिकेचं मत अक्षरशः खरं आहे.

व्यक्तीचा लैंगिक दृष्टिकोण हा तिच्या जीवनाचं तत्त्वज्ञान सांगू शकतो. कारण ही 'निवड' म्हणजे भाव–प्रतिबिंबभावाचा सहजोद्गार असतो. म्हणजेच आपण निवडलेल्या व्क्तींमध्ये आपण आपल्या अंतर्मनात खोलवर दडलेल्या स्वतःच्याच भावप्रतिमेचं प्रतिबिंब पहात असतो. याच अर्थानं तो व्यक्तीमधल्या अपूर्णांकानं स्वतःच्याच पूर्णांकाचा घेतलेला शोध असतो. म्हणूनच तिच्या वैयक्तिक मूल्यमापनाचं ते एक परिमाण ठरतं. कारण त्यात काही मिळवण्यापेक्षा स्वतःचंच प्रकटीकरण व्यक्त होणं ही प्रक्रिया अधिक असते. त्यामुळंच शरीर–मन यात अंतर्विरोध राहूच शकत नाही. म्हणजे शरिराची आवड वेगळी आणि मनाची मूल्यं वेगळी असं असणं अशक्य आहे. ही सगळी गुंतागुंत अंतर्मन चोखपणे जाणून असतं म्हणूनच अशा निर्णयावाबत ते सतत सूचना करत रहातं. मला वाटतं आमच्या एकमेकांच्या निवडीचं खरं कारण हेच असावं. म्हणूनच जात, शिक्षणक्षेत्र, शारीरिक अनुरूपता इतकंच नव्हे तर प्रत्यक्ष आवडी–निवडीदेखील भिन्न असूनही आम्ही एकमेकांची 'निवड' केली ! एका अर्थी या गोष्टींमध्ये आम्ही एकमेकांशी तडजोडच केली; पण कशासाठी ? तर जे काही जीवनाचं अंतिम मूल्य आम्ही मानत होतो ते एक होतं. वेगवेगळ्या मार्गांनीही तिथं पोचायची धडपड, वाटेतल्या अडथळ्यांनी होणारी तडफड यांची जात एकच होती. एकमेकांबद्दलचे अनुच्चारित अभिमानाचे, आनंदाचे क्षण एक होते आणि व्यवहारातल्या पराभवाचीही जात एकच होती ! थोडक्यात आम्ही एकमेकांचे पूर्णांक होतो आणि सर्वांत महत्त्वाचं म्हणजे आम्ही दोघेही हे पुरेपूर ओळखत होतो. हे नातंच हिमनगाचं, दिसतं त्याच्या किती तरी पटींनी ते असतं. मात्र हे हिमनग प्रत्येकाला स्वतःच ओळखून, शोधून मिळवावे लागतात.

सर्वांनाच याची सहजपणे जाणीव असतेच असं नाही किंवा सगळ्यांनाच आयुष्याच्या सुरुवातीलाच आपआपले 'राजपुत्र' सापडतात असंही नाही. कित्येकदा केवळ आभास असतो तर कित्येकदा 'राजपुत्रांच्या' वेषात चक्क हुजऱ्या असतो ! म्हणूनच ही निवड अतिशय चोखंदळपणे, काळजीपूर्वक करावी लागते. आता माझ्या बाबतीत आम्ही एकत्रच लहानाचे मोठे झाल्यामुळं हे सुलभपणे घडलं; पण आपल्या प्रस्थापित लग्नपद्धतीत हे जरी कठीण वाटत असलं तरी अशक्य नाही. त्यासाठी स्वतःच्या अंतर्मनाची म्हणजेच पर्यायानं स्वतःची संपूर्ण ओळख मात्र असायला हवी. स्वतःला पूर्णपणे ओळखू शकणारी व्यक्ती ही नेहमीच तिच्या सहवासात येणाऱ्या व्यक्तीची अगदी कमी वेळातही पारख करू शकते !

इथं मला माझ्या मैत्रिणीचं एक उदाहरण आठवतं. खरं तर तिच्याच घटनेनं मला या गोष्टींवर विचार करायला प्रवृत्त केलं. एका साहित्यविषयक चर्चेला बऱ्याच वर्षांनी आम्ही एकमेकींना भेटलो. सहाजिकच चर्चेनंतर आम्ही एकमेकींना काय कसं चाललंय, कुठं होतीस, सध्या काय करतेस वगैरे नेहमीची प्रश्नोत्तरे करत उभ्या होतो. एवढ्यात एक सुशिक्षित वाटणारी स्त्री तरातरा तिथं आली आणि तिथंच जरा बाजूला उभ्या असलेल्या एका तरुणावर धावून जाऊन, तोंडानं अर्वाच्य शिव्या देत हातवारे करत मोठमोठ्यानं भांडू लागली. माझ्या मैत्रिणीनं चटकन् माझा हात धरून मला बाहेर नेलं आणि समोरून येणारी टॅक्सी पकडून आम्ही स्टेशनकडे निघालो. तिनं सांगितलं की, ती स्त्री ही त्या तरुणाची पत्नी होती. त्यांचा प्रेमविवाह होता आणि त्या शिव्या ती माझ्या मैत्रिणीला उद्देशून देत होती. हे ऐकून मी चांगलीच हादरले. त्यामागची कहाणी ऐकून तर मी सुन्नच झाले !

थोडक्यात सांगायचं तर त्याचं एकंदर स्वरूप असं होतं. माझी मैत्रीण ही माझ्यासारखीच स्वतंत्रपणे वाढली होती. आयुष्याच्या सुरुवातीलाच तिलाही तिचा 'राजपुत्र' गवसला होता; परंतु नंतर समव्यवसायी, समानधर्मी नाटकाबद्दलच्या आत्यंतिक आवडीच्या समांतरतेमधून या मुलाशी तिची मैत्री झाली. त्यांनी व इतर काही जणांनी मिळून आपल्या वसाहतीतील लहान मुलांसाठी काही नाट्यविषयक चळवळही सुरू केली. या सर्व मैत्रीला माझ्या मैत्रिणीच्या नवऱ्याची काहीच हरकत नव्हती; पण त्या मित्राच्या बायकोनं मात्र याचा विपर्यास करून घेऊन, घटस्फोटाची मागणी केली आणि एवढ्यावरही न थांबता वरील प्रकारांनी जाहीर तमाशे करायला सुरुवात केली.



तिच्या घरच्या सर्वांनी, माझ्या मैत्रिणीच्या घरच्या लोकांनी तिला समजावण्याचा खूप प्रयत्न केला; पण व्यर्थ ! आता या जाणून–बुजून केलेल्या अर्वाच्यतेला तोंड देणं माझ्या सुसंस्कृत मैत्रिणीला कठिण व्हावं यात काहीच नवल नाही ! प्रश्न आता एवढाच आहे की, कोणी कोणाच्या पातळीवर यायचं ? ती स्त्री जर समंजसपणे काहीच स्वीकारू शकत नसेल तर तिच्या बरोबरीनं माझ्या मैत्रिणीनंही असमंजस पातळीवर यायचं की, तिच्यासारख्या मूर्ख स्त्रीसाठी स्वतःचं आवडीचं कार्यक्षेत्र, नोकरी सर्व काही सोडून द्यायचं ?

मला वाटतं, 'स्वातंत्र्य' स्त्री-पुरुषांच्या आपआपल्या जोडीदाराबद्दलच्या कल्पना या मूलगामी जाणिवांबद्दलच प्रचंड स्वरूपात अज्ञान आहे. त्यामुळेच स्त्री-पुरुषसंबंध हे केवळ आणि फक्त शारीरिक पातळीवरच मोजण्याची चुकीची दृष्टी जोपासली जाते. यातूनच मग हे प्रश्न निर्माण होतात. कारण आपल्याकडे रूढीपरंपरेने स्त्रीत्वाची कल्पना ही 'कुटुंबकल्याण' संकल्पनेशी म्हणजेच पर्यायाने 'बळीच्या बकऱ्या'च्या संकल्पनेशी घट्ट जखडली गेली आहे. स्त्रीला स्वतंत्र अस्तित्व आहे. आर्थिक व बौद्धिक दृष्टीने स्वावलंबी झालेली स्त्री आज पुरुषाच्या बरोबरीनं सर्व क्षेत्रात आत्मविश्वासानं वावरते आहे. त्यामुळे त्यातून समव्यवसायी समानधर्मी पुरुषांशी मैत्री होणं अपरिहार्यच आहे.

स्त्रीबद्दलची परंपरागत संकल्पना आणि आजचं तिचं स्वरूप यातल्या अंतर्विरोधाची जाणीव मुळात स्त्रियांनाच फार कमी प्रमाणात आहे. आपल्या स्वतंत्र अस्तित्वाला काही अस्मिता आहे. ती जपणं, त्यासाठी स्वतःचा विकास करणं, स्वतःची बुद्धी चाल-

# श्री शारदा सहकारी बँक लि.

**मुख्य शाखा :**
पुणे–सातारा मार्ग
पुणे ४११ ०३७
दूरध्वनी–४७०९४७

**मुख्य कार्यालय :**
अजय अपार्टमेन्टस्, ४७/१ तावरे कॉलनी
पुणे ४११ ००९
दूरध्वनी–४७००५४

**शाखा :**
पाषाण
पुणे ४११ ००८

**पाचव्या वर्षी मिळविलेले नेत्रदिपक यश**

१) भांडवल – १.७५ कोटी
२) विविध ठेवी – १.६० कोटी
३) शेअर भांडवल – ०.०९ कोटी
४) कर्जे – १.५ कोटी

- ☐ आता १२% व्याज मुदतठेवीवर पाच वर्षे किंवा अधिक कालाकरिता.
- ☐ रु. ६,००० पर्यंत एक वर्षापेक्षा अधिक कालाविधीकरिता ठेवींवर आम्ही देत असलेल्या व्याजावर प्राप्तीकर बसत नाही.
- ☐ आकर्षक लहान बचत योजना ज्या कालांतराने योग्य गुंतवणूक ठरतात.





वून निर्णय घेणं, स्वतःच्या मतानं, विचारानं स्वतःचंच आयुष्य जगणं, निदान तसा प्रयत्न करणं याचीच मुळी जाणीव नसते. मधूनच 'स्त्रियांचं आयुष्य म्हणजे तडजोड गऽ बाई' या पारंपारिक सुराला त्या का? असा प्रश्न विचारू शकत नाहीत. याचा अर्थ तडजोडीला माझा आक्षेप नाही; परंतु जिथे स्वतःच्या अस्मितेचा, तत्त्वाचा किंवा अस्तित्वाचाच प्रश्न उद्‌भवतो तेव्हा कसली तडजोड आणि कशासाठी करायची? या आजपर्यंत टाळत आलेल्या प्रश्नांचा गंभीरपणे विचार करायची वेळ आता आली आहे. याचं कारण असं की, आपण कोण आहोत आणि आपल्याला नेमकं काय व्हायचं आहे? त्यासाठी काय हवंय याचाच कधी नक्की विचार केलेला नसतो. आजचे प्रेमविवाहही अयशस्वी होतात त्याचं मला वाटतं हे एक महत्त्वाचं कारण आहे.

मागच्या पिढीतल्या स्त्रियांनी, म्हणजे आपल्याच आई, मावश्या, आत्या वगैरेंनी संसारात आपलं स्थान दुय्यमच अशी भूमिका घेतली, त्यामुळंच त्या सुखी संसाराच्या सफल कहाण्या पारंपारिक लिपीमध्ये गिरवू शकल्या; पण आज स्वतःच्या प्रतिबिंबाची पुसटशी ओळख पटायला लागताच, असं जाणवायला लागलं की, परंपरेच्या या मुळाक्षरांची धूळपाटी सोडून पुढचं बरंच काही स्वतःचं स्वतःच शिकायला हवंय. या जाणिवेचा बरा-वाईट परिणाम कुटुंबसंस्थेवर होत आहे.

विवाहित किंवा अविवाहित प्रत्येकाला आपआपला 'राजपुत्र किंवा 'परी' शोधण्याचा मूलभूत हक्क आहे असं मी मानते. समजा एखाद्याचा हा प्रवास जर लग्नानंतरच सुरू झाला तर मला वाटतं घटस्फोट हा अपरिहार्यपणे येणारं वळण आहे. कारण घटस्फोट ही अवस्था अतिशय परिपक्व जाणिवेतूनच यावी लागते. केवळ शारीरिक, बौद्धिक, भावनिक मतभेद हे इतकं आणि सोपं घटस्फोस्टाचं उत्तर असू शकत नाही. व्यक्तीचं 'आत्मिक विश्व तिच्या अस्तित्वासह चिरडलं जात असेल तर मग ती स्त्री असो किंवा पुरुष, एकमेकांचं व्यक्तिमत्त्व असं कुस्करून जगत राहण्यापेक्षा विभक्त होऊन स्वतंत्रपणे स्वतःचं आयुष्य जगावं हेच बरं. हा निर्णय केवळ व्यक्तीचा आणि वैयक्तिक पातळीवरचाच असू शकतो. इथं समाजाचा काहीही संबंध येत नाही.

दोन व्यक्ति-मनांचा लिंग-वचन-वयातीत घडत आलेला 'सहज-संवाद' म्हणजे मैत्री हे जर मैत्रीच्या नात्याचं मूलभूत अशरीरी; लवचिक रूप मान्य केलं तर केवळ मैत्रीमुळं कुटुंबस्थंस्था हादरण्याचं काहीच कारण नाही आणि केवळ एवढ्याचमुळं ती तशी हादरत असेल तर असली कुचकामी कुटुंबसंस्था मोडलेलीच बरी. ठरवन, पाहून किंवा तथाकथित प्रेम जमून कोणत्याही प्रकारच्या विवाहात जोपर्यंत स्वतःची ओळख स्वतःला पटत नसेल तोपर्यंत संघर्ष हा अटळच आहे. म्हणूनच वैवाहिक निवड ही अतिशय डोळसपणानं केली गेली पाहिजे. त्यासाठी मुलामुलींच्या मैत्री-मेळाव्यातून, विवाहपूर्व स्नेहसंबंधातून, सहवासातून तोलून, पारखून आपआपल्या राजपुत्राची निवड केली पाहिजे. त्यासाठी परंपरा, समाज, आई-वडिलांची प्रतिष्ठा, पैसा वगैरे सर्व दुय्यम गोष्टी बाजूला सारून केवळ स्वतःच्या अंतर्मनाच्या सुप्तशक्तीवर पर्यायाने स्वतःवर विसंबून हे निर्णय घेतले गेले पाहिजेत. प्रसंगी चूक लक्षात आली तर निर्णय बदलण्याचीही तयारी असवी पाहिजे, तरच यातून नवी निकोप अशी कुटुंबसंस्था जन्माला येऊ शकेल. ज्यात 'व्यक्तिमत्त्वाला' अर्थ असेल आणि स्वतंत्र अस्मितेला अस्तित्व असेल. ○

*Best Compliments From :*

**D. K. ENTERPRISES**

5/2 ERANDAWANA
INGALE HOSPITAL
PUNE 411 004


# पश्चिम रंग

मी भोवताली अमेरिका पाहते आहे.
अंतरंगापर्यंत पोचते आहे
असे मुळीच नाही.
जे काही पाहते त्याची तुलना
आपल्या देशाशी होत राहते. . .

**मंजिरी सुभाष**

माझी आणि सुभाषची ओळख झाली. प्रेम जमले. आम्ही विवाह करण्याचे ठरविले. मी बी. ए. झालेली. सुभाष इंजिनिअर. त्याला अमेरिकेत जाण्याची संधी चालून आली. काही कारणाने विवाह न करताच तो अमेरिकेला गेला. त्याच्यानंतर दीड वर्षानं मी विवाह करण्यासाठी अमेरिकेला आले.

मला लग्नाकरिता पश्चिमेला यावे लागले. माझा पूर्वाश्रम पूर्वेकडे राहिला. इकडे अनेक नव्या गोष्टी पहायला मिळाल्या–मिळतात. अनुभवायला मिळतात. इतक्या नव्या गोष्टी की तिकडे बसून त्याची कल्पनाच करता येत नाही. इकडे एक एक गोष्ट पहाताना मनात येते, जगाच्या पाठीवर संस्कृतीचे रंग कसकसे बदलत जातात हे रोज जगाचा प्रवास करणाऱ्या आदिनारायणालाच ठाऊक! आम्ही ढगाच्या दुनियेतून उडत उडत अलगद येथे टपकणार आणि हा प्रवास इतका भर्रकन होतो की, आपलं Biological Clock देखील मागंच राहतं. भारतातल्या वेळेप्रमाणे भूक, तहान, झोप वगैरे शारीरिक गरजा भागवाव्या लागतात. हळूहळू शरीर जुळवून घेऊ लागते आणि मग मानसिक गरजांची तीव्रता जाणवू लागते प्रथम उणीव भासते ती माणसांची. त्यातून भारतातून निघताना झालेला तो गोंधळ आणि अनुभवास आलेला मतामतांचा गलबला ! इकडे आल्यावर एकदम सुतकी वातावरणात आल्यासारखं वाटतं. मुंबईत म्हणजे काय बाजारात गेले तरी पंधरावीस ओळखीचे चेहरे अगदी सहज दिसतात. काही ना काही बातचीत होते आणि मनाला चालना मिळते. इकडे मैलभराचा फेरफटका मारला तरी एकसुद्धा माणूस दिसण्याची मुष्कील. तिकडे बाजार, रेल्वेस्टेशन, बसस्टॉप अशा अनेक ठिकाणी माणसे अचानकपणे भेटू शकतात. इकडे प्रवासाचे मुख्य साधन म्हणजे मोटार. कोणाला भेटण्यासाठी अर्धा-अर्धा–एकेक तास ड्राइव्ह करायला लागते ! बाजाराच्याऐवजी मोठं सुपरमार्केट जिकडे एका छताखाली संपूर्ण संसाराकरता खरेदी करता येते. या आणि अशा प्रकारच्या जीवनपद्धतीमुळं एखाद्या खास कारणाशिवाय माणसं एकत्र येणे कठीण होते आणि आपल्यासारख्या लोकांना ते असह्य होते. इथल्या वेगळेपणाला आल्यापासून सुरुवात झाली.




मी विवाह करण्यासाठी अशी परदेशी आले त्यामुळे माझ्या सांसारिक आयुष्याला

काही वेगळीच सुरुवात झाली. मी येथे आलेल्या दिवशीच सुभाषच्या मित्राच्या ( भारतीय मित्राच्या ) घरी मला आणि सुभाषला एकाच खोलीत झोपायला लागले. इकडे आल्यावर मी सुभाषची पत्नी असे गृहीतच धरले गेले. मी मात्र मनाने अजूनही तसे मानले नव्हते. मी येथे केवळ प्रवासी म्हणून आले होते. माझ्याजवळ पर्मनंट व्हिसा नव्हता. लग्न तर करायचे होते. पुढे काय काय घडणार आहे याची कल्पना नसल्याने मी अगदी गोंधळले होते. सुभाष बऱ्याच काळाने भेटत असल्याने दोघांनाही बुजल्यासारखे झाले होते. त्यामुळे संपूर्ण रात्रभर एकमेकांविषयी काही काही आपलं बोलतच राहिलो. लग्न करण्यासाठी सुभाषच्या लॉयरने दोनतीन महिने वाट पहाण्याचा सल्ला दिला. तितके दिवस त्याच्या मित्राकडे रहाणे अशक्य होते. त्यामुळे आम्ही दोघे स्वतंत्र घरात राहू लागलो. लग्नाआधीच अशी संसाराला सुरुवात झाली. मग लग्नाची कागदपत्रे म्हणजे केवळ कायदेशीर बाबतीकरता. परिस्थिती अशी होती की, मला त्याचे काहीच वाटले नाही घरीसुद्धा माझ्या आईवडिलांनी काहीच आक्षेप घेतला नाही. याचे कारण अर्थातच सुभाषवरचा विश्वास आणि परिस्थिती. सुभाषच्या आईवडिलांना मात्र या प्रकाराची काहीच माहिती नाही. त्यांना कदाचित अजूनही लग्नाआधीच आम्ही एकत्र राहू लागलो याची माहिती नसेल आणि मला ते मुद्दाम सांगण्याइतके महत्त्वाचेही वाटत नाही.

इकडे लग्नाच्या आधी रक्त–परीक्षा (Blood–test) करावी लागते. त्यानंतर तो रिपोर्ट घेऊन County office मध्ये जायचे आणि मॅरेजलायसन घ्यायचे. त्यानंतर एका महिन्याने लग्न करायचे–म्हणजे कोर्टात जायचे आणि न्यायाधिशापुढे शपथा घेऊन अंगठ्या घालायच्या. याप्रमाणे मी आणि सुभाष कोर्टात गेलो. सुभाषचा मित्र, त्याची बायको आणखी एक–दोन मित्र आणि ऑफिसमधली मैत्रीण असे सहा–सात जणांचे वऱ्हाड. एकंदर रंग पहाता मी माझ्या लग्नाची म्हणून आणलेली साडी भडक दिसेल म्हणून नेसलेच नाही ! इरकल नेसून गेले. मंगळसूत्र आणि सर्व सौभाग्यालंकार लग्नाआधीच घातलेले तरी बाकी लोकांपेक्षा आमची स्थिती खूपच बरी होती. सुभाषच्या त्या मित्राचं लग्न झालं तेव्हा नवराबायको दोघेही जीन्समध्ये. दुसऱ्या एका मित्राच्या लग्नाच्या दिवशी नवऱ्या मुलीची ड्रायव्हिंगची टेस्ट. ती बिचारी पहाटे उठून रूल्स अँड रेग्युलेशन्स पाठ करीत होती. लग्नानंतर सुभाषच्या मित्रांनी एका चायनीज रेस्टॉरन्टमध्ये लंच दिले आणि घरी येऊन आम्ही मधुचंद्रासाठी लॉसएन्जलसच्या मार्गाला लागलो.

लॉसएन्जलसहून परत आल्यावर मात्र लग्नाचा समारंभ नाही; पण पार्टीचा मात्र आग्रह सर्वांकडून होऊ लागला. गेलॉर्ड नावाच्या इंडियन रेस्टॉरन्टमध्ये पार्टी द्यायचे ठरले. पार्टीचे स्वरूप अगदी औपचारिक ठरविले होते. त्यातून या अमेरिकन लोकांना आपले पदार्थ आवडतात की नाही ही शंका. त्यामुळे बऱ्याच निरुत्साही आणि शंकित मनांनी आम्ही पार्टीला गेलो; परंतु ते लोक इतके मित्रत्वाने ( firendly ) वागत होते की, पार्टी अगदी अनौपचारिक होऊन गेली. अमेरिकन समाजाची ही पहिली ओळख छानच वाटली. सुभाषच्या कंपनीच्या प्रेसिडेंटची बायको माझ्याशी खूप गप्पा मारीत होती. तिला माझे खूप कौतुक वाटत होते. चार महिन्यांपूर्वी मी या देशात आले आणि Now I was hosting the party. माझ्या साडीची तिला गंमत वाटली. आपली साडी म्हणजे या बायकांना रेडिमेड ड्रेस वाटतो. साधे पाच–सहा वार प्लेन कापड आपण अशा तऱ्हेने गुंडाळतो हे ऐकून त्या चकित होतात.

इकडे लग्न करून इकडेच संसाराला सुरुवात केली ते एकार्थी बरेच वाटते. खरे म्हणजे जास्त पैसा नाही. ऐषआराम खूप करायला मिळतो असेही नाही; परंतु आम्हा दोघांना त्यातच मोठे समाधान आहे. कारण सगळ्याच गोष्टी स्वतंत्रपणे अगदी पहिल्यापासून सुरू करायच्या संपूर्ण जबाबदारी आपली. उपदेश करणारे कोणी नाही. त्यामुळे पहिल्यापासूनच काळजीपूर्वक वागले जाऊ लागले. सुभाष हाच मित्र, गाईड, उपदेशक सर्व काही बनला आणि दोघेच असल्याने इतकी जवळीक निर्माण झाली की, काही विचारायलाच नको ! मुंबईत असते तर तो माझा नवरा आहे म्हणून दुय्यम भूमिका घ्यावी असे संस्कार माहेर–सासर, शेजारी–पाजारी, नातेवाईक सगळ्यांकडून माझ्या अगदी अंगावर आले असते. इथल्यासारखा शुद्ध, निर्मळ संपूर्ण समरसतेचा आनंद तिकडे मिळालाही नसता. इकडे प्रत्येक गोष्ट आम्ही दोघे बरोबर करीत असल्यामुळे togetherness आणि under standing आपोआपच वाढते. एकंदरीत इकडे येऊन लग्न करण्याचे बरेच फायदे मला जाणवतात. येथले दैनंदिन जीवन इतके सुलभ केलेले आहे की,डोक्याला व्याप नाही!



Indian Grocery store आहेत. त्यातून तांदूळ, डाळी, मसाले वगैरे सगळे महिन्या-करता आणून ठेवायचे. Loeal Grocery Store मधून आठवड्याच्या भाज्या, दूध, दही, फळे आणून ठेवायची. इकडे दूध, दही पुठ्ठ्याच्या Carton मध्येसुद्धा मिळते. त्यावर expiry date लिहिलेली असते. त्याआधी ते संपवायचे म्हणजे झाले. रोज तापविणे वगैरे भानगड नाही. भारतात मोलकरणीशिवाय जगणे अशक्य वाटते. येथे ती उणीव यंत्रे भरून काढतात. मोलकर-णींच्या कामाचा रोजचा शीण नाही.

मी भोवताली अमेरिका पहाते आहे. या संस्कृतीच्या अंतरंगापर्यंत पोहोचते आहे असे मुळीच म्हणत नाही; पण जे जे काही डोळ्यांना दिसते, मनाला जाणवते त्याची तुलना आपल्या देशाशी होत रहातेच. भारतात असताना माझा अमेरिकेबद्दलचा दृष्टिकोन अमेरिका म्हणजे Rock music, light Jeans आणि स्वैराचार असा होता. या गोष्टी येथे आहेतच; पण अमेरिका म्हणजे सर्वस्वी या गोष्टी नाहीत हे येथे आल्यावर पटते. तेथे असताना एक प्रकारचे रोमँटिक चित्र मनात असते; पण येथे आल्यावर येथल्या लोकांच्या समस्या, गरिबी सगळे काही दिसते. आपल्या जशा त्यांच्या-बद्दल काही ठोकळ–ढोबळ कल्पना तशाच त्यांच्याही आपल्याबद्दल आहेत. भारत म्हटला की सतार, ताजमहाल, महाराज, जंगल अशी काहीशी या लोकांची कल्पना दिसते. म्हणजे दुसऱ्या देशाबद्दल ढोबळ कल्पना करून घेण्याच्या बाबतीत आम्ही तसे सारखेच आहोत असे वाटते. असे काही मूलभूत साम्य आढळले तरी भेद मात्र खूपच आहे.

अमेरिकन लोकांचे सर्व आयुष्य स्वतः-भोवती केन्द्रित झालेले दिसते. वेळ, पैसा, शक्ती, सर्व गोष्टी स्वतःच्या विकासाकरिता आणि सुखाकरिता खर्चून मग उरलेच तर लोकांना थोडेफार देण्यासाठी असावे अशी त्यांची वृत्ती वाटते. कुटुंब या संस्थेचा पाया बहुतेक पती–पत्नीचे सहजीवन हा आहे. मूलं हा नसावा. इकडे टी. व्ही. वर काही जोड-प्यांच्या मुलाखती झाल्या होत्या. या जोड-प्यांनी लग्न केली; कारण दोघांनाही जीवन-साथीची जरुरी होती; परंतु मूल वगैरे फापटपसारा नको होता. जन्मभर एक मेकांच्या केवळ साथीसाठी लग्न. आपण तर ही कल्पनाच करू शकत नाही. आपल्याला अपत्याशिवाय जीवन पूर्ण वाटत नाही. ज्यांना मूल होत नाही त्यांना ते दुर्दैवच वाटते. या समाजाची रचनाच वेगळी आहे. इकडे रात्रीची जेवणे सहा-सात वाजेपर्यंत संपतात. मग रात्री फारसे बाहेर जाता येत नाही. घरात बसून टी. व्ही. पहाणे हीच मग मोठी करमणूक ! मुले मोठी असतील तर आपापल्या उद्योगात असतात. मुले छोटी असतात तेव्हा रात्री जेवण झालं की प्रत्ये-कानं स्वतःच्या बेडरूममध्ये जाण्याची शिस्त आहे. तेथे तुम्ही काहीही करा. याचा हेतू असा की पती–पत्नीला एकान्त मिळावा. कारण पत्नी सबंध दिवस घरी असेल तर मुलांना ती संध्याकाळपर्यंत कंटाळलेली असते आणि नोकरी करणारी असेल तर दोघेही थकलेले असतात. एक मात्र खरे. येथे मुलांना सांभाळणे महाकर्मकठीण ! भारतात आसपास इतकी मुले असतात की, आयांना मुलांचे एवढे ओझे वाटत नाही; पण इकडे केवळ आईलाच त्यांच्या सर्व गरजा भागवाव्य


**करड शहरातील लोकप्रीय बँक !**

## दि कराड जनता सहकारी बँक लि., कराड ( सातारा )

**शाखाः–सायंविभाग, मार्केटयार्ड कराड व कुंभारगाव (ता. पाटण)**

( १ ) भाग भांडवल रुपये १४.०० लाख

| | | | |
|---|---|---|---|
| ( २ ) खपलेले भांडवल | ९·०५ लाख | ( ३ ) एकूण ठेवी | २५४·१६ लाख |
| ( ४ ) खेळते भांडवल | ३३३·३४ लाख | ( ५ ) कर्ज वाटप | २४०·९२ लाख |

**बँकेची विविध आकर्षणे**


(१) ७० महिने मुदतीची दामदुप्पट ठेवयोजना. (२) ४५ महिने मुदतीची दामदीडपट ठेवयोजना. (३) ११२ महिने मुदतीची दामतिप्पट ठेव योजना. (४) मुदतठेवीवर आकर्षक व्याजाचे दर. (५) भारत-भर डिमांड ड्राफ्ट देणेची सोय. (६) जनता कॅश सर्टिफिकेट्स (७) अल्प बचत ठेवयोजना. (८) क्युम्युलेटिव्ह डिपॉझिट. (९) सेव्हिंग्ज ठेव ६% व्याज-दर. (१०) ६३ महिने मुदतीची बक्षीस-ठेव-योजनेमध्ये आकर्षक बक्षिसे. शिवाय ११% व्याजदर.

धनवर्धिनी लक्ष ठेव योजनाः–दरमहा सतत रुपये १२५/– प्रमाणे रक्कम भरत गेल्यास २० वर्षांनंतर बँक आपणास १ लाख रुपये देऊन लक्षाधीश होण्याचे स्वप्न पूर्ण करील.

| | | | |
|---|---|---|---|
| **पी. डी. शिंदे** | **वि. गो. पाटील** | **ना. को. रैनाक** | **म. शं कल्याणी** |
| मॅनेजर | मॅनेजिंग डायरेक्टर | व्हाइस चेअरमन | चेअरमन |

लागतात. मुलांना Babysitter कडे ठेवा-वेच लागते· Babysitter बाकीची मुले कशी आहेत त्याकडे फार लक्ष देणे शक्य नसते. मग स्वत:च्या मुलांची मानसिक वाढ कुठल्या दिशेने होते आहे तेच पुष्कळदा समजत नाही. इकडे शाळेपासूनच आपापल्या मित्रमैत्रिणींबद्दल खूप जवळीक असते. एकमेकांच्या घरी जाणे camps ना जाणे वगैरे गोष्टी सर्रास असतात.भारतासारखं शेजारच्या मुलांशी रोज खेळायला मिळत नाही. कारण जवळजवळ प्रत्येकजण स्वत:च्या स्वतंत्र घरात रहातो. त्यामुळे शाळासोबती म्हणजे जीव की प्राण होऊन जातात. फोनवरून या सोबत्यांशी गप्पा चालतात. क्वचित कधी मित्रमैत्रीण एकमेकांच्या घरी रहायला जातात. जोपर्यंत मैत्रीला निरागस स्वरूप असते तोपर्यंत काही अडचण नसते; पण हळूहळू Teen agers च्या Late night parties सुरू होतात आणि माणसांपेक्षा मदिरा नाही तर ड्रग्स यांच्याशी जास्त मैत्री होते. वयाच्या तेरा–चौदाव्या वर्षीच मुलांना शिंगं फुटतात. ' Treat me like an adult mom ?' किंवा ' Let us discuss it tike mature adults mom & dad ' अशा तऱ्हेने घरातले संभाषण चालते. Dating खूप लवकर सुरू होत असल्याने विरुद्ध लिंगी ( opposite sex ) व्यक्तीला मागणी असते. आपल्याप्रमाणे मैत्रिणी-मैत्रीणींचे हितगुज किंवा मित्रामित्रांनी केलेल्या टवाळक्या यांची मजा हे लोक अनुभवतच नाहीत. Dating चे pressure तर इतके जबरदस्त असते की एखाद्या मुलीला फारशी मागणी नसली तर तिची स्थिती दयनीयच होते.

Dating Systemचा मुख्य उद्देश असा की मुलामुलींमधील संबंधांना अधिक निरोगी स्वरूप यावे. तरुण वयात स्वाभाविक निर्माण होणाऱ्या आकर्षणाला दिलेले हे थोडेसे स्वातंत्र्य. To date somebody म्हणजे त्या मुलाला किंवा मुलीला कंपनी देणे. वय, पैसे यानुसार मुलगा मुलीला रेस्टॉरन्टमध्ये, चित्रपटाला किंवा पिकनिकला घेऊन जाईल. मजा म्हणजे नेहमी मुलानेच मुलीला डेट विचारली पाहिजे आणि सगळा खर्चही बहुधा मुलावरच असतो. आदर्शवादाने बोलायचे म्हणजे dating मध्ये मुलगा आणि मुलगी एकमे-



कांना अजमावून पहात असतात आणि अनेकजणांशी अनेक वेळा dating करून आपला जोडीदार/जोडीदारीण ठरवता येते. असा निश्चित विचार झाला की, मग त्या date चे रूपांतर Girlfriend/boyfriend मध्ये होते. मग इतर कोणाशी dating करण्याचे स्वातंत्र्य नाही असा संकेत आहे; पण खरी परिस्थिती या आदर्शापासून खूपच दूर आहे Dating हायस्कूलपासूनच सुरू होते. Highschool gradnation म्हणजे मोठा दिवस! (आपल्या S. S. C. परीक्षेच्या निकालासारखा.) त्या दिवशी मुलीला date नसणे म्हणजे नापास होण्यापेक्षा मोठा अपमान ! या date पासून मिळणारे मोठ्यात मोठे thrill म्हणजे गर्भवती होणे. मग ती बातमी ओरडून सगळ्यांना सांगणे, किंचाळणे वगैरे. मग कोणी तरी किंचाळते, ' Is n't that Great !' मग मुलगी म्हणते, ' Oh ! yes ! dut I can't support the baby. So I will go for an abortion ! ' हे असे अगदी प्रत्यक्ष घडले आहे, नेहमी घडत असते. High School graduation नंतर बहुतेक मुले नोकरीला लागतात आणि आई–वडिलांपासून स्वतंत्र होतात. (अमेरिकेत युनिव्हर्सिटीच्या पातळीचे शिक्षण घेणाऱ्यांची संख्या खूपच कमी.) आई–वडील कितीही म्हातारे, आजारी असले तरी एकत्र रहाण्याची बात नाही. इतकेच नव्हे तर आईवडील मुलगा–सुनेला भेटायला गेले तर हॉटेलमध्ये रहातात. सून जेवायला बोलावते किंवा मुलगा–सून त्यांना बाहेर जेवायला घेऊन जातात. कारण सून नोकरी करीत असेल तर स्वयंपाकात सासू–सासऱ्यांसाठी वेळ घालविणे तिला परवडण्यासारखे नसते. हे लोक कट्टर व्यक्तिस्वातंत्र्यवादी !

समानशीलेषु सख्यम् हा आपल्या दृष्टीने मैत्रीचा पाया असतो. आपला व्यक्तिस्वातंत्र्यावर एवढा भर नसतो. एकमेकांच्या व्यक्तिगत जीवनात आपल्याला जितके अधिक जाता येते तितकी ती जिवलग मैत्री असे आपण समजतो. इकडे तेराव्या–चौदाव्या वर्षांपासून व्यक्तिगत जीवनाच्या लक्ष्मणरेषा आखल्या जातात. तेथून आत स्वत:च्या आई–वडिलांनाही प्रवेश नसतो, मग इतरांची गोष्टच सोडा ! सर्वांत जवळ येऊ शकणारी व्यक्ती म्हणजे गर्लफ्रेन्ड/बॉयफ्रेन्ड. तीच सर्वस्व ! मैत्रीचं इकडचं आणखी एक स्वरूप म्हणजे विवाहाशिवाय एकत्र रहाणं. लग्नानंतर गर्लफ्रेन्डची पत्नी होते. पत्नी होण्यात अनेक हक्क हिरावले जातात. त्यामुळे दोघं फक्त सहचर (companion) बनतात. वयस्कर लोकांमध्ये मात्र बायकाबायकांच्या मैत्रीचे सख्य दिसते. senior citizens करता अनेक शैक्षणिक आणि जीवनोपयोगी कार्यक्रम असतात. तेथे या मैत्रीला अगदी शाळकरी स्वरूप दिसते. एकंदरीत पाहता वयस्कर स्त्रीला तरुण मित्र दिसणे विरळाच; पण उलट स्थिती बऱ्याच ठिकाणी आढळते.

मला स्वत:ला इकडे आल्यावर जवळजवळ सात–आठ महिने मैत्रीण नव्हती. लग्न नवीनच झालेले; पण चातकासारखी मी मैत्रीणींच्या ध्यासात होते. एकसारखी मुंबईच्या मैत्रिणींची आठवण व्हायची. त्यांची पत्रे आली की, अगदी परमानंदात दिवस जायचा ! मुंबईत आम्ही मैत्रिणी खूप गप्पा मारीत होतो आणि प्रत्येक-वेळी गप्पांमध्ये वेळ फुकट गेला असे म्हणत होतो; पण मैत्रिणींबरोबरच्या गप्पांशिवाय जीवन किती रुक्ष असते त्याचा मला अमेरिकेत आल्यावर अनुभव आला. ती उणीव काही सुभाष भरून काढू शकत नव्हता. मैत्रीला स्नेह हे सुंदर नाव देणाऱ्या संस्कृत भाषेच्या मार्मिकतेचं मला येथे आल्यावर कौतुक वाटलं. मी एक कोर्स करायला गेले. तिथे बऱ्याच मैत्रिणी मिळाल्या. त्यामुळे तो कोर्स म्हणजे एक वरदानच वाटलं. त्यांच्याबरोबर जिन्यात बसून गप्पा वगैरे नाहीत; पण फोनवरून तरी बरेच बोलणे होऊ लागले. इकडच्या परिस्थितीत हेही नसे थोडके !

भारतात खोल मुळे रुजलेल्यांना तसे इकडच्या जीवनाशी समरस होता येत नाहीच. त्यामुळे तेथील भारतीयांचे सामाजिक जीवन फारसे भरीव नसते आणि याचा सर्वांत जास्त

चिमटा गृहिणीला बसतो. भारतात गृहिणी सचिव म्हणून ती कोठेही सन्मानाने वावरू शकते, तसे इकडे होत नाही. व्यक्तिमत्त्व विकसित होण्यासाठी स्त्रीला स्वतःचे स्वतंत्र विश्व (Hobby, Job) असल्याशिवाय गत्यंतर नाही. स्वतंत्र क्षेत्र निर्माण केलं की, अनेक अडचणी येतात. तिने बाहेरची जबाबदारी घेतली तरी भारतीय सवयीप्रमाणे तिची घरातली जबाबदारी कमी होत नाही. त्यात बाहेरचं क्षेत्र आव्हानात्मक असलं की, घरकामाचा अगदी बोजा होऊन बसतो. यातून वाट काढावी लागते. इकडे स्थायिक झालेल्या भारतीयांना अशा अनेक गोष्टींतून वाट काढावी लागते. इकडे असणाऱ्या मला भेटलेल्या भारतीयांबद्दल असं म्हणता येईल की, इकडे राहिल्यामुळे परंतु भारतीय संस्कार मनावर असल्याने आपल्या मुलांनी दोन्ही जगातील चांगलं घ्यावं अशी त्यांची इच्छा असते. बहुतेक ठिकाणी घरात अगदी भारतीय वातावरण असते; पण मुलांना अति भारतीय करायचा प्रयत्न केल्यास त्यांच्या जगात ती एकटी पडण्याचा खूप संभव असतो. त्या दृष्टीने काळजी घ्यावी लागते. थोडे-फार स्वातंत्र्य देणे भाग पडते. मग या स्वातंत्र्याचा दुरुपयोग होऊ नये म्हणून त्यांना विश्वासात घ्यावे लागते. इकडे वाढणाऱ्या मुलांची आणि त्यांच्या पालकांची 'पूर्व-पश्चिम' ओढाताण चाललेली असते. काही लोकांनी तिसराच मार्ग चोखाळला आहे त्यांनी आपल्या मुलांना भारतात स्वतःच्या आई-वडिलांकडे ठेवले आहे. म्हणजे हा दोन संस्कृतींचा झगडा तरी नको !

मला येथे येऊन आता दोन वर्षे होत आली. मला आता येथे फारसं एकटं वाटत नाही; पण येथल्या जीवनाशी समरस झाल्यासारखंही वाटत नाही. अध्यात्मामध्ये जी अलिप्तपणाची वृत्ती शिकवण्यात येते ती येथे आल्यापासून माझ्यात आपोआपच भिनली आहे असे वाटते. मुंबईची खूप आठवण होते; पण इकडेही भोवताली सगळे रस घेऊन पहाते.

अमेरिकेतले कुटुंबजीवन आपल्याला रुचत नाही किंवा ते समजत नाही, पचत नाही म्हणून रुचत नाही असे असू शकेल; पण त्यांचे कर्तृत्व उत्तुंग वाटते. राष्ट्रजीवन समृद्ध वाटते. आम्ही रशियन रिव्हर रिझॉर्टला जाताना प्रसिद्ध गोल्डन गेट करून गेलो तेव्हा काय वाटले कसे सांगू ? एका वाक्यात वर्णन करायचं झालं तर America is Dreamland made by hard work. भारतातही निसर्ग अगदी मनसोक्त उधळला गेला आहे; पण सॅनफ्रॉन्सिस्कोला गेल्यावर माणसाचं कौशल्य दिसलं आणि पटलं की, माणूसही निसर्गाएवढाच सृजनशील आहे. हे लोक ज्या तऱ्हेनं कुठलंही माध्यम हाताळतात त्याला तोड नाही! मनात येईल त्या गोष्टीचा पाठपुरावा करायचा हा या लोकांचा स्वभाव. यातूनच काही प्रगती होत असावी. इकडचं लेटेस्ट फॅड म्हणजे नॅचरल लाइफ- Natural foods, natural cosmetics यांचा तर अगदी सुकाळच झाला आहे. साखर खायची नाही त्याऐवजी मध, सुकामेवा खायचा. काही बायका तर प्रसूतीसाठी हॉस्पिटलमध्येसुद्धा जात नाहीत. घरच्या घरीच करायचं. Natural Children birth म्हणे ! असे अनेक नमुने पहायला मिळतात. कारण एकंदर सुखवस्तुपणामुळे कुठलेही फॅड किंवा फॅशन करायला अडचण येत नाही. त्यातून जोपर्यंत तुम्ही दुसऱ्याला इजा पोचवत नाही तोपर्यंत तुम्हाला कोणी विचारीत नाही

एकमेकांच्या पायात पाय न घालण्याच्या वृत्तीमुळेच ही माणसे स्वतःची आणि आपल्या समाजाची प्रगती करू शकतात की काय कोणास ठाऊक ! यांच्या प्रगतीचे मूळ कशात आहे ते शोधले पाहिजे. कुटुंबव्यवस्था, अर्थव्यवस्था की आणखी काही ?

येथे भोवताली पहाताना असे वाटते, अमेरिकेची सामाजिक बांधणी, व्यक्तीचे स्वातंत्र्य, हक्क अशा व्यक्तिनिष्ठ मूल्यांवर (Individualistic) आधारित आहे. यामुळे त्यांचे सर्व संस्कार 'स्व'शी निगडित असतात. एका परीने हा मोकळेपणा मला आवडतो. भारतीयांमध्ये आढळणारा सनातनपणा आणि धर्मामधली मूल्ये न पचल्यामुळे येणारा भोंगळपणा आणि दांभिकपणा (hypocrisy) इकडे नाही; पण जर सध्या भारतात विचारनिष्ठ धर्माला मलिनपण आले आहे तर इकडे स्वातंत्र्याचा वापर करण्याचा पोच नसल्याने स्वैराचाराला ऊत आला आहे आणि अशा या भिन्न परिस्थितीत आपल्या मुलांना वाढवायचं की नाही हा येथील भारतीय कुटुंबासमोरचा जटिल प्रश्न आहे. ○


सर्वसामान्य माणसांच्या जिव्हाळ्याची व त्यांच्या गरजांची पूर्ती
वेळच्या वेळीच करून देणारी

**दि नासिक पीपल्स को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड नासिक**

केंद्र कार्यालय, गोळे कॉलनी, नासिक २.

**बँकेचा शाखा विस्तार**

मेनरोड शाखाः–
२२ मेनरोड, नासिक.

त्रिंबक दरवाजा शाखाः–
पिंजारघाटरोड, नासिक.


शरणपूर शाखाः–
शरणपूररोड, नासिक

**बँकेचे उत्साही प्रशासकीय मंडळ**

**रमेश महादेव कंगे**, व्हा. प्रेसिडेंट
**जनार्दन करवीर**, सदस्य
**भास्करराव बोरस्ते**, प्रेसिडेंट
**दत्ताभाई कन्सारा**, सदस्य

**श्रीराम कुलकर्णी**, मॅनेजर

# अमेरिकेत ओकावल्यावर



**जन्म निवडण्याचं स्वातंत्र्य ज्योलाही नाही आणि जनार्दनलाही नाही म्हणूनच . . .**

●

**पद्माकर नागपूरकर**

अमेरिकेत ज्या वेळी फिरत होतो त्या वेळी तिकडची परिस्थिती पहाताना इकडच्या परिस्थितीशी त्याची तुलना होणे अपरिहार्य होतं. प्रत्येक गोष्ट पाहिली. उदाहरणार्थ, भरपूर साहित्याने भरलेली डिपार्टमेंटल स्टोअर्स, विस्तीर्ण स्वच्छ रस्ते आणि अजूनही खूप वनश्री असलेली गावं डोळयांना सुख देत होतीच; पण आपला सुजलाम् सुफलाम् देश आता असा का राहिला नाही या विचाराने तोंडाला एक कडवटपणा येत होता. लोकसंख्या हे त्याचं सोपं उत्तर, ते काही मनाला पटत नव्हतं आणि मग मी आणि माझ्याबरोबर फिरणारी माझी मित्रमंडळी मनाची समजूत करून घेत होतो की, त्यांच्यापेक्षा आमच्याकडे एक गोष्ट मोठी आहे–ती म्हणजे आमची संस्कृती. आमच्या समाज व कुटुंबसंस्थेचा एक श्रेष्ठ आधार !

परतल्यावरही हे प्रश्न इथल्या सहकाऱ्यांच्या 'कशी काय झाली ट्रिप ?' या प्रश्नामुळे पाठपुरावा करीतच होते. त्यामुळे त्यासंबंधीचा विचार काही ना काही निमित्ताने किंवा पाहिलेल्या गोष्टींमुळे मनात चालूच होते. त्यात योगायोगाने ह्याच वर्षी कामानिमित्त इथे आलेल्या काही अमेरिकन तंत्रज्ञांशी गप्पा मारण्याची संधी मिळत होती. तशा व्यवसायामुळे वर्षातून तीन–चार वेळा पाश्चिमात्य वा अमेरिकन मंडळींच्या गाठीभेटी होतच असतात. प्रत्येक वेळेला आणि प्रामुख्याने या वेळेला माझा अमेरिकेचा प्रवास ताजा असल्यामुळे त्याचा

परिणामही जाणवत होता म्हणून गप्पा तिथल्या कुटुंबसंस्थेबद्दल अप्रत्यक्षपणे वळण घेत असत त्यातून काही क्षणचित्रे मिळाली ती अशी–

ज्यो, तिथल्या एका मोठ्या अमेरिकन कंपनीत मोठ्या हुद्द्यावरचा तंत्रज्ञ. सध्या इथल्या एका प्रोजेक्टवर काम करण्यासाठी इथे आला होता. त्याच्याशी झालेली बातचीत.

'काय आवडला का भारत ?'

'तसा काही अजून भारत पाहिला नाही; पण आत्तापर्यंत पाहिला तो आवडला आणि आमच्या यजमानांनी आमची व्यवस्था उत्तम ठेवल्येय !'

'आता काय काय पहाणार आहेस ?'

'ताज पहायची फार इच्छा आहे. जवळपासचं दिल्ली–उदयपूरही पहाणार आहे. मुंबईत काही खास पहाण्यासारखं वाटलं नाही.'

'केव्हा जाणार आहेस त्या बाजूला ? म्हणजे मला कळव, माझ्या तिथल्या मित्रमंडळींना तसं कळवीन म्हणजे तुला काही प्रॉब्लेम येणार नाही.'

'थँक्स ! कंपनीनं माझी सगळी व्यवस्था केलेली आहे. त्यामुळे काही प्रॉब्लेम येईलसं वाटत नाही. मी माझ्या बायकोची वाट पहातोय. ती आता केव्हाही येण्याची शक्यता आहे. खरं म्हणजे मला हे सगळं माझ्या बायकोबरोबर पहायचंय !'

हे आमचे दुसरे मित्र. त्याच कंपनीतले. इथे आले. काम संपल्यानंतर लगेच जायला लागले. जायच्या अगोदर संध्याकाळी माझ्याकडे आले होते. त्याच रात्री परत चालले होते. बोलता बोलता म्हटलं, 'थांबा, ताजमहाल पाहून जा !' म्हणाले, 'बाहेर पडून दोन महिने झाले. परत यायचा योग आला तर येईनच; पण आता घरचे वेध लागलेत. पहायची खूप इच्छा आहे; पण आता मुलांना भेटायचीही फार इच्छा होत्येय !. (मुलं दोन. एक कॉलेजात, दुसरा त्याच्यापेक्षा दोन वर्षांनी लहान) नाऊ आय ॲम रिअली होमसिक !'

मी अमेरिकेला जायच्या अगोदर चोवीसपंचवीस वर्षांचा एक अमेरिकन तरुण माझा मित्र भारतीय जेवण जेवायला घेऊन आला होता. अध्यात्माची ओढ. योगासनं करून त्याचा दमा बराचसा आटोक्यात आला होता. त्यामुळे गुरू वगैरे पहाण्याची व करण्याची ओढ लागून इथे आला होता. त्याच्या दृष्टीने आर्थिक परिस्थिती बेताचीच. चार महिने राहून भारत पहाणार होता. मुलगा एकुलता एक. वडील वारलेले. इतक्या दूर त्याने यावं तेसुद्धा मधेच असं काही आईला वाटत नव्हतं आणि आईचा अध्यात्मावर फारसा विश्वास नव्हता. त्याच्या या प्रवासामुळे पडणारा आर्थिक भार सहज पेलण्याची ताकद नव्हतीच. तरी पण तिनं मुलाला पाठवलं. मित्राला कळवलं की, 'तू तिथं आहेस म्हणूनच त्याला पाठवल्येय. नीट काळजी घे !'


माझ्या दौऱ्यात टीव्हीवरचे कार्यक्रम बघण्याचेही योग येत होते. काही चांगले कौटुंबिक प्रश्नावरचे कार्यक्रम होत असत. त्यातले दोन कार्यक्रम अजूनही मनात घर करून बसल्येत. एक होता मुलं, पालक आणि शिक्षक यांची चर्चा. प्रश्न होते 'तुम्ही मुलांना कसे वाढवता ? त्यांच्यासाठी दिवसातला किती वेळ देता ? त्यांच्या व्यवहारात किती लक्ष घालता ? त्यांचे हट्ट किती पुरवता ? शिक्षक शाळेमध्ये त्यांच्या विकासाकडे किती लक्ष देतात ? त्यांची प्रगती डोळसपणे पहात असतात का ? त्यांच्यासाठी त्यांना काही मदत करतात का ? त्यांचे व विद्यार्थ्यांचे संबंध कसे असतात ?' ही चर्चा अत्यंत तावातावाने चालली होती. विशेषतः भाग घेणारी मुलं स्पष्टपणे साधारणतः ज्या भाषेमध्ये बोललेलं आपल्याकडे मोठ्यांना आवडणार नाही अशा पद्धतीनं पालक काय किंवा शिक्षक काय यांना छेडत होती. पालक व शिक्षक यांनाही ते सडेतोड प्रश्न अपमानास्पद वाटत नव्हते. या कार्यक्रमाचा परिणाम जाणवत होता की, ही मंडळी खरोखरीच या प्रश्नांचा शोध घेण्याचा प्रामाणिकपणे प्रयत्न करताहेत. या कार्यक्रमाचा संयोजक त्यांच्या पद्धतीप्रमाणे लगेच आवश्यक तिथे statistics सांगतच होता. हल्ली या प्रश्नांवर तिथल्या वर्तमानपत्रांतही विशेषतः रविवारच्या पुरवण्यांतून तज्ज्ञांकडून लेख येत असतात.

मनाला चटका लावणारा, अजूनही आठवण झाली की, अस्वस्थ करणारा एक कार्यक्रम होता. बारा आणि चौदा वयाची दोन मुलं आणि त्यांचे आई–वडील. मुलांची तक्रार नेहमीची. आई–वडील आमच्याकडे फारसं लक्ष देत नाहीत. आई–वडिलांचं उत्तरही नेहमीचंच. आम्ही तुमच्याकरता हे करतो, ते करतो. हमरीतुमरीवर येऊन आरोप–प्रत्यारोप चालले होते. कार्यक्रमाचे संयोजक काही थातुरमातुर करून प्रश्नांना बगल देऊन कुठंही ताण कमी करण्याचा प्रयत्न करीत नव्हता उलट विचारलेल्या प्रत्येक प्रश्नाचं उत्तर स्पष्टपणे वदवून घेत होता. परिणामी मुलांच्या प्रश्नांच्या भडिमाराने आई कोसळली आणि रडू लागली. वडील तिची थोपटून समजूत घालत होते. लक्षात घ्या हे. सर्व असंख्य प्रेक्षक टीव्हीवर पहात होते. कल्पना करा, तुम्ही त्या कार्यक्रमात भाग घेतला आहे म्हणजे मग तुम्हाला मला काय म्हणायचंय ते कळेल. कार्यक्रमात भाग घेणाऱ्या कोणावरही हा कार्यक्रम असंख्य प्रेक्षक पहात आहेत हे दडपण नव्हतं. त्यांना असं वाटलं नाही की, हा आमचा कौटुंबिक खाजगी प्रश्न आहे. उलट अशी एक भावना जाणवत होती की, आपला हा प्रश्न अमेरिकन समाजाचा प्रातिनिधिक प्रश्नही असू शकेल. तेव्हा समाजाला ह्या प्रश्नाचा शोध घ्यायला मदत करणं हे आपलं सामाजिक कर्तव्य आहे.

अमेरिकेत फिरताना सगळीकडे हा मोकळेपणा जाणवत होता. विचारल्या प्रश्नांची रोखठोक उत्तरं. कोणाच्याही दृष्टीत संशय वा संकोच नव्हता. मग ती स्त्री–पुरुष कोणी का असेनात.

आपल्याकडची ही जी समजूत आहे की, तिथले कौटुंबिक संबंध व्यावहारिक असतात. आई, वडील, मुलं, आजी, आजोबा ही सगळी कौटुंबिक नाती व्यावहारिक कोरडी असतात आणि या सर्वांचे मूळ कारण घटस्फोटाचे प्रचंड प्रमाण ! प्रत्यक्ष हे प्रमाण आहे ३ : १; पण आपली भावना मात्र अशी आहे की, तिथल्या प्रत्येक नवरा–बायकोनं घटस्फोट घेतलेला आहे. आता मजा बघा. मला भेटलेले तंत्रज्ञ किंवा माझी परदेशीय मित्रमंडळी यापैकी कुणीही घटस्फोटित नाही !

खरं म्हणजे आपल्या कौटुंबिक संबंधाचा अंतर्मुख होऊन आपण कधी विचार करतो का ? आपले आई, वडील, मुलं, आजी, आजोबा यांचे संबंध तरी काय असतात ? उलट आपल्याकडे जो सामाजिक बदल होत आहे व कुटुंबातील स्त्री आणि पुरुष दोघंही



जेव्हा नोकरीला जायला लागलेले आहेत. तेव्हा आपले संबंधसुद्धा व्यावहारिक होत चाललेले आहेत. आपल्याकडेसुद्धा पाळणाघर, वृद्धाश्रम यांच्या गरजाही वाढत चालल्या आहेत. आपण मात्र ही गोष्ट मान्य न करता त्यांच्या कुटुंबसंस्थेतील दोषांचा बाऊ करतो आहोत.

तिथल्या Motel मध्ये मुख्यत: त्यांच्या Social Security Scheme चा फायदा घेऊन वृद्ध माणसं रहात असतात. त्यांना आपली मुलं, नातवंडं भेटून जावी असं वाटत असतं; पण आपलं स्वातंत्र्यही त्यांना हवं असतं. मुला-नातवंडांवर अवलंबून रहावं असंही वाटत नसतं. म्हणजे काय शेवटी हे संबंध आर्थिक आणि सामाजिक बदलावर अवलंबून असतात. त्या राष्ट्रात होणाऱ्या प्रगतीमुळं आपल्याला हे जास्त तीव्रतेनं जाणवत असतात; पण थोडासा विचार केल्यावर आपल्या लक्षात येईल की, पाश्चात्य किंवा अमेरिकन समाजाचंच ते अंग आहे असं म्हणता येणार नाही. आपल्याकडेही ह्या गोष्टींची गरज वाटायला लागल्येय. फरक आहे तो हे बदल स्वीकारण्याचा. परिस्थितीच्या रेट्यामुळे हे बदल स्वीकारायचे की, डोळसपणे पत्करायचे, त्याच्या सामोरी जाऊन उत्तर शोधण्याचा प्रामाणिक प्रयत्न करायचा. फरक जाणवतो तो इथेच. तो समाज या प्रश्नांकडे जास्त निकोपपणे पहातो. या संदर्भात आठवते ती फ्रॅंकची भेट. लंडनमधला माझा व्यवसाय सहकारी. दोन वर्षांपूर्वी ट्रेनिंगला आला होता तेव्हा तो आणि मी एकाच वर्गात होतो. त्यामुळे मैत्री झाली, वाढली. अजून आहे. नुकताच येऊन गेला. अधूनमधून येतो. आला की, गप्पांकरता बोलावतो. त्याचप्रमाणे या वेळीही बोलावलं. नुकताच मी जेव्हा अमेरिकेत गेलो तेव्हा मी त्याला जमलं तर लंडनला उतरणार आहे असं लिहिलं होतं. जमलं नाही; पण त्याच्या लक्षात होतं म्हणून भेटल्यावर पहिलाच प्रश्न त्यानं विचारला, ‘कशी काय झाली ट्रिप ?’

वाटलं मला जे मनात खदखदतंय ते फ्रॅंकला विचारावं. ज्याच्याशी मोकळेपणाने बोलता येईल असा तो एक मित्र आहे. म्हटलं, ‘ट्रिप चांगली झाली; पण दोन समाजातील फरक जाणवून अस्वस्थ होत होतो आणि गप्पांमध्ये नेहमी एक विषय निघायचा, तो म्हणजे तुमच्या घटस्फोटाचा. Sorry ! गैरसमज करून घेऊ नकोस !’

तो म्हणाला, गैरसमज मुळीच नाही. तू हा प्रश्न विचारणारा चौथा आहेस. Actually, your emphasis is on divorce which I feel is wrong. Divorce is just a way to search your match and you know search is always a long process In that process, number of divorce depend upon individuals. Your impression that because everybody in allowed to take divorce he must be taking divorce every month which is again wrong. Individual naturally has to stop somewhere. Reason may be that be might have got the match or he might have learn to adjust or decided not to marry again it means he also learns something from this process don't you think so ?

फ्रॅंकचं हे विश्लेषण निश्चित विचार करायला लावणारं आहे. मला असं वाटतं की, आपण आपल्या कुटुंबसंस्थेविषयी इतका सरळ, स्पष्ट विचार करायलाच तयार नसतो आपल्या कुटुंबाची जबाबदारी पेलत नसतानाही आपण आपल्या डोक्यावर घेत असतो आणि पुढला आपला सर्व प्रवास हे ओझे वाहण्यात संपून जातो. आपल्या व्यक्तिमत्त्वाचा या दडपणामुळे कधी विकास होत नाही कुटुंबाची ही जबाबदारी आपण घेतलीच पाहिजे, ही जी आपली धारणा आहे त्याचीच ही एक अपरिहार्य परिणती आहे.

तिकडे आपण ज्याला व्यावहारिकपणा म्हणतो तो काय तर वय झाल्यावर मुलांनी तावडतोब स्वत:च्या पायावर उभं राहून जीवन सुरू करावं ही अपेक्षा. खरं म्हणजे ह्या त्यांच्या दृष्टिकोनामुळे फार लौकरच तिथला तरुण स्वत:च्या पायावर उभं रहायला शिकतो. झाडूकाम, हॉटेलात वेटरचं काम यामध्ये कुठेही कमीपणा त्याला वाटत नाही किंवा प्रतिष्ठेला धक्का लागत नाही;


**सुमारे ५९ वर्षांची सेवाभावी परंपरा !**

शास्त्रशुद्ध आयुर्वेदीय औषधाचे व्यापारी

## आयुर्वेद सेवा संघ

औषधी भवन, नाशिक

☆ नेत्रसुधा ☆ गुलकंद प्रवाळयुक्त

☆ ‘फ्ल्यु-फाइव्ह’ ☆ डायजेक्स-फोर्टीन

याव्यतिरिक्त विशेष औषधे व सर्व प्रकारची भस्मे, रसायने, आसवारिष्टे, काढे, चूर्ण व तेले.

आपल्या आरोग्यरक्षणार्थ व स्वास्थ्यासाठी सर्वत्र उपलब्ध !

पण आपण मात्र चार बुकं शिकल्यावर टेबलावर खर्डेघाशी करणं हे एकच काम आपल्या प्रतिष्ठेत बसतं असं मानतो. सामाजिक घडणीमुळं त्यांना ही जी संधी मिळते त्यामुळं सर्व क्षेत्रांमध्ये आज तो समाज पुढे आहे. खेळ, साहसी कृत्ये, वैचारिकता, शिक्षण, कला सर्व क्षेत्रांत त्याची घोडदौड चालू आहे. आपला समाज मात्र या सर्व क्षेत्रात खुरटलेला वाटतो. आई–वडील असेपर्यंत आई–वडलांनी विचार करायचा आणि ह्यांनी तो पाळायचा ही शिस्त. त्यामुळं आपली तरुणपिढी आपल्या विचारांचा उपयोग तारुण्य संपल्यावरच करायला लागते. तोपर्यंत काही विचार करण्याची आवश्यकता संपलेली असते. कारण त्या वेळी तो एक चाकोरीबद्ध जीवन जगायला लागलेला असतो. आपल्याकडचे महाविद्यालयीन तरुण पहा. ऐनतारुण्यात कोमेजलेले (अर्थात अपवाद आहेत हे लक्षात घेऊनच हे विधान) कोणताही प्रश्न विचारा. उत्तर–' अजून ठरवलं नाही !'

मला वाटतं एखादी गोष्ट मिळवायला बदल्यात काही द्यावं लागतं हे शाश्वत सत्य सर्वांनाच माहीत आहे. कदाचित त्या राष्ट्रांनी कुटुंबसंस्था आणि राष्ट्र या दोन्हींमध्ये काही देण्याचाच प्रश्न आला तर आपली कुटुंबसंस्था त्यांनी राष्ट्राला दिली आहे आणि म्हणूनच ती राष्ट्रे सर्व क्षेत्रांत पुढे आहेत आणि पहिल्यापासून मिळणाऱ्या स्वतंत्र बाळकडूमुळंच ती चंद्रावर जाऊन पोहोचली आहेत. तिथला नागरिक राष्ट्राचा एक घटक म्हणूनच वाढवला जातो हा दृष्टिकोन त्यांच्या शिक्षणात तर असतोच; पण तिथली म्युझियम्स व डिसने लँडसारख्या सुविधांनी त्याचे व्यक्तिमत्त्वही विकसित होत असते.

आपल्याकडे होतं काय की, होणाऱ्या भौतिक प्रगतीचा आपण स्वीकार करतो; पण मानसिकदृष्टया आपली प्रगती तेवढी झालेली नसते. आपल्याकडे ह्याचे एक ताजे उदाहरण म्हणजे आपण गणकयंत्राचा स्वीकार केलेला आहे; पण त्याचा उपयोग आपण काय करून घेतो ? आपण योग्य रीतीने करून घेतो का ? गणकयंत्राचा उपयोग करूनही आपल्याकडचे रिझल्टस वेळेवर लागत नाहीत. लागतात त्यातसुद्धा पुष्कळ गोंधळ असतो. मला माहीत आहे की काही ऑफिसमध्ये गणकयंत्राच्या सहाय्याने जी statements येतात ती बेरजांसहित तपासून, सुधारून घ्यावीत अशी सूचना त्या statement बरोबर दिलेली असते. याचे मुख्य कारण म्हणजे असं की, शेवटी वृत्तीने या सुधारणेचा स्वीकारच केलेला नसतो. कारकुनाच्या हाती पेनच्या ऐवजी गणकयंत्राची बटणं आली आहेत एवढाच त्याचा अर्थ. आपल्या भारतात जम्बोचं युग जेव्हा आलं तेव्हा लक्ष्मणनं व्यंगचित्र काढलं होतं त्याची या संदर्भात आठवण होते. ते व्यंगचित्र असं होतं : एक मोठं जम्बो विमान काढलं होतं आणि त्याच्या पंख्याखालून बैलगाडी दाखवली होती आणि लक्ष्मणने त्याच्या खाली एकच वाक्य लिहिलं होतं–' आपण जेटयुगात प्रवेश करीत आहोत !'

थोडक्यात तिथल्या समाजावर कुटुंबसंस्थेचा भार कमी पडतो म्हणून राष्ट्राचा मोठा भार ते लीलया घेऊ शकतात आणि म्हणून खरं म्हणजे ह्याच गोष्टीकडे जर आपण एखाद्या निराळ्या आणि विशाल दृष्टीनं पाहिलं तर कदाचित आपल्याला ह्या प्रश्नाचं उत्तर शोधणं अधिक सोपं जाईल. या प्रश्नात गुंतलेल्या आर्थिक, राजकीय वगैरे गोष्टी बाजूला सारून व्यापक दृष्टिकोन घेतला पाहिजे. शेवटी ज्योलाही आपल्या बायकोबरोबर ताज पहायचाय. तिकडचाही तंत्रज्ञ इथे आला तर होम सिक होतो. तिकडच्या आईला आपल्या मुलाची कासावीस होण्याइतकी काळजी असतेच हे लक्षात घेतलं पाहिजे. त्याबरोबर आणखीही महत्त्वाचं म्हणजे ज्यो अमेरिकेत जन्मला म्हणून तो तसा विचार करतो. जनार्दन म्हणून जन्मला तर त्याची विचारसरणी अर्थातच निराळी असेल; पण जन्म निवडण्याचे स्वातंत्र्य ज्योलाही नाही आणि जनार्दनलाही नाही म्हणून ज्योबद्दल विचार करताना तो जनार्दन अमेरिकन अवतार आहे म्हणून जर विचार केला तर आपण सत्याच्या जास्तीत जास्त जवळ जाऊ शकू व त्याच्या काय किंवा आपल्या काय कुटुंबसंस्थेबद्दल जास्त प्रामाणिकपणे व वस्तुनिष्ठ दृष्टिकोनातून विचार करू शकू. कुणी सांगावं यातूनच दोन्ही कुटुंबसंस्थांतील चांगल्या गोष्टी एकत्र येऊन एक नवा समाज निर्माण होऊ शकेल ! ह्या आशेवरच पुढील वाटचाल करायची आहे. □


शुभेच्छा

**वामन हरी पेठे**

**स्थापना १९०९**

(१) हिरे–मोती–सोने–चांदी व कापडाचे व्यापारी
(२) सरकारी व कोर्टाचे कामाकरिता
(३) घरगुती वाटण्याकरिता वस्तूच्या किंमती करून सर्टिफिकेट देण्याचा परवाना


**मुख्य दुकान :** पेठे बिल्डिंग, जगन्नाथ शंकरशेठ रोड, ठाकुरद्वार नाका, मुंबई–४०० ००४
**टेलिफोन :** ३५३५२१/२२ * शुक्रवारी बंद
**दादर शाखा :** पेठे बिल्डिंग, रानडे रोड, दादर, मुंबई–४०० ०२८
**टेलिफोन :** ४५१५९२ सोने विभाग, ४६७५१५ चांदी विभाग
४६७५१६ कापड विभाग (सोमवारी बंद)

**मघाचं ऑलिव्ह् ग्रीन विश्व आता पर्शियन ब्लूकडे सरकायला लागतं ....**

●

**संजय पवार**

# घरघर



आता आठवतंय !

थोडं–थोडं .........

दुपारी कॉलेज सुटल्यानंतर कॅन्टिनमध्ये किंवा कॉलेजच्या लॉनवर पडिकावस्थेत पड-लेलो असायचो. आठ–दहा जणांचं कोंडाळं. अधनंमधनं एखादी भजी व सात–आठ कप चहा व्हायचा. 'प्रोफेसरने उदास केली' इथ-पासून ते या वर्षी 'फाउंडेशनचा माल काढला पाहिजे' अशा सामिष विषयावरही फुटकळ चर्चा व्हायच्या.

कॅम्समधल्या झाडांवरून सूर्य अलगद खाली जायचा. दिवसभराची लीफग्रीनमधली झाडं ऑलिव्ह्ग्रीन होऊन जायची. तोच गहिरा रंग एखाद्याच्या तोंडातून बाहेर पडायचा–'चला घरी जाऊ या !'

'बस रे !'

'हूँ, सात वाजले. तुला काय आई-बापांनी सोडलायच !'

'चला चला उठा !' असं म्हणत बाकीचं कोंडाळंही उठायचं.

तेव्हापासनं 'घर' या संस्थेबद्दल मी उलट-सुलट विचार करू लागलो होतो. ही काय संस्था आहे, ही कुठली अलीबाबाची गुहा आहे, जी माणसाला उलटे पाय लावते ? तुटलेली नाळ पुनः उंबरठ्यात जोडते. ही कुठली जादू की, आभाळापेक्षाही सिमेंटच्या स्लॅबखाली, अॅस्बॅस्टॉसच्या पत्र्याखाली, कौलांखाली माणूस 'सुरक्षित' राहतो ! नात्यागोत्यांचे धागे, चार–पाच भिंती यांच्या कोंडाळ्यातही मुक्त श्वास घेऊ देणाऱ्या या संस्थेची अॅक्युरेट डेफिनेशन काय असावी ? स्वतःलाच प्रश्न विचारीत गेलो तेव्हा, आभाळाखाली मुक्त संचार करणाऱ्या आदि-मानवाबरोबर गुहेत कधी शिरलो कळलंच नाही !

आदिमानवाबरोबर गप्पा ठोकून परत कॉलेजच्या लॉनवर आलो. आता लॉन अधिक विस्तीर्ण झाली होती. तिथे माझ्याच वयाची अनेक मुलं–मुली इकडेतिकडे विखुरली होती. फुलांचे ताटवेच जणू ! ही सर्व मुलं–मुली आता फक्त माझ्याच कॉलेजच्या नव्हत्या, तर इतर ठिकाणाहून ते आलेले. वयाचा तेवढा एक धागा आमच्यात समान गुंफलेला !

मी त्यांना विचारलं, 'तुम्ही कुठून आलात ?'

ते म्हणाले, 'घरातून !'

मी म्हटलं, 'घर कुठून आलं ?'

ते थोडे थांबले आणि म्हणाले–'घर, घरातूनच !'

मी पण जरा अवाकच झालो; पण त्यांचं उत्तर मला बरोबर वाटलं. नंतर मी त्यांच्याशी सरळ डायलॉगच सुरू केला.

एकाला विचारलं,

'घर म्हणजे नेमकं काय रे ?'

तो–'आपली घरची लोकं जिथं राहतात ते घर !'

मी–'घरची लोकं म्हणजे कोण ?'

तो–'जी आपल्या रक्ताची, नात्याची असतात.'


मी–'तुझं घर आहे ?'

तो–'आहे ना !'

मी–'उंहूं, ते तुझ्या वडिलांचं आहे !'

तो–'मग काय झालं, ते माझंच आहे आणि तसं म्हटलं तर वडिलाचं किंवा त्यांच्या वडिलांचंसुद्धा ते नाही ! घर असंच असतं झाडासारखं एका जागी मूळ रोवून फांद्या पसरत जाणारं ! झाडावरच्या असंख्य पानांमधल्या एखाद्या पानाला विचारावं, 'तुझं या झाडात नेमकं स्थान काय ?' तर ते जसं काही न बोलता अधिकच झाडाला बिलगत जाईल, तसा तो मुलगा पुढे घराला अधिकच बिलगत गेला. त्याला 'घराबाहेर' ही कल्पना अशक्य वाटत होती. मी समजलो याची मुळं फार खोलवर गेलीत !

आपल्या वाडवडिलांच्या नावावर, पैशांवर पिढीजात मजा मारणारे तरुण हे अशापैकीच असतात. पूर्वजांची कमाई, कर्तृत्व आपल्या नावावर मांडून 'चोपडी' पुढे चालू ठेवायची. यांच्या मनात 'घर' नसतं तर असतं 'घराणं.' घराण्याच्या चालीरीती, परंपरा यांना ते चिकटून असतात. त्या कालबाह्य असल्या तरी स्वतःच्या घराण्यासाठी ते त्या चालू ठेवतात. त्यामुळे अशा घरांचे तरुण प्रतिनिधीसुद्धा याच मानसिकतेचे बळी असतात. घरबसल्या मिळणाऱ्या ऐषाराम, लौकिक या सर्वांतच त्यांचं घर असतं आणि हे घर दुसऱ्या पोरांना अलीबाबाच्या गुहेसारखं दाखवून त्यांना हिणवायचं असतं, पिढीजात सुरक्षिततेच्या भावनेतूनच त्यांना हे घर 'आपलं घर-पॉश घर' वाटत असतं. 'आमचं घर' वाटत असतं. त्याच्या



बाहेर डोकवायला ते तयार नसतात.

या कुलुपबंद अवस्थेनंतर माझ्यासमोर होता एक सर्वसाधारण मुलगा. शहराच्या मध्यवस्तीत गरिबी आणि श्रीमंती यांच्या सीमारेषेवरील मध्यमवर्गीय जीवन जगणारा. घरासंबंधात बोलताच तो 'कसलं काय नि काय' असं गुळमुळीत बोलू लागला. तो म्हणाला, 'कसलं घर ? दहा बाय बाराची एखादी खोली, त्यालाच चिकटलेले स्वयंपाकघर, संडास, बाथरूम. आई, बाप, भाऊ, बहिणी, भावांच्या बायका, त्यांची पोरं, एखादा पाव्हणा, गावचा आजा या सगळ्यांबरोबर काड्यापेटीत काड्या तुडुंब भराव्या तसं चिकटून चिकटून जगायचं ! लहानपणी एका गोधडीत झोपायचं...जरा वयं वाढल्यावर बहिणी स्वयंपाकघराच्या ओट्याशी. दादाचं लग्न झाल्यावर सगळ्यांनी बाहेरच्या खोलीत काना–तोंडात बोळे घालून झोपायचं ! मध्येच उठायचं नाही, कान टवकारायचे नाहीत !... आणि तिकडे दादांनी स्टॅन्डवरच्या भांड्यांची टांगती तलवार डोक्यावर ठेवून आपले नवपरिणित दिवस उरकून घ्यायचे.. असंच केव्हा तरी पहाटे दार वाजतं, आळसावलेला दादा तोंड बंद करत 'मुलगा' म्हणतो आणि घर झंकारतं...त्या कप्प्यांच्या घरात 'पाळणा' हलतो, जमीन आणि आकाश यांच्यामध्ये नवा जीव लटकत असतो, जसं एअरपोर्टवर सिग्नल मिळेपर्यंत विमान हवेतच घिरट्या घालत असतं... अशा या घराच्या भिंती कायम त्रासलेल्या, गुदमरलेल्या. प्रत्येक भिंत कुणी तरी वाटून घेतलेली. एक भिंत आईच्या देवांनी पवित्र होते, दुसऱ्या भिंतीवर बहिणीचा बटणाचा ससा स्वतःचं कुरण शोधतो, बाहेरच्या भिंतीवर ब्रूसली, अमिताभ आणि दारावर दोन इंची पट्टीत वडील 'श्री......'वगैरे. अशा घरात माणसं 'खांद्याला खांदा' लावून जगतात ती केवळ जागेच्या अडचणीतून. प्रत्यक्षात मात्र भांड्यावर भांडं आपटावं तसे खटके ... घुसफुस ... प्रत्येकाचा घरावर हक्क असतो आणि रागही ! !

...अशा घरात वाढत्या वयात बहिणींना मिळणारी वागणूक नकळतपणे भावाच्या आणि तिच्यामध्ये 'स्त्री–पुरुष' याची रेघ ओढते. पुढे रेघ वाढतच जातात. भावाचा नवा संसार सुरू होतो तेव्हा लहान भावांना 'समजदार' बनून गच्चीचा रस्ता पकडावा लागतो घर असून घराबाहेर जावं लागतं. तेव्हा गच्चीच्या कोपऱ्यात मित्रांच्या कोंडाळ्यात तो आपली अगतिकता मांडतो–

–सालं आपलं नशीब गांडू, आपण इथं जन्मलो. आपला बाप च्यायला इनामदारीत खर्डेघाशी करतो. कामात कमिशन काढायची लाइन नाय...मोठी जागा–बिगा घेवोन ठेवायची तर न्हायला हितंच आणि सुटला पोरं काढत; पण पुढं पोरं वाढणार आहेत, त्यांना पण पोरं काढायला लागणार आहेत याचा विचारच नाय...तिकडे दादाचा हनिमून, आम्ही तडीपार घरातून ! प्रायव्हसी नावाची चीज नाय घरात...! आपुन शाना बनलं पायजे. जागा घेऊन मगच लग्न... च्यायला असलं नाय परवडणार आपल्याला आणि वैनीबी जरा खडूसच दिसत्ये ! काय सांगावं पुढं–मागं...आपण वेगळं राहणार च्यामारी.

अशी सक्तीची हद्दपारी रक्तातलं जन्मजात घर उद्ध्वस्त करते आणि मनात दुसरं घर उभं करायला लागते...माझ्या मनात माझ्या डायरीतल्या ओळी उमटल्या.

'घर'–घराने अनेक घरे वसवली.

पण काही वेळा एकाच घरात अनेक घरे झाल्याने अनेक घरे उजाडली !

अशा गुदमरणाऱ्या अवस्थेतून अनेक 'मध्यमवर्गीय' मुलं, तरुण मुलं स्वतःच्या घरापासून वेगळं असं स्वतःचं घर शोधतायत. मुकेपणानं समोर येणारं वास्तव स्वीकारायला ते वैतागलेले असतात. आपलं आयुष्यही असंच दहा × बारामध्ये सडू नये म्हणून ते डोक्यात वेगळ्या घराचा शोध घेतात...

...त्यांच्या या वेगळ्या घरात तसं वेगळं काहीच नसतं ! फार तर लांबलचक देव्हारा 'सुटसुटीत' होतो. बहिणीचा 'ससा' शर्यतीत हरतो आणि वहिनीचे भरतकामाचे कासव, पडदे, टेबलक्लॉथवर विसावते. अमिताभ, ब्रूसलीऐवजी एखादा सीन...बस्स बाकी सारं तेच आधीच्या घरासारखं. चालीरीती, खाण्याच्या सवयी, जातिधर्माच्या सवयी, सगळं तेच आणि तरीही घर वेगळं...

फुगत जाणाऱ्या शहरांमध्ये आपलं म्हणून अस्तित्व टिकविण्याच्या, प्रायव्हसीच्या, सेटलमेंटसाठी एका घरातून दुसरं घर उभं रहाणं हे आजच्या आमच्या तरुण मध्यमवर्गीय मित्रांना अपरिहार्य अटळ वाटतं...

मित्र आपली बाजू ठामपणे मांडतात.
प्रसंगी विषय सोडून भडाभडा बोलतात.
पण मैत्रिणी ?
त्यांना 'घर' कसं हवं असतं ?
त्यांच्याशी बोललं तर कळतं,
'आपण जन्मतो ते घर आपलं नसतं.
तर, आपण 'मरतो' ते घर आपलं असतं !'

मैत्रिणी कायम स्वप्नंच बघतात घराची. पाठीवर वेणी चिकटावी तसं डोळ्यासमोर कायम प्रश्नचिन्ह 'तो कसा असेल ? तिथं कसं असेल ? त्यांच्या मनात लहानपणापासून एक राजकुमार दडवलेला असतो, जो या मनोऱ्यातल्या राजकुमारीला नेऊन सुखी करणार असतो.

मनोरा कितीही उंच असला, सगळ्या सोयी, सेवा असल्या तरी पिंजराच वाटतो त्यांना, सोन्याचा पिंजरा. हा पिंजरा स्वतःहून तोडायची, मिळेल त्या वाटेने चालून स्वतःची वाट शोधायची, त्यावर स्वतःच काही अस्तित्व उमटावायचं असं त्यांच्या मनात येतच नाही.

कारण 'राजकुमाराची एन्ट्री' विधिलिखित मानली गेलीय... त्यामुळं मग त्यांच्या मनात असतं एखादं झुंबरासारखं लटकत... नवरा... बायको... मुलं कर्तृत्ववान, गुणसंपन्न, एकनिष्ठ नवरा. सर्व सोयींनी युक्त सुखासीन घर...ओघानं होणारी मुलं... खाऊन, पिऊन थोडसं तरी उरावं त्यांनी त्यांच्यासाठी मिळवावं, मी घरात राबावं, दोघांनी मिळून मुलांना वाढवावं यापलीकडे क्षेप नाही... स्वतंत्र विचाराची ताकद नाही एक उबदार सुरक्षित आश्रय हवा. बस्स तेच घर... नवऱ्याच्या मनात, मुलांच्या बोबड्या बोलात तिचं घर असतं तिथून जर ते विस्कटलं तर मात्र पुन्हा जुळताना कठीण आणि म्हणूनच ते विस्कटू नये म्हणून ती कितीही किंमत मोजायला तयार रहाते. वाडवडलांच्या पुण्याईवर घर म्हणून घराणं सांभाळणारा, गुदमरणाऱ्या अवस्थेतून वेगळं घर शोधणारा मध्यमवर्गीय मुलगा आणि सुरक्षित कुंपण शोधणारी मैत्रिण... या सगळ्याहून वेगळा, रस्त्यावर, झोपडपट्टीत वाढणारा तरुण मित्र 'घर' शोधतो तें घर फारच मोठं असतं.

त्या घरात त्याला आपल्यासारखेच अनेक चेहरे दिसतात. माझ्याबरोबर दुसऱ्यालाही मिळावं ही अपेक्षा असते. अनेक मजली इमारतीमधला एखादा 'मजला' आपल्याला मिळावा, मजल्यामुळं मिळणारी प्रतिष्ठा मिळावी अशी त्याची इच्छा... वेळोवेळी होणारा अपमान, बहिष्कृत वागणूक, आर्थिक चणचण यामुळं धगधगणारा हा अँग्रीयंग मॅन मग कुठल्याही झेंड्याखाली एकत्र होऊन इथल्या स्थावर मालमत्तेवर तुफान दगडफेक करतो. त्यामध्ये 'मला नाही तर तुम्हालाही नाही' अशी वृत्ती असते... 'बीस साल पहले जब ये बिल्डिंग बन रही थी तब मेरी माँने इसपर काम किया था आज मैं ये बिल्डिंग उसे तोफा देने जा रहा हूँ !' असा डायलॉग पडद्यावर जेव्हा तो पाहतो, ऐकतो तेव्हा त्याला तो आपला वाटतो आणि पिक्चर सुटल्यावर मिळेल त्या वाटेनं तो पैशामागं धावत सुटतो–सुसाट...

अशी ही माझ्यासारखीच तरुण मनं माझ्याशी डायलॉग करत होती. काही तरी शोधत होती. सोडवत होती. मीही त्यांच्यातला एक होऊन ऐकत होतो, बोलत होतो.

प्रत्यकाचं एक मन होतं. त्या मनात पिढीजात भरभक्कम परिस्थितीनं गुदमरलेलं, धुक्यात हरवलेलं स्वप्निल आणि विस्कटलेलं असं घर होतं... काहींच्या घरांची दारं मजबूत आहेत. काहींची खिळखिळी झाली आहेत... काही नुसतेच आडोसे तर काही सताड उघडी... पण घरं आहेत, घरं आत्ताची आहेत, उद्याची आहेत...

आत्ताच्या घरात काही ठाण मांडून बसलेत वारसाहक्कानं, तर काही जण त्याच घराचे दोन भाग करणार आहेत त्याच वारसाहक्कानं. मैत्रिणी मूकपणे एक हक्क सोडणार आहेत, दुसरा बांधून घेणार आहेत. या सर्वांपलीकडचं घरच काय, सारं शहरच नावावर करण्याच्या इराद्यानं पेटलेत... या सर्वांना घर हवंय. त्या घरात फार बदल असतील असेही नाही; पण हवंय. गुहेत शिरलेल्या माणसाला जी ऊब मिळाली तिची धग अजूनही आमच्या रक्तात आहे. किंबहुना दिवसेंदिवस ती अधिक भिनत चाललीय रक्तात... वेडंवाकडं, छोटंसं, वस्तीपासून दूर का होईना; पण घर हवंय... किड्यामुंग्या आणि पाखरालाही घर लागतं मग आपण ? माझ्या डोक्यात घरघर सुरू झाली. त्या लॉनवर मी एकटा सगळे 'डायलॉग' करून निघून गेलेत. मघाचं ऑलिव्ह ग्रीन विश्व आता पर्शियन ब्लूकडे सरकायला लागतं. नवागतानं वॉश मारताना मधूनच पेपरचे स्पॉट सुटावेत तशा अगदी वर चांदण्या अंधुक पांढरट. यंत्रवतपणे मी उठतो. खांद्याला शबनम लटकते. पाय एक दिशा पकडतात आणि चालू लागतात. काही अंतर चालल्यावर लक्षात आलं, मी 'घरीच' चाललोय; पण कुठल्या जाणिवेतून ? –कित्येक हजार वर्षांपूर्वी आदिमानव गुहेकडे वळला त्याच जाणिवेतून !

*With Best Compliments From :*

**७० वर्षांची वाटचाल !**

**बुवा आईस्क्रिमवाले**

१७१२, उद्यान कार्यालय बिल्डिंग, पुणे ४११ ०३०

फोन : ४४०९०८

सामान्यांची असामान्य चळवळ

म्हणजेच

सहकारी चळवळ

या विकासशील चळवळीचा दीपस्तंभ

# दी महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लि.


( दी विदर्भ को-ऑपरेटिव्ह बँक सम्मीलित )

९, नगीनदास मास्तर रोड विस्तार, फोर्ट, मुंबई–४०० ०२३

पीककर्जे, कृषि औद्योगिक प्रकल्प (प्रक्रिया संस्था)
इंजिनियरिंग संस्था, मुद्रणालय, प्रकाशनसंस्था, निवृत्त सैनिक,
कागदव्यवसाय, मद्यार्कनिर्मिती,
तसेच अल्प-भू-धारक, आदिवासी, जंगल कामगार व फेरीवाले
या साऱ्यांना विकासाची दिशा दाखविणारा
व त्या मार्गावर सतत साथ-सोबत देणारा दीपस्तंभ.

टेलिफोन नं. : २४२९२०

टेलेक्स नं. : ३९१२



# लग्न नावाचं खग्रास ग्रहण


**एकामागून एक अधोगतीच्या पायऱ्या नवरा सपासप उतरत गेला.**

•

**सुशीला पाठक**

मीच सारं स्वतःहून संपवल्यावर आता त्याकडू आठवणीची उजळणी करायला नको वाटते. तरीही सांगण्यानं मोकळं होतं असं वाटतं म्हणून लिहिते. सुशिक्षित, स्वावलंबी असूनही केवळ लग्न केलं म्हणून मला नाही नाही त्या प्रसंगांना तोंड द्यावं लागलं. मला माझं स्वतःचं व्यक्तिमत्त्वच विसरायला लावलं या लग्नानं !

मी जेव्हा उभी राहिले तेव्हा माझे लग्नाचे वय कधीच टळून गेले होते. मोठ्या नैसर्गिक आपत्तींशी, झगडावं लागल्यामुळं शरीराला गोलवा असा राहिलाच नव्हता. न्यूनगंडामुळं चेहऱ्यावर कायमचा बावळट भाव, बोलण्यात आत्मविश्वास नाही, ह्या डाव्या बाजू सोडल्या तर शिक्षणात मात्र मी पदवी चांगल्या प्रकारे घेतली होती. नोकरी कुठेच कायम नव्हती; पण संधी मिळेल तेथे तेथे तात्पुरती नोकरी केली. नोकरीच्या ठिकाणी 'वाटत नव्हतं हं बाई, तुम्ही हुशार असाल असं !' असे अनेकदा उद्गार ऐकू आले, तरी वाटायचं 'टिंगल करताहेत !' घरची सुस्थिती; पण मी कोणत्याच अपेक्षा ठेवल्या नव्हत्या. कारण लग्नाच्या बाजारातल्या माझ्या स्थानाची मला जाणीव होती. गरीब नवरा चालणार होता. अगदी सामान्य अर्थाने सुखी संसार एवढीच संसाराबद्दल अपेक्षा होती. खाऊनपिऊन सुखी असावं. नवऱ्याबरोबर सुख-दुःखाच्या गप्पा कराव्यात. अनेक ठिकाणांहून नकार घेत शेवटी एका ठिकाणाहून होकार आला. पहिली प्रतिक्रिया धास्तीची. संसार सुरळीत होईल की नाही याची काळजी सुरू. हा माणूस सापत्य विधुर होता; पण स्वतंत्र रहात होता, ही जमेची बाजू. त्याला मूल असलं तरी मोठ्या माणसांच्या अंदाजाप्रमाणेच मुलीवरून 'सावत्र आईला' काच होण्याचा संभव नव्हता. मी होकार दिला. मुलगा माझ्याहून चार वर्षांनी मोठा, कंपनीत क्लार्क, दिसायला बरा, अपेक्षा नसतानाही सर्व जुळत होते.



लग्नात मुलगा निरुत्साहीपणे कर्तव्य केल्यासारखे एक एक विधी करून घेत होता. मनात खटकले; पण त्यांचे दुसरे लग्न म्हणून मी मनाची समजूत काढली. उत्साह, आनंदाची वाटणी फक्त वधुपक्षाकडे होती. माझं लग्न पहिलेच असल्याने मला वाटले आपण एक दिवस कुठे तरी जाऊन यावं; पण मुलीची अडचण पुढे करून तीही मागणी फेटाळली गेली अन् हा अडसर प्रत्येक माझ्या आनंदाच्या गोष्टीत पुढे आला व तोंडाची चव कडू होऊन गेली. एक दिवस बुवाला एकटं फिरायला काढलं तर आपण दोघंच आलोत. What about Nitu ? मी म्हटलं, 'इथं फिरायला आलेली जोडपी सर्व निपुत्रिकच आहेत. तुम्हीच फक्त मूलवाले ! चला घरी जाऊ संगीताला पहायला !' बुवा खूष. आभाळीचा चंद्र काही मी मागत नव्हते. माझे स्वतःचे चार–दोन क्षणच मागत होते; पण तेही देणं बुवाला अमान्य होतं !

तरीही संसार सुरू झाला. बुवाला फक्त पावशेराचं माप माहिती. भाजी चिरायची व तेल आणायला जायचं हा खाक्या ! घरात पाहुणा आला की, दुधाचं भांडं घेऊन बाहेर पडायचं ही रीत. घरात नेहमीच प्रत्येक वस्तू संपलेली. पगार कमी हे मला माहितीच होते; पण जो होता त्या पगाराला अनेक वाटा होत्या–दारू, सिगरेट, पान, रमी व मित्रांना खायला घालणं. सर्व व्यसनं परिपूर्ण करायची हे ध्येय ! दिवाळखोर बनूनसुद्धा ही सर्व व्यसनं इतक्या पराकोटीला जाऊन पोहोचली असतील याचा थांगपत्ता पूर्ण चौकशीनिशीही नशिबानं आधी लागला नव्हता. ते कळले असते तर भावाने हे लग्न मोडले असते !

बाहेरील कर्जे फार झाली तेव्हा माझे पैसे उडवणे सुरू झाले. मी कमावते, तो उडवतो, असा प्रकार सुरू झाला. स्वतःलाही पैसे उरेनात तेव्हा मी पैसे देण्यास नकार देताच मला अर्वाच्य शिव्या व मारहाण ! 'झोपडपट्टीतला तरी संसार याहून सुसंस्कृत असेल–' मनात वाटून गेले.

एकामागून एक अधोगतीच्या पायऱ्या नवरा सपासप उतरत गेला. माझ्या मोठ्या भावाजवळ खोटी कारणे निष्पाप चेहऱ्याने सांगून बरेच पैसे घेतले व उडवले. हे मला कळताच उलटून बोलताच संघर्ष, मारहाण, शिव्यागाळ झाली. या सगळ्याचा वीट येऊन मी माहेरी निघून गेले. तर त्याने तिथे येऊन विनवण्या करून माफी मागितली. दोन महिन्यांनी मी परत गेले; पण परत दुपटीने तीच आवृत्ती सुरू झाली ! घर म्हणजे त्याच्या समव्यसनी मित्रांचा चैनीचा अड्डा झाला होता ! दारुबाज मित्रांसाठी स्वैंपाक करताना मी परत आल्याबद्दल स्वतःलाच दोषी ठरवीत होते. संसार म्हणजे हेच असेल तर 'जळो तो संसार !' असे वाटू लागले. सणाची, कोणत्याही वेळेची पर्वा न करता सतत घरात 'ॲरिस्टोक्रॅट'च्या बाटल्या फुटायच्या !

'तुझे सर्व दागिने दे, गहाण ठेवीन, धंदा काढीन !' हा उच्चार बुवाच्या तोंडातून झाल्यावर मी अगदी सावध झाले. दुसऱ्या दिवशी भावानेच केलेले दागिने भावाकडे पोहोचवून आले. मार खाणारी बायको असं करू शकते हा त्याला पहिला धक्का बसला. मग लग्नातल्या माझ्या भारी साड्याच नाहीश्या झाल्या !

या सर्व गोष्टींना समांतर असे त्या बुवाचे स्वतंत्र प्रकरण चालू होते 'माझी मुलगी.' ती तिच्या आईसारखी दिसते मला आवडते. इथपर्यंतची भूमिका समजू शकते; पण तिच्या सुखासाठी मी सावत्र बायकोच्या सुखावर पाणी ओतीन !' ही भूमिकाच अनाकलनीय आहे. 'तुला मूल व्हायला नको आहे. नीताच माझ्या वंशाचा दिवा आहे. तिचा संभाळ करायसाठीच मी तुझ्याशी लग्न केले. तुझा सांभाळ करण्याला मी बांधील नाही!' हे नवऱ्याचं वक्तव्य ऐकताच त्याच्याविषयी व मुलीविषयी (अकारणच) तीव्र चीड, घृणा भरली. इतके दिवस तिच्याबद्दल माया होती, प्रेम होते, ते जळून खाक झाले. त्याच्या मुलीसाठी त्याने मला वांझोटी बनवलंन.

'बायको मला आवडत नाही' या सबबीखाली मित्राच्या घरी जाऊन त्याच्या सुंदर बायकोला न्याहाळणे, गप्पागोष्टी, हे सर्व लोकांना दिसायचे व पटायचेही. हा बुवा चळ भरल्यासारखा तिच्या मागे व तीही त्याला पैशांनी नागवायची. 'तिच्याकडे जाताना नीताला घेऊन जात जा. ते क्षण नीतालाही द्या !' असे मी म्हटले तर बुवा हिरवा-पिवळा झाला. 'तुला शुद्ध मैत्री कळत नाही. तूच वाकडच्या चालीची आहेस' त्याने मला म्हटले. त्या बाईला कावीळ झाली. तिला विश्रांती म्हणून तिच्या नवरा–मुलां-


समाजातील सर्वात गरीब माणसाला सुखाने व स्वाभिमानाने जगता येईल असे सुराज्याचे स्वप्न साकार करण्याकरिता अविरत प्रयत्न करणारी एक कर्तृत्वशील व कर्जमुक्त सहकारी संस्था

**श्री पंचगंगा सहकारी साखर कारखाना लि. गंगानगर–इचलकरंजी**

( जिल्हा–कोल्हापूर )

तार–'गंगासाकर' टेलेक्स–पी. एस. एस. के.–इन–०१९७२११ दूरध्वनी–२०७१ ते २०७५

उपेक्षितांना नवी आशा व आत्मविश्वास देणाऱ्या वीस कलमी कार्यक्रमाची सर्वप्रथम कार्यवाही करून या कारखान्याने आपली लोकाभिमुखता सिद्ध केली आहे. –रत्नाप्पा कुंभार, संस्थापक–अध्यक्ष

सकट आमच्या घरी आणलंत.

तेव्हाच ठरवले हे एकतर्फीच गुंतलेले धागे तोडून टाकायचे. मनावरच्या ताणाने नोकरीतही चुका होऊ लागल्या. ते तर मला मुळीच परवडणारे नव्हते. घर सोडण्याचा निर्णय त्याला सांगितला तरी तो म्हणे, इतके दिवस लाथा, शिव्या खाऊन राहिलीस ना? आता हिंमत आहे कुठे सोडून जायची?' त्याच्या घरी रहात होते तेव्हाच मंगळसूत्र काढून टाकले. 'सौ.' ही पदवी मला डसायची. सोडून येण्यापूर्वी वर्षभर त्याचे नावही लावणे सोडले होते. या वागण्याने ही आगाऊ बाई व तो सालस नवरा असे समीकरण जोडून लोक मलाच तोंडावर नावे ठेवीत. उपदेश करीत. आता त्यालाच सोडले. घर सोडून जाताना माहेरून आणलेले सर्व सामान रिक्षात घालून नेले. तेव्हा 'ह्या बाईच्या अंगात पुरुषीपणा आहे.' असं सर्व पतिव्रतांनी विधान केले.

ही माझी गोष्ट वाचल्यावर तुमच्या मनात प्रश्न निर्माण होतील की, हिला कुठेही आधार नव्हता का? हे हाल सहन करीत का राहिली? भाऊ–बहीण? माझे भाऊ-वहिनी, बहीण सगळे खूप चांगले. या बुवाची चाल ओळखल्यानंतरच ११ महिन्यांतच सोडून ये म्हणत होते. मला वाटायचे घ्यावे जमवून. पडेल फरक. माझा हट्ट पाहून तेही कंटाळले. बरेचदा भावाने त्याला (बुवाला) समजावायचा प्रयत्न केला. तर बुवा आणखीच पिसाळला. 'हाल करण्यासाठी आम्ही बहीण दिली नाही.' म्हणून भावाने एकदा त्यांना घरातून हाकलून लावले होते; पण माझीच सोडून यायची इच्छा नव्हती हे पाहिल्यावर भाऊ–बहीण गप्प बसले; पण एवढंच बोलले, 'त्याच्याच हातून मरण हवंय असा पण केलास की काय तू? – शेवटी आशा म्हणून चिवट तंतू असतो. त्यानेच हे सर्व अनुत्तरित प्रश्न तयार होतात.

त्याला सोडून आल्यावर लेखन, वाचन, विविध सभा ऐकायच्या, करमणुकीचा आनंद मुक्तपणे घ्यायचा हा कार्यक्रम निर्विघ्न चालू आहे. मध्यंतरात लागलेले लग्न नावाचे खग्रास ग्रहण सुटले आहे. निर्मळ मोकळे आभाळ माझ्या डोक्यावर आहे. भरभरून श्वास घ्यावा वाटतोय; पण आता आयुष्य फार थोडे उरले आहे. करायचे खप आहे. मी अगदी खेड्यातल्या शाळेत नोकरीला लागले आहे. एका मोठ्या वाड्यात रहायला स्वतंत्र खोली घेतली आहे. मुलांत वेळ छान जातो. सुटीच्या दिवशी घरी भावाकडे जाऊन येते. अजून घटस्फोट मिळाला नाही. नवरा सुखाने देत नाही. आता तो भावाच्या घरी खेपा घालून सांगतो, 'मी तिला सांभाळायला तयार आहे. कोणताही त्रास देणार नाही.' पण मी आता फसणार ना ही आता घटस्फोटासाठी झगडायचे आहे. नंतर मग अगदी माझे माझे आयुष्य असेल! ⭘


## संपदा सहकारी बँक लिमिटेड

**डी. आय. सी. बिल्डिंग, ७१७ बुधवार पेठ, गणेश रोड, पुणे २.**

**टेलिफोन नं. ४४६०८३**

■ बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात ! ■

डिपॉझिट इन्शुअरन्स स्कीम कायद्याप्रमाणे ठेवीचा विमा उतरविलेला आहे.

**ठेवीवरील व्याजाचे आकर्षक दर**

बचत ठेव ६ टक्के

| | | |
|---|---|---|
| **कायम ठेवी :** | ९१ दिवस परंतु ६ महिन्यापेक्षा कमी | ६ टक्के |
| | ६ महिने परंतु ९ महिन्यापेक्षा कमी | ७ टक्के |
| | ९ महिने परंतु १२ महिन्यापेक्षा कमी | ८ टक्के |
| | १२ महिने परंतु २४ महिन्यापेक्षा कमी | ९ टक्के |
| | २४ महिने परंतु ३६ महिन्यापेक्षा कमी | १० टक्के |
| | ३६ महिने परंतु ६० महिन्यापेक्षा कमी | ११ टक्के |
| | ६० महिने अगर त्याहून अधिक | १२ टक्के |

**रविवारी सुट्टी** **बँकेच्या कामाच्या वेळा – सकाळी १०.३० ते १ – सायंकाळी ५ ते ६.३०**

# सातही रंग प्रकाशाला म्हणाले

● दत्तप्रसाद दाभोळकर ●

( लेखांक दुसरा )

—अशी माहिती घेत घेत मी जयप्रभानगरात पोचलो तेव्हा खूप रात्र झाली होती. एक वेळचे जेवण आणि तीन-चार वेळचा चहा यापलीकडे वाटेत काहीच घेतले नव्हते; पण असा दमलो होतो की, अजिबात भूक नव्हती. जयप्रभाग्राम, मला दिलेली खोली काहीही बघण्याची हिम्मत नव्हती. अंथरुणावर अंग टाकले आणि कळण्यापूर्वीच डोळे मिटले !

---

## पाच

आधुनिक सेवाग्राम–जयप्रभाग्राम ! सकाळी उठलो तेव्हा लख्ख उजाडले होते. खोलीत भयंकर डास आहेत. त्यांनी माझे तोंड अक्षरशः फोडले होते; पण असा दमलो होतो की, [झोप अगदी छान लागली होती. डास आहेत, त्यांनी तोंडावर छान नक्षीकाम केलंय हे सुद्धा सकाळी उठेपर्यंत समजले नव्हते ! खोलीत आरसा वगैरे नाही. म्हणजे दाढीला फाटा मारावयास हवा. बाथरूम, संडास वगैरे म्हटलं तर आहेत; पण त्यात नळ वगैरे नाहीत. बाहेर जाऊन हातपंपाने बादली भरून आणली पाहिजे. मी निवांतपणे एकदा खोली बघतो. म्हटलं तर घर म्हटलं तर बॅरॅक असा प्रकार असलेले हे अतिथिगृह आहे. अतिथिगृह कसले ? भोवताली जोडप्यांसाठी रांगेत जी घरे बनवलीत त्यातील हे मधले घर पाहुण्यांसाठी मोकळे ठेवलंय. छत फार उंचावर नाही. त्यातून छत चक्क पत्र्याचे आहे. भिंती विटांच्या आहेत. त्यांना



गिलावा वगैरे केलेला नाही. सामानाची जी खोकी येतात त्यांची फळकुटी काढून खिडक्यांना लावलीत. खोलीत वीज नाही म्हणजे पंखा वगैरेचा प्रश्न नाही. लाकडांची खाट खोलीत ठेवलीये. उशी, गादी असल्या शहरी गोष्टी नाहीत. कॉटवर एक सतरंजी आणि एक रजई आहे. आणखी एक-दोन खोल्या आहेत. माझ्यानंतरही रात्री उशीरा येऊन कोणी पाहुणे वा कार्यकर्ते तेथे झोपलेले आहेत. रात्री दार बंद करता येत नव्हते म्हणून मी फार चिडलो होतो. आता मला त्याचे फार बरे वाटले.

मी बाहेर बघतो जयप्रभाग्रामचे पहिले दर्शन फार प्रसन्न करणारे आहे. दूरवर पोस्टाची आणि बँकेची टुमदार छोटी इमारत आहे. त्याला लागूनच दीनदयाळ संस्थेचे कार्यालय. प्रत्येक घराच्या बाहेर हातपंप आहे छान झाडी आहे छोटचा छोटचा इमारती. माझ्या चेहऱ्यावर हसू उमटते. एका बाजूला संघशाखा सुरू आहे. काल मंडळी दिवसभर माझ्याबरोबर हिंडत होती. संध्याकाळी संघस्थान वगैरे झाले नाही. त्या वेळी मी थोडा बावचळलोच होतो. शाखा संपते आणि लोक लगबगीने एका बैठ्या इमारतीत

जातात. म्हणजे आता प्रात:स्मरण असणार. सर्वांना एकत्र भेटण्याचा तो मोका चुकवून चालणार नव्हते. खूप वर्षांत मी प्रात:-स्मरणही ऐकलेले नाही. आठ–दहा वर्षांचा असताना मी खड्या आवाजात प्रात:स्मरण म्हणायचो. शाखेत नाही तर नाही ,किमान एकदा प्रात:स्मरणाला तरी उपस्थिती लावून यावे ! पंचवीस-तीस कोवळे तरुण–तरुणी वर्तुळाकार बैठकीवर बसलेत. प्रसन्न वातावरणात प्रात:स्मरण सुरू आहे. पुन्हा माझ्या चेहऱ्यावर हसू उमटते. 'वाह गुरूकी ' असा काही तरी शब्द येतो. हा शब्द पूर्वी नक्की नव्हता. मंडळी चलाख आहेत. प्रामाणिकपण असतील. शिखांना जवळ आणण्याचा तो प्रयत्न मला मनापासून आवडतो !

प्रात:स्मरण संपते. आणखीही काही भजने होतात आणि परस्पर परिचयाचा विधी होतो. एक अगदी घरगुती आनंदी खेळीमेळीचे वातावरण आहे. या गर्दीत एका वर्षाच्या आतील चार-पाच छोटी मुले पण आहेत. ही जयप्रभाग्रामची पहिली पिढी आहे. या मुलांच्या उद्यासाठी त्यांच्या आईवडिलांनी आपला आज या जयप्रभाग्राममध्ये काढावयाचा ठरवलाय ! मधेच हास्याचा एक धबधबा फुटतो. एक तरुण डॉक्टर छोट्या मुलाला चड्डी घालताना पुन्हा पुन्हा त्याचे दोन्ही पाय एकाच पायात घालत होता. त्याला कोपरापासून नमस्कार करीत हसत हसत एकेक जण बाहेर पडतो. येथून हे सारे जण सरळ कामावरच जातात म्हणे ! मी एकटा उरतो. आता मलाही बाहेर पडावयास हवे. यातील प्रत्येकाला भेटायचंय. त्यांचा जवळचा मित्र बनून त्यांना बोलतं करायचंय !

¤

शेतीबद्दल बोलणाऱ्या कोणत्याही माणसाला मी जाम घाबरतो. My culture is agriculture...असे काहीसे बोलून तुम्हाला त्याचे प्रात्यक्षिक दाखविणाऱ्या या प्रयोगवीरांच्याबद्दल माझ्या मनात प्रथम धास्ती भरवली ती गारगोटीच्या व्हेन्चरानंद दाभोळकरांनी ! आपली तासगावची विक्रमी द्राक्षे नंतर भरपेट खावयास देतो असे त्यांनी सांगितले तरी मी त्यांच्या कधी तावडीत सापडत नाही; पण माझ्या समोरचा हा वीस–बावीस वर्षांचा,काटक, हसरा चंद्रशेखर सिंग हा तर चक्क त्यांचा गुरू निघालाय ! भेटल्यापासून एखाद्या खुंटाला जाम पकडून ठेवावे तसे त्याने मला पकडून ठेवलंय. खरे सांगायचे तर त्याने मला चक्क खिशात घातलाय आणि माहिती देत,प्रयोग दाखवत तो मला जयप्रभाग्राममध्ये नुसता हिंडवतोय ! मला येथील इतरांनी सांगितले होते, 'दाभोळकर, या चंद्रशेखरपासून जरा जपून रहा ! तो आपल्या बायकोशी आणि एक वर्षाच्या मुलीशीही फक्त शेतीबद्दलच बोलतो !–' माझा प्रश्न वेगळा होता. येथे मी कोणाला आणि किती चुकवणार ? सगळा चि. वि. जोशींच्या पेस्तनजीची आठवण यावी असा कारभार आहे. प्रत्येकजण आपल्या वेडात वा प्रयोगात मग्न असलेला प्रयोगवीर ! यातील शहाणे कोण, वेडे कोण आपण कोण ठरवणार ? तुमचा एखादा मित्र कविता करावयास लागला तर तुम्ही त्याला इच्छा असूनही थोडेच चुकवू शकता ? चंद्रशेखरने मला जाम पकडलाय !

–चंद्रशेखर सिंग हा कमालपूरला राहणारा. कमालपूर येथून पन्नास किलोमीटर्सवर आहे. कपड्यांवरून, वागण्यावरून हा एखादा शेतमजूर वा शाळकरी मुलगाच वाटतो; पण हा फैजाबादमधून वकिलीची पदवीपरीक्षा पास झालाय! अवध विद्यापीठातून हा समाजशास्त्र विषय घेऊन एम. ए. झालाय. यातले काहीं म्हणून खरे वाटत नाही. हा हाडाचा शेतकरी म्हणून जन्माला आलाय. त्याच्या घरची तशी खूप शेती आहे. एकत्र मोठे कुटुंब ! त्याचा चुलतभाऊ संघाचा जिल्हाप्रचारक होता. कॉलेजात असताना म्हणून हा संघावर वैतागलेलाच असायचा. संघात वगैरे जाण्याचा म्हणून प्रश्नच नव्हता; पण मे ७९ मध्ये पारडीचा कार्यकर्ता म्हणून नोकरीच्या निमित्ताने तो येथे आला. शेतीविभागाशी जोडला गेला. नंतर पारडीची योजना संपली. पारडीने अंग काढून घेतले. याची नोकरी गेली; पण तोवर हा या कामात पार गुरफटला होता. अधूनमधून आता संघावर पण जातो. महत्त्वाचे म्हणजे सामाजिक जाणीव त्याला झालीये. आपण करतोय त्यामुळे माझ्या भोवतालच्या खूप शेतकऱ्यांचे कल्याण होणारे. मला खूप मानसिक समाधान मिळते. घरच्या माणसांना माझे वागणे पटत नाही; पण मला आता हे काम सोडणे अजिबात जमणार नाही म्हणून सांगतो. बायकोला इथल्याच शाळेत त्याने शिकावयास घातलंय.

चंद्रशेखर शेतीविभागाचा प्रमुख आहे. शेती, फलोद्यान, मधुमक्षिकापालन या गोष्टी त्याच्या विभागात येतात. जयप्रभाग्राममध्ये सुमारे वीस एकर जमीन येते. त्यातील पाच एकर जमीन सोडून इतर सर्व शेतीखाली येते. पाच एकरांत पालेभाजी पिकते. आठ एकर जागेत फळबागा आहेत. उरलेल्या बारा एकरात धान्ये पिकतात. एकूण सात बोअरिंग विहिरी आहेत. त्यातील पाच शेतीसाठी आणि दोन तळ्यासाठी राखून ठेवल्यात. सारा भाग शेतांनी,बागांनी नुसता गच्च भरलाय. हिरवा हिरवा गार ! आपली दृष्ट लागावी असा ! पंजाबमधल्या एखाद्या समृद्ध; संपन्न बागायतीमधून हिंडतो आहोत असे वाटते; पण ही नुसती शेती नाही. खरे सांगायचे तर ही एक प्रयोगशाळा आहे. चंद्रशेखर आपल्या प्रयोगात मग्न असलेला प्रयोगवीर आहे !

पपया, पेरू, महाराष्ट्रातील हिरवी केळी, चिक्कू सारी झाडे येथे उभी आहेत. प्रत्येकाची वेगवेगळी कहाणी आहे. पेरू हे खरे या बाजूचे पीक. एक झाड अतिशय चांगले ठेवले तर वर्षाला शंभर किलो पेरू देते. येथे पेरूची ६५ झाडे उभी आहेत. प्रत्येकावर प्रयोग सुरू आहेत. पेरूचे पीक दोन मोसमात येते. पावसाळ्यात ९०–९५ किलो पेरू मिळतात. थंडीच्या दिवसांत फक्त ५–१० किलो फळे मिळतात. होते काय, पावसाळी दिवसात पीक बाजारात इतके यते की, ते फार कमी दराने विकावे लागते. त्यातून पावसाळी पेरू चवीला व गोडीला चांगला नसतो. थंडीत पेरू कमी येतात; पण साखरेसारखे गोड आणि स्वादिष्ट. त्यातून थंडीत पेरू टिकवणे, बाजारपेठेत पाठवणे पण शक्य असते. याच्या प्रयोगातून आता लक्षात आलंय की, पावसाळ्यात फळे झाडावर आली की लगेच तोडून टाकावीत. फार कमी फळे पावसाळ्यात घ्यावीत. थंडीत खूप गोड पेरू मिळतात.शंभर किलोची गोळाबेरीज कायमच राहते. त्याची झाडे अशा फळांनी लगडलीत. शेतकरी येऊन, प्रयोग पाहून, खुश होऊन परत जाताहेत. वैज्ञानिक नियम आणि प्रयोग साधे असतात; पण ते



¤

चंद्रशेखरांचा लेखकाला आवडलेला व अतिशय यशस्वी प्रयोग म्हणजे केळ्यांच्या लागवडीचा!

¤

लोकांपर्यंत त्यांच्या भाषेत, प्रात्यक्षिकासह पोचवणारे विज्ञानानंद लागतात! महाराष्ट्रातील चिक्कू येथे मूळ धरतोय. चिक्कूची ऐंशी झाडे उभी आहेत. शेतकरी या नव्या फळाकडे कुतूहलाने बघतोय. आंब्याचे १२८ वृक्ष आहेत. दशहरी, लंगडा, चोसा यांच्याबरोबरच कलमी आंबे वाढताहेत. करवंदाची ८० झाडे आहेत, लिंबाची ४० आहेत, लिची २५, बदाम १०, अहमदाबादी बोरे ३०, फणस ११ अशी अनेक झाडे त्यांच्या धावसंख्येसह येथे चर्चिली जातात. पपयीची झाडे लावून त्यापासून पेपीन बनवावयाचे याचे प्रयत्न सुरू आहेत. महाराष्ट्रात जळगाव व इतरही काही ठिकाणी यावर यापूर्वीच खूप काम झालंय हे खरे; पण आपण पेपीन बनवणार आणि ते अमेरिकेत जाणार या नुसत्या कल्पनेनेच या मागासलेल्या जिल्ह्यातील शेतकऱ्यांना चैतन्याने स्पर्श केलाय हे कसे नाकारता येईल?

प्रयोग अनेकविध आहेत. सर्वस्पर्शी आहेत. चंद्रशेखर अनेकांचे सहकार्य मिळवतो. फैजाबादच्या आचार्य नरेंद्र कृषिविद्यालयाचे प्रमुख डॉ. एस. बी. सिंग अनेकदा येतात. आणखीही अनेक; पण येथील सर्वांच्या मनात अगदी देवासारखा आदर आहे तो उज्जैनच्या डॉ. मनोहर बापट यांच्याबद्दल! ते सपत्नीक येथे अनेकदा येऊन गेलेत आता कायमचे येथेच येऊन राहताहेत. डॉ. बापटांनी याची आणि त्यांच्या बीजसंपन्नक खताची ओळख करून दिलेली आहे. चंद्रशेखर सांगत होता. डॉ. बापटांनी सांगितलेले प्रयोग मी केलेत. त्यांनी सांगितल्याप्रमाणेच यश मिळते. माझा व भोवतालच्या साऱ्या शेतकऱ्यांचा त्यामुळे खूप फायदा होईल. एक किलो पेरणी करावयाच्या दाण्याला तीस ग्रॅम बीजसंपन्नक लागतो. म्हणजे एक एकरासाठी बाराशे ग्रॅम बीजसंपन्नकाची जरुरी असते. तो गोमूत्रात घालून या पेरणी करावयाच्या दाण्यांवर चांगला चोळावयाचा दाणे चांगले वाळवून नंतर पेरावयाचे. त्यामुळे बाकीची खते फक्त निम्मी वापरली तरी उत्पन्न जास्त मिळते. एका हेक्टरसाठी आपण १०० किलो नायट्रोजन, ६० किलो फॉस्फरस व ४० किलो पोटॅश वापरत असलो तर बीजसंपन्नक वापरल्यावर ५० किलो नायट्रोजन, ३० किलो फॉस्फरस व २० कि. पोटॅश वापरून भागते. बाराशे ग्रॅम्स बीजसंपन्नकाची किंमत ५० रुपये आहे. एका एकरात खत १८०–१९० रुपयांऐवजी ९० रुपयांचे होते. चाळीस–पन्नास रुपये वाचतात. बीजसंपन्नक वापरल्यामुळे हेक्टरमागे १-२ क्विंटल धान्य पण जास्ती मिळते. डॉ. बापट तेथे नसल्याने त्यांचा प्रयोग शास्त्रीय भाषेत नक्की काय आहे ते मात्र मला समजले नाही.

प्रयोगशाळेतून प्रयोगभूमीकडे (Lab to land) या कृषिअनुसंधानकेन्द्रांच्या कार्यात एक दुवा बनून, ते कार्य अधिक व्यापक व भक्कम पायावर करणे हे चंद्रशेखरचे खरे विलोभनीय काम आहे. या प्रयोगशाळा वेगवेगळ्या नव्या जाती शोधत असतात; पण त्या प्रयोगशाळेतून प्रत्यक्ष शेतावर जावयास ८–१० वर्षे लागत. त्यातूनही प्रथम त्या सधन बागायतदारांकडे जात. त्यातून झिरपून त्या खालच्या स्तरावर जाण्यात आणखीही वेळ जाई. तोपर्यंत त्या नव्या जातीची उत्पन्न देण्याची क्षमता घटलेली असे. त्यातून कोणत्या विभागात कोणती जात अधिक गुणकारक आहे हे ठरवणे पण अवघड असे. या प्रयोगशाळा तर पंतनगर, दिल्ली अशा लांबच्या ठिकाणी असलेल्या. चंद्रशेखर स्वतःच्या अनुभवावर, तंद्रीवर ( instinct ) अशा गोष्टी हेरतो. जयप्रभाग्राममधील आपल्या शेतात त्यातील चार-पाच जातींची, सध्या प्रचलित असलेल्या जातीबरोबर, वेगवेगळ्या तुकड्यात रांगेने पेरणी करतो. एखाद्या तीर्थस्थानाला भेट द्यावी तसे शेतकरी जथ्यांनी येतात. ते पाहतात. त्यातली चांगली जात लगेच भोवताली उचलली जाते. टॉमेटोची नवीन जात येथे निवडली गेली आहे. चंद्रमुखीपासून यानेच विकसित केलेली निलदंडी ही बटाट्याची नवी जात खूप चांगले काम करते आहे. मटारीला लागणाऱ्या 'सफेत फफुंदी' या रोगाचे विकसित बियांच्या पेरणीमुळे उच्चाटन झालंय. मटारीचे आपले उत्पादन दुपटीने वाढले म्हणून शेतकरीच सांगतात. जव (बार्ली) हे खरे पाहता गव्हापेक्षा अधिक पौष्टिक व कमी खर्चात पिकवता येणारे धान्य; पण त्याचे साल काढणे महाकठीण काम असते. कानपूरला विकसित झालेला करण १८ (karan 18) लावलात तर थ्रशिंग करताना भुसा निघतो व बार्लीची

शेती खूप किफायतशीर ठरते. सर्वांत कमाल आहे ती गव्हाच्या के ७४१० (शेखर) या जातीची. या विभागात ही जात संपूर्ण निकामी ठरेल म्हणून कानपूरच्या डॉ. नवल किशोर बाजपेयी या तज्ज्ञांनी याला समजावून सांगण्याचा खूप प्रयत्न केला. डॉ. किशोर तसे याचे व प्रकल्पाचे जवळचे दोस्त; पण हा हट्टाला पेटला. याने ऐकले नाही. याचे संपूर्ण बरोबर ठरले. शेवटची कणसे नुसती तरारून दाण्यांनी लगडलीत. डेहराडून तांदळाची आठवण व्हावी असे गव्हाचे लांब, टपोरे, डेहराडून दाणेच म्हणा ना ! उत्पन्न पण चाळीस टक्क्यांहून अधिक वाढलंय.

शेतकरी येऊन पाहून जातात, अनुकरण करतात यावर हा खुष नाही व प्रतिष्ठान पण ! प्रत्येक दिवस मोलाचा आहे. चंद्रशेखर सांगत होता ही लढाई आहे. 'शुरू हुआ है जंग हमारा !!' गव्हाचे आणि जवाचे हे निवडलेले दाणे प्रतिष्ठानने आपल्या खर्चाने जिल्ह्यातील पंचवीस शेतकऱ्यांना दिलेत. त्या शेतकऱ्यांच्या शेतात एका बाजूला नेहमीच्या हजार गव्हाबरोबर व बार्लीबरोबर ही पिके तरारून आलीत. शेतकरी व त्यांचे मित्र विश्वास बसणार नाही अशा नजरेने या पिकाकडे बघताहेत. या शेतकऱ्यांना हे पीक जास्ती भावाने विकावयास पण परवानगी आहे. मात्र हे दाणे त्यांना पेरणीसाठीच वापरावे व विकावे लागतील, जवळच्या शेतकऱ्यांनी आत्ताच पैसे भरून पेरणीसाठी हे दाणे राखून ठेवलेत. पुढील वर्षी प्रतिष्ठान पण आणखी दाणे वाटणार आहे. गव्हाच्या व बार्लीच्या या नव्या सुधारित पिकाने हा भाग तृप्त होऊन निघेल. पुढील वर्षी या सुधारित जाती लावणाऱ्या शेतकऱ्यांच्यात स्पर्धा ठेवून त्यांना बक्षिसे वगैरे देण्याचा याचा नक्की कार्यक्रम आहे. वेळ आली तर नानाजींच्याकडे हट्ट धरून तो आपला कार्यक्रम पार पाडणार आहे.

चंद्रशेखरबरोबर त्याच्या प्रयोगात सामील झालेल्या या शेतकऱ्यांच्या शेतांना भेटी देणे हा एक फार आल्हाददायक अनुभव आहे. वर्णन करता येणार नाही असा ! एखाद्या शेर-शायरीच्या मुशाराला जावे तसे भोवतालचे सारे वातावरण कसे भरून गेलेले असते. प्रत्येक जण आपल्याच तंद्रीत खूप खुश असलेला. चंद्रशेखर त्यांचा हिरो असतो. प्रत्येक जण त्याची वाहवा करण्यात गुंतलेला, बनकटवाँ विभागात नौकापुखा येथील जनकरामच्या शेतात त्याचे झालेले कौतुक तर मी जन्मात विसरणार नाही. लहान मुलांपासून म्हाताऱ्यापर्यंत सारे त्याच्या पायाला हात लावावयास धडपडत होते. तो त्यांना देव वाटत होता. भारतीय शेतकरी केवढे कृतज्ञ आहेत !

–जनकरामला भेटून परत येताना मी खराच भारावलो होतो. मी म्हटले, 'याच्या गव्हाचे याला पैसे रे किती मिळतील ?' मी घाबरलो. एखादा बाँब फुटावा तसा चंद्रशेखर उडाला. मी त्याच्या ठणकणाऱ्या जखमेवर न कळत बोट ठेवले होते. म्हणाला, 'आमची शुद्ध पिळवणूक चाललीये. तुम्ही दिल्लीत एअरकंडिशन खोल्यात बसणारे लोक आमच्या गव्हाचा दर ठरविला ! हिंमत असेल तर चार महिने आपल्या ऑफिसचे लोक घेऊन येऊन या शेतात काम करा म्हणावे !' हा फाटका तरुण, कवी वाटावा असा साधा शास्त्रज्ञ सारे काही विसरून अक्षरशः आग ओकू लागला. भारतात कोठेही जा हाच अनुभव येतो. आपण


G. H. R. S. S. I. D. C. Ltd., Offers the following facilities and incentives for promotion of Handicrafts and Small Scale Industries.

1. Marketing outlet for the Handicrafts through the Emporias at Tourist Hostels at Panjim. Vasco Da Gama and Calangute and also at Dabolim Airport.

2. Supply of raw materials like Iron & Steel, Indothene & Koylene, Fibre, Cane Caustic Soda, Cement etc.

3. Participation in Tender Marketing on behalf of Small Scale Units.

*For Details please contact:—*

**Goa Handicrafts, Rural & Small Scale Industries Development Corporation Ltd.**

A Subsidiary of EDC of Goa, Daman & Diu,
Dr. Vaidya Hospital Bldg., 2nd Floor,
Gov. Pestana Road,
Panjim Goa.

अक्षरश: दारूच्या कोठारावर बसलोय. –१८५७ च्या पूर्वी भारतभर भटकणाऱ्या फकिरांनी अशीच काही स्पंदने ऐकली असतील आणि नोंदवली असतील ! –मी म्हटले, शरद जोशींचे आंदोलन ओळखतोस ? पुन्हा एकदा हादरा बसला. चंद्रशेखरने शरद जोशींचे नावही ऐकलेले नाही ! शरद जोशी आणि चंद्रशेखर दोघांचीही कमाल आहे ! मी म्हटले, 'करपणारा ऊस, धान्याचे दर याबाबत तुमची संस्था काही करेल का ?' म्हणाला, नक्कीच करेल ! मी विचारले, अग्रक्रमाने या गोष्टी व्हाव्यात असे नाही तुला वाटत ? म्हणाला, मला तसे व्यक्तिश: जरूर वाटते. पाहुण्याला न शोभणारा, म्हटला तर अशिष्ट प्रश्न मी विचारला. विचारले, 'समजा, तुमच्या संस्थेने याबाबत काही केले नाही, इतर कोणी येऊन हे कार्य सुरू केले तर काय करशील ?' क्षणाचाही विचार न करता सहजपणे म्हणाला, 'त्यांच्याबरोबर निघून जाईन !'

¤

या अनपेक्षित उत्तरानंतर काही विचार करावयाची, बघावयाची माझी शक्ती पार नाहीशी झालीये. या एकाच उत्तराने माझा पाया उखडलाय. मी दमलोय. एखाद्या झाडाखाली अगदी स्तब्ध निवांतपणे बसून चहाचा घोट घ्यावयास वा सिगरेट शिलगवावयास मला फार आवडेल. खरे पाहता ती माझी गरज आहे; पण नुसता विचार करणारा माणूस व कार्यकर्ता यात खूप फरक असतो. चंद्रशेखरने मागचा क्षण केव्हाच निकालात काढलाय. मला घट्ट पकडून स्वत:च्या प्रयोगांच्या यश–अपयशांचा हिशोब मांडणे त्याचे चालूच आहे. तो सांगतोय मधमाशा पाळण्यात मला फार अपयश आलंय. मधाची पेटी शेतकऱ्यांच्या दृष्टीने जादूची पेटी ठरेल. मधमाशा पाळावयाच्या डब्याची किंमत १००–१२५ रुपये असते. खरे पाहता आम्ही उद्या ती स्वस्तातही बनवू शकू. माशांच्या वसाहतीची किंमत १८–२० रुपये असते. या माशा पाळल्यामुळे वर्षाला मधाचे ४००–४५० रुपये मिळतील. प्रत्येक पेटीमागे हा एवढा नफा. त्यातून व्यापारी शेतावर येऊन मध घेऊन जातात, रोख पैसे देऊन. त्यातून मधमाशा पाळल्यामुळे संकर होऊन फळांचे फळ–भाज्यांचे उत्पन्नही फार वाढते. शेतकऱ्याला खर्च काहीच नाही. वर्षात ज्या वेळी फुले कमी त्या वेळी पोळ्याजवळ एक किलो साखर ठेवावी लागते. गूळ ठेवून चालत नाही. तो तयार करताना जी रसायने आजकाल वापरतात ती मधमाशांना हानिकारक ठरतात. त्यातून जेव्हा नवी राणी तयार होते तेव्हा पोळे फुटते, शेतकऱ्याला एक नवा डबा मिळतो. खरे पाहता गेल्या वर्षीच माझे प्रात्यक्षिक दाखवून शिक्षण देणारे केंद्र येथे तयार असावयास हवे होते. किमान शंभर–दीडशे पेट्या दूरवर खेड्यात शेतकऱ्यांच्याकडे पोहोचावयास हव्या होत्या; पण या प्रयोगाने मला पूर्ण फसवलंय. माशांना काही रोग लागतो वा त्या पेटी सोडून उडून जातात. आज माझ्याच पेट्या मोकळ्या आहेत; पण मी खूप काही शिकलोय. माझा प्रयोग उद्या यशस्वी होईल !

–चंद्रशेखरचा अतिशय यशस्वी व मला आवडलेला प्रयोग म्हणजे केळ्यांच्या लागवडीचा ! केळी हे तसे मुळातच नाजूक आणि खानदानी झाड आहे. महाराष्ट्रातील


देशातील एक अग्रेसर सहकारी साखर कारखाना
साखर उतारा, कार्यक्षमता याबाबतीत सातत्याने वरचा क्रमांक,
साखर कारखान्याबरोबरच सहकारी दूध प्रकल्प, कुक्कुटपालन
सहकारी संस्था, सहकारी बँक स्थापन करून वारणा परिसराचा
कृषि, औद्योगिक विकास व मॉंटेसरीपासून महाविद्यालयीन शिक्षणापर्यंत
शिक्षणाची सोय, ग्रामीण भागात पहिले सहकारी ग्राहक भांडार
स्थापय करून सर्वसामान्य ग्राहकांची सोय, महिला व कामगार यांच्यासाठी
विविध उद्योग आणि आता पेपर प्लँट व डिस्टिलरीकडे वाटचाल....

**श्री वारणा सहकारी साखर कारखाना लि.**

**वारणानगर ४१६ ११३**

ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर

**फोन :** वारणानगर ३३, २९ व २२

**तार :** 'वारणासाकर', वारणानगर **टेलेक्स :** डब्ल्यूएस्एसके १९५ २४०

**नंदकुमार नाईक** कार्यकारी संचालक | **निवृत्ती विठोबा घोरपडे** व्हाइस चेअरमन | **तात्यासाहेब कोरे** चेअरमन

# तहानलेला जीव, तहानलेली जमीन

महाराष्ट्र अवर्षणाच्या विळख्यात सापडला आहे.
जमीन व जीव तहानलेले आहेत.
१४,००० खेड्यांत पाण्याचे दुर्भिक्ष्य आहे.
६,००० खेड्यांत परिस्थिती गंभीर आहे.

परिस्थितीवर मात करण्यासाठी महाराष्ट्र शासन युद्धपातळीवर कार्यक्रम राबवीत आहे. विहिरी, कूपनलिका, बुडक्या, टँकर्स व खाजगी साठ्यातून पाणी पुरविण्यात येत आहे.

अवर्षणातून कायम सुटकेसाठी — मुख्यमंत्र्यांचे आवाहन....

**पाणी अडवा, पाणी जिरवा.**

---


**माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र राज्य.**

हिरव्या सालीची केळी इतरत्र कोठे मिळत नाहीत. दोन वर्षांपूर्वी जळगावहून शारदाजी अपूर्वाईने हिरव्या केळीची सत्तर रोपटी घेऊन आले. केळी जूनमध्ये लावावयास हवीत. तो तर ऑगस्टचा महिना होता. मोठ्या थाटात केळ्यांचे वृक्षारोपण झाले. त्यानंतर उत्तरेची कडाक्याची थंडी सुरू झाली. सारी रोपटी सुकून, कुजून, जळून म्हणा हवी तर, काळपट पडली नोव्हेंबर-मध्ये तो काळपट कुजलेला भाग बघवेना ! तेव्हा एके दिवशी भल्या पहाटे येऊन शारदाजी आणि चंद्रशेखरने त्यांचे ते कुजलेले भाग काढून जमिनीत टाकले. तिकडे काही दिवस हिंडण्याचीसुद्धा त्यांची इच्छा नव्हती; पण १५ दिवसांत एक चमत्कार घडला. सत्तरच्या सत्तर रोपटी तरारून मध्यापासून वाढू लागली. नव्याने वाढणाऱ्या या रोपांना थंडीवर मात करावयाचे ज्ञान निसर्गाने दिले होते शेतकरी हा चमत्कार पाहून गेले. चंद्रशेखर म्हणाला, आमच्याकडे एक म्हण आहे 'काटेसे कदली फले.' कदली म्हणजे केळे. तोडल्याने केळी वाढते म्हणून सांगणारी ही म्हण या अशा व्यवहारज्ञानावर बनलेली आहे, हे शेतकरी असलेल्या चंद्र-शेखरला प्रथमच कळत होते. काही शेतकरी म्हणाले, तुम्ही काही खास खते घातलीत वा केळ्यांना इंजेक्शनं दिलीत. त्यांची समजूती-साठी एका एकरात सतराशे केळ्यांची झाडे वाढताहेत. एका वर्षात फळे हातात येतील. अनेक शेतकऱ्यांनी हौसेने प्राथमिक प्रयोग म्हणून आपल्या परसदारात केळ लावलीय. केळ्याचे तोरण ही शुभकार्याची खूण असते. एक नवे शुभ कार्य या विभागात आज सुरू झालंय. केळी आणि वैज्ञानिक प्रयोग हा या विभागाचा आज मानबिंदू बनतोय. ' केळीचे सुकले बाग असून निगराणी ' म्हणून सांग-णारी अनिलांची कविता ही माझी आवडती कविता आहे; पण केळीचे सुकलेले बाग आपल्या प्रतिभेने आणि हळुवार ममतेने फुलवणारी ही कविता मला अधिक आवडली.

मी असा तंद्रीत होतो इतक्यात राणी राणी म्हणून एक प्रचंड गोंगाट उठला. काय होतंय हेच मला कळेना. लहान मुले, काही तरुण, थोडे म्हातारे सारे हात उडवत, फडकी हेलावत घाईगर्दीत धावत येत होते. सारे वातावरण क्षणात बदलले होते. काय होतंय हेच मला कळेना मी ! जरा




घाबरलोच. गेल्याच आठवड्यात गोंड्यापासून फक्त बारा किलोमीटर अंतरावर भर दुपारी एक बस अडवून लुटल्याचे मी पेपरात वाचले होते. गोष्ट नित्याची असावी. कारण त्यावर येथे कोणीच फारशी चर्चा केलेली नव्हती; पण हळूहळू सारा प्रकार माझ्या लक्षात आला. माझ्या चेहऱ्यावर हसू फुटले. चंद्र-शेखरचे हेर बनलेली छोटी छोटी मुले भोवताली हिंडत असतात. चंद्रशेखरने मला सांगितले होते– मधमाशा दोन प्रकारच्या असतात. एक आगमाशा. त्या उंच झाडावर वा डोंगराच्या कपारीत आपले घर बांधतात. त्या माशा पाळता येत नाहीत. दुसऱ्या माशा काळोखात, झाडाच्या बुंध्याच्या आत वगैरे राहतात. काळोखात राहणाऱ्या या मध-माशाच मुख्यत्वेकरून पाळल्या जातात. या बाजूला, जयप्रभाग्रामच्या बाहेरही खप झाडे आहेत. लाकूडतोड हा एक इकडचा महत्त्वाचा उद्योग आहे. कोणत्या झाडात मध-माशा आहेत ते या मुलांनी हेरलेले असते. ते झाड तोडले की, राणी माशी आपला ताफा घेऊन पोळे सोडते. राणी अशी बाहेर पडली की, मुले राणी राणी करत तिच्या मागे धावतात. धावणारे हे लोक उडणाऱ्या त्या माशांच्या थव्यावर पाणी उडवतात. पंख ओले झाले की, त्यांना तात्पुरते उडता येत नाही. तो थवा एखाद्या झाडावर बसतो. चंद्रशेखर व त्याचे दोस्त तेथे जाऊन माशा बसलेली फांदी अलगद एखाद्या छोट्या पोत्यात घेतात. नंतर त्यांना यांच्या डब्यात हलवले जाते. नवा खर्च न करता चुकलेला वा फसलेला एक प्रयोग पुढे सुरू होतो. माझा पायगुण चांगला असावा. आज अशा एकदम दोन राण्या मिळणार होत्या. राणी आली आणि चंद्रशेखर मला पूर्णपणे विसरला. सारे काही सोडून त्यांच्यामागे बेभानपणे धावत सुटला. मी सुटकेचा निश्वास सोडला. या राजाच्या तावडीतून माझी सुटका झाली होती !



## कार्यालयात....

□



## आणि मठीत शारदाजींबरोबर लेखक....

□

## आम्हाला केवळ ग्रामीण विकास नको. ग्रामीण नवरचना करायची आहे !"

## सहा

शारदाप्रसाद माझे यजमान आहेत. प्रकल्प-संचालक शारदाप्रसादांच्या बंगल्यावर खरे तर मी आतापर्यंत जाऊन यावयास हवे होते; पण शारदाप्रसादजींवर मी मनातल्या मनात फार वैतागलोय. काल रात्री उशीरा परत आल्यावर त्यांनी मला त्यांच्या घरी न नेता एका डासांनी भरलेल्या खोलीत नेऊन सोडले म्हणून! पण कितीही चिडलो तरी त्यांना त्यांच्या घरी जाऊन भेटावयास हवेच. रागातच मी त्यांच्या खोलीत शिरलो आणि पुरता उडालोच! त्यांच्या राहण्याची जागा बंगली वगैरे नाही. मठीही नाही. हा तर चक्क गोठा आहे. शारदाजींनी मला रात्री त्यांच्या घरी राहावयास बोलावले नाही म्हणून मी मनातल्या मनात त्यांचे शतशः आभार मानले!


काल सकाळी भेटल्यापासूनच हा माणूस मला हादरे देतोय. प्रथम बराच वेळ मी यांना ड्रायव्हर आणि ड्रायव्हरचा प्रकल्प-संचालक समजलो होतो. शारदाजी कमालीचे साधे, सरळ, मनमिळाऊ आणि कष्टाळू आहेत हे त्यानंतर माझ्या हळूहळू लक्षात आले; पण तरीही हा म्हणजे कहरच झाला! जयप्रभाग्रामच्या मध्यावर एक टुमदार छोटेसे घर उभे राहतेय. समोर मासे पालनासाठी बनवलेला मोठा तलाव. बाजूला पाणचक्की. भोवताली झाडी, नानाजी, त्यांच्याबरोबर येणारे मोठे पाहुणे यांच्यासाठी बांधल्या जाणाऱ्या त्या घराचे काम तसे रेंगाळलंय. त्या छोटेखानी घरातील कोपऱ्यातील एक खोली सध्या शारदाजींनी स्वतःसाठी ठेवलीये. कोपऱ्यात सिमेंटच्या गोणी, सुतारांची अवजारे इत्यादी. खोली दहा बाय बाराची, पंखा लावता येणार नाही एवढे खाली आलेले छप्पर. त्या खोलीच्या एका कोपऱ्यात शारदाजींचे बसून लिहिण्याचे एक डेस्क आहे. त्याला लागून अंथरुण-पांघरुणाची वळकटी. मच्छरदाणी वगैरे चैनीच्या गोष्टींवर यांचा विश्वास नसावा. समोरच्या माणसाला समजून जिंकून घ्यावयास जे एक अनुभवी निरागस हास्य लागते ते त्यांच्याकडे आहे. एखाद्या मिस्किल प्रेमळ आजोबांनी आपल्या नातवांना संभा-

ळून घ्यावे तसे शारदाजी मला व भोवतालच्या इतर कार्यकर्त्यांना सभाळून घेत आहेत.

शारदाजी मूळ मिर्झापूरचे. प्रतापगडमध्ये फार पूर्वी ते उच्च माध्यमिक शाळेत राज्य-शास्त्र शिकवीत. ४९ साली शारदाजी संघाचे प्रचारक बनले चौदा वर्षे प्रतापगड जिल्ह्यात आणि सात वर्षे फरुकाबाद जिल्ह्यात जिल्हा प्रचारक म्हणून त्यांनी काम केले. १९७० पासून गोंडा विभागाचे विभाग-प्रचारक म्हणून ते काम पाहू लागले. गोंडा विभागात गोंडा, बाराबंकी, लखनौ, बहराइच या चार विभागांचा समावेश होतो. सत्याहत्तर साली त्यांना अर्थातच तुरुंगवास झाला. त्या वेळी भारतीय किसानसंघाचे ते सहसंघटनमंत्री होते. ठाकूरसिंग संकटासिंग प्रधानमंत्री होते. संघर्ष, संघटना आणि रचना हे तीन मंत्र घेऊन हे लोक शेतकऱ्यांच्यात उतरले होते. नानाजींनी सांगितले म्हणून आठ मार्च १९७९ पासून ते या प्रकल्पात आलेत.

शारदाजी सांगत होते, 'सत्याहत्तरच्या निवडणुकीचे दिवस. गोंडा जिल्ह्यातील बलरामपूरमधून नानाजींनी उभे रहावे म्हणून प्रयत्न सुरू होते. नानाजींनी साफ नकार दिला होता. नानाजी त्या वेळी तुरुंगात होते. बलरामपूरची राजमाता काँग्रेसच्या तिकिटावर निवडणूक लढवीत होती. बाजपेयी पहिल्यांदा लोकसभेत गेले ते बलरामपूरमधूनच. त्यानंतर काँग्रेस-जनसंघ असा ऊन्ह-पावसाचा खेळ आलटून-पालटून हा मतदारसंघ खेळत होता. नानाजीना अखेर या मतदार-संघातून उभे रहावे लागले. प्रचंड बहुमताने ते निवडून पण आले; पण तुरुंगवास आणि ही निवडणूक यांनी नानाजींच्यात एक संपूर्ण परिवर्तन केले होते. तुरुंगात शेतीवरची, विकासावरची नवनिर्माणाची मिळतील ती पुस्तके नानाजी वाचत होते. निवडणुकीत नानाजी पुन्हा पुन्हा सांगत, 'मला निवडणुकीला उभे रहावयाचे नव्हते. तो माझा पिंड नाही; पण जयप्रकाशांनी मला आदेश दिलाय. आयुष्यात प्रत्येकाला कोणाचे तरी ऐकावे लागते. मी जयप्रकाशजींचे ऐकतो!' निवडणुकीच्या निमित्ताने नानाजी व कार्यकर्ते सारा भाग पोखरून काढत होते. हा भाग त्यांना तसा नवीन नाही. महाराष्ट्रात जन्मलेल्या आणि शिक्षण घेतलेल्या नानांचा सारा जन्म याच भागात प्रचारक म्हणून गेला. चाळीसच्या सुमारास या विभागातील पहिली शाखा त्यांनीच स्थापन केली होती; पण निवडणुकीमुळे खेड्यातील भारतीय समाजाचे, दारिद्र्याचे, प्रश्नांचे पुन्हा नवे दर्शन होत होते. सारी समाजरचना उध्वस्त झालेली होती. सारी समाजमूल्ये मुळात कोठे तरी हादरली होती. दारिद्र्य आणि उपासमार यांचे ते भयानक चित्र होते. माती नाही आणि मालाला खप नाही म्हणून कुंभार घरी होते. शहरांतून येणाऱ्या प्लॅस्टिकच्या चपलांपुढे तग कसा धरावा हे चांभाराला समजत नव्हते. नाना प्रत्येक ठिकाणी सांगत होते, निवडून आलो वा पडलो तरी तुमच्यातच राहीन आणि तुमचे प्रश्न सोडवीन याची खात्री बाळगा!' येथवर नानाजींच्याबरोबर हिंडणाऱ्या कार्यकर्त्यांचे काही म्हणणे नव्हते; पण मग तो दिवस उगवला. बलरामपूरच्या बाहेर नानांनी शेतात रहाणाऱ्या एका चांभाराचे एक घर पाहिले. बिघा-दीड बिघा जमीन. जमिनीवर विहीर. पंप लावलेला. चांगला सुखवस्तू. पुढच्या मुक्कामात नानाजी जयप्रभाग्रामाजवळ होते. नाना शेतकऱ्यांना सांगत होते, 'तो पहा कसा मजेत राहतो. तुम्हाला जमीन कसावयास नको. घाम गाळावयास नको!' भारतीय शेतकऱ्याला शेतीबद्दल उगाच कोणी काही सांगितलेले आवडत नाही. ते संतापले, म्हणाले, 'साहेब, त्याच्याकडे पाणी आहे. आम्हाला पाणी द्या! त्याच्यापेक्षा छान पैसे मिळवून दाखवतो!'

नानांना प्रश्नांची उकल होत होती. झाडावरून पडणारे फळ पाहून न्यूटनला गुरुत्वाकर्षणाचा सिद्धांत सुचला. पोचमपल्लीच्या एका दानातून भूदानयज्ञाची सुरुवात झाली. नानांनी त्या सभेत घोषणा केली. 'पाच वर्षांत तुमचा भाग पाण्याने



समृद्ध करून सोडीन!'

कार्यकर्त्यांच्या तोंडचे पाणी मात्र नानाजींचा हा भागीरथाचा अवतार पाहून पळाले होते! शारदाजी नानांना स्पष्टपणे म्हणाले, 'नानाजी निवडणुकीत वाटेल ते सांगतात; पण त्यालाही काही मर्यादा असते. उद्या निवडणूक संपेल. तुम्ही दिल्लीला निघून जाल! आमचा उभा जन्म इथे जाणारे. आम्हाला लोकांना तोंड दाखवावयास जागा उरणार नाही!' नानाजींनी कार्यकर्त्यांना स्पष्टपणे सांगितले, 'आत्तापर्यंत आयुष्यात सांगितलेली प्रत्येक गोष्ट करत आलो. दिलेला शब्द पडेल ती किंमत देऊन पाळत राहिलो! मी जयप्रकाशांना फक्त निवडणूक लढविण्याचे मान्य केलंय. त्यानंतर मला कोणीही दिल्लीत ठेवू शकणार नाही याची खात्री बाळगा! लोकांचा सहयोग, कार्यकर्त्यांची जिद्द आणि सरकारी मदत याच्या जोरावर आपण गोंडा जिल्ह्याचाच कायापालट करणार आहोत. मला फक्त हा जिल्हाच अभिप्रेत नाही. क्रांतीचे, परिवर्तनाचे चक्र येथून बाहेर पडेल!'– नानाजींनी मोरारजींनी देऊ केलेले उद्योगमंत्रिपद नाकारले याचे आम्हाला म्हणूनच नवल वाटले नाही. मात्र नानांचा संकल्प ऐकून त्यांचे फार जवळचे मित्र असलेले मोरारजी पण हसले. नानांना म्हणाले, 'न जमणारे काम हातात घेऊ नका!' प्रश्नाच्या उग्रतेचीच तुम्हाला कल्पना नाही. जास्तीत जास्त चार–पाच खेड्यांच्या सर्वांगीण विकासाचे काम हातात घ्या. ते नीटपणे करून दाखवा!' पण नानांनी ते मानले नाही. स्वामीनाथन, व्ही. व्ही. जोन यांनी नानांना खूप मार्गदर्शन केले. मिळेल तेथून माहिती आणि मदत मिळवत राहिले. त्यानंतर त्यांनी येथे जे करून दाखविले तो आता इतिहास आहे!

मी म्हटले, 'शारदाजी, तो इतिहासच मला तपासायचाय. मी मुरारजींना फारसा मानत नाही; पण त्यांचा सल्ला अधिक बरोबर आणि व्यवहारी होता, असे मला येथून हिंडताना वाटतंय; पण ते आपण नंतर बघू. तुमच्या कार्याची वा संघटनेची आखणी कशी काय आहे ते प्रथम समजावून घेऊ!

साऱ्या जिल्ह्याची पाच विभागात विभागणी केलेली आहे. प्रत्येक विभागाचा एक पूर्ण वेळ कार्यकर्ता आहे.

| **विभाग** | **कार्यकर्ता** |
|---|---|
| तरणगंज विभाग | रामप्रसाद द्विवेदी |
| हटियाथोप विभाग | पद्माकर मालवीय |
| बलरामपूर तहसील | कृष्णकुमार सिंग |
| गोंडा तहसील | रामप्रसाद गुप्त |
| उतरौला विभाग | विक्रमप्रसाद पांडे |

त्या विभागातील कामे, प्रश्न त्यांनी स्थानिक लोकांचा सहयोग निर्माण करून पहावयाची असतात. या साऱ्या विभागातून पुढे येणाऱ्या तरुणांना कार्यकर्त्यांना एकत्र आणून त्यांना वेगवेगळ्या स्पर्धांत व रचनात्मक कामात जिल्हापातळीवर गुंतवण्याचे काम 'तरुणोदय मंडळ' करते. आशुतोष पाठक त्या मंडळाचा प्रमुख आहे. त्याशिवाय शेती, पशुधन अशा गोष्टींसाठी जिल्हा पातळीवर काम करून कार्याला मार्गदर्शन करण्यासाठी व सुसूत्रता आणण्यासाठी जयप्रभाग्राममध्ये राहून काम करणारे विभाग-प्रमुख आहेत.

| **विभाग** | **प्रमुख** |
|---|---|
| पशुधन (गोविकास) | गणेश (बंडू) पाठक |
| कोंबडीपालन व मासेपालन | –सुरेश देशपांडे |
| स्वास्थ्य विभाग | डॉ. नंदकिशोर गुप्त |
| सर्वांगीण बालविकास | – ज्योती देशपांडे |
| कृषिविकास | – चंद्रशेखर सिंग |
| ग्रामोदय विद्यामंदिर | मृदुल पाठक |
| ग्रामविकास प्रकल्प | – नीलम देशपांडे |

याशिवाय हटियाथोप विभागात सर्वव्यापी आरोग्यसेवा (Health for all) कार्यक्रम सुरू आहे. डॉ. नरेंद्र गुप्ता येथे काम बघतात. डॉ. शुभनिकेत सिंग डोळ्यांचे डॉक्टर आहेत.

'शारदाजी, माफ करा. माझा थोडा घोटाळा होतोय. सरकारची पण जिल्हापातळीवर अशीच संघटना असते. ती यंत्रणा काम करीत नाही आणि तुमची करते असे काही आहे का? की तुमची यंत्रणा सरकारी यंत्रणेला पूरक आहे–सरकारचे पण असेच किंवा याहून अधिक विलोभनीय आकडे असतात. तुमचे शिवण, टाइपिंग, गालिचा विणणे, वेतकाम करणे, चपला बनवणे हे उद्योग मी पाहिले. मला ते खादी ग्रामोद्योग मंडळाच्या कामापेक्षा वेगळे वाटले नाहीत. गोंड्याचे तुमचे विक्रय–केन्द्र तर खादी ग्रामोद्योगाच्याच कचेरीत भरत असते. तुम्ही मिळून–जुळून का काम करत नाही? विहिरी खणावयास, पंपसेट बसवावयास सरकार व बँका भरपूर कर्ज देतच असतात. चंद्रशेखर जे शेतीसुधारणेचे काम करतोय ते शेती विद्यापीठांना व शेतकी अधिकाऱ्यांना करावयाचेच असते. तुमचे काम या सर्वांपेक्षा वेगळे कसे हे न समजल्याने माझा घोटाळा झालाय. तुम्ही तेच काम पुन्हा चांगल्या प्रकारे करत असलात तरी माझे काही म्हणणे नाही. तसे सरळ सांगा! एकच काम


कडक व रुचकर
खाण्यास अत्यंत मधुर

गाय छाप जर्दा
नेहमी वापरा
– उत्पादक –
मेसर्स दामोदर जगन्नाथ मालपाणी
संगमनेर (४२२ ६०५) जि. अहमदनगर
फोन – १८५

काम दोन वा अनेक संस्थांनी करून काही बिघडत नाही, असे मी मानतो. सेतू बांधावयाच्या वेळी खारोटीला स्वस्थ बसवत नाही आणि ती आपला सहयोग देते आणि दगड सुद्धा तरुन सेतू पुरा होतो, हे मला माहीत आहे; पण भारतातले या क्षेत्रात काम करणारे इतर प्रकल्प तुम्ही पाहिले का? त्यांच्यात आणि तुमच्यात फरक काय?'

शारदाजी फक्त निरागस हसतात. शारदाजींनी अशा या प्रकल्पांच्याबद्दल काही वाचलेलेसुद्धा नाही. बघणे वगैरे मग दूरच्या गोष्टी! बाबासाहेब आमटेंचे फक्त नाव त्यांना माहीत आहे. दिलेल्या आदेशांची प्रामाणिक अंमलबजावणी करत पहाटे चार ते रात्री अकरापर्यंत हा वृद्ध तरुण काम करत असतो. एक वेळ समाजशास्त्राचा प्राध्यापक होता; पण मग विचारांबद्दल हा तिटकारा का? मला एका मोगल सम्राटाची आठवण होते. तो सबंध ग्रंथालय जाळताना म्हणाला होता, 'कुराणात जे सांगितलंय तेच पुन्हा यात असेल तर याची वेगळी जरुरी नाही. ते यात नसेल तर त्याची मुळीच जरुरी नाही!'

अस्वस्थ होऊन मी शारदाजींना म्हटले, इतरांचे काम तुम्हाला माहीत नाही. तुमच्या कार्याचे नक्की स्वरूप तरी मला समजावून द्या!'

शारदाजी म्हणाले, 'आम्हाला माणूस घडवायचाय. आम्हाला नुसता ग्रामीण विकास (rural development) नको आहे. आम्हाला ग्रामीण नवरचना (rural reconstruction) करावयाची आहे. व्यक्ती बदलली पाहिजे!'

मी म्हटले, 'शारदाजी, सर्वोदयवादी, समाजवादी, नक्षलवादी, संघ सर्वांना तेच करावयाचंय; पण कसे करावयाचे हे मला समजलेले नाही!'


शारदाजींचे माझ्याकडे लक्ष नव्हते. तन्मय होऊन ते बोलत होते, 'देव आणि राक्षस यांच्यात फक्त एकच साधा फरक होता. राक्षस रसातळाला गेले. देव अमर बनले. एकदा देव-दानवांना विष्णूने जेवावयास बोलावले होते. जेवण फार छान होते. विष्णू देव-दानवांना म्हणाला, 'पोटभर जेवा. फक्त एक गोष्ट करावयाची. जेवताना हाताचा कोपरा वाकवावयाचा नाही.' हे जमणार नाही म्हणून विष्णूला शिव्या घालत दानव निघून गेले. देव म्हणाले, 'हे फार सोपे आहे. एक देव दुसऱ्याला भरवू लागला. दुसरा पहिल्याला भरवू लागला. आपण दुसऱ्यासाठी आहोत हे ओळखले तर...'

दोन दिवसांपूर्वी गोंडा तहसीलचे काम करणारा रामप्रकाश गुप्ता मला अगदी हेच सांगत होता. मला हे ऐकताना विनोबाजींच्या एखाद्या प्रवचनाची आठवण होत होती. मंडळींना छेडण्यात अर्थ नाही. मुद्द्याला हात न घालता गोल गोल फिरत राहतात. बौद्धिकाच्या चरकात आपल्याला पिळून काढतात! मी विषय बदलत म्हटले, 'अजून ग्रामदैवत पाहिलेले नाही. तुमच्याबरोबर पहाणार आहे. चला!'

शारदाजींची कळी खुलली. बैलांच्या जोरावर चालणारा पंप पवनचक्कीच्या थोडा पुढे आहे. मी त्या पंपाला ग्रामदैवत बनवलंय हे शारदाजींना फार आवडलंय.

आम्ही बाहेर पडतो आणि भाषणाचा सांधा बदलतो. शारदाजींना मी म्हणालो, 'आकड्यांच्या फूटपट्टीने मी हे काम मोजत नाही. तुमची येथील खरी कमाई सांगा!'

शारदाजी म्हणतात, 'दोन महत्त्वाच्या— फार महत्त्वाच्या गोष्टी आम्ही केल्यात!' खेड्यातील तळागाळाचा माणूस तुम्हा




शहरी माणसांना प्रथम स्वीकारावयासच तयार नसतो. तुमचा स्वत:चा काही स्वार्थ असल्याशिवाय तुम्ही त्याचे काम करावयास याल हे त्याला अजिबात पटत नाही. लोक तुम्हाला भयंकर बिचकतात. माझी व कार्यकर्त्यांची गोष्ट सोडा. नानाजी, तुम्हाला आमच्याकडून वा सरकारकडून दलाली हवी आहे का ? येथून निवडणूक लढवावयाची आहे का ? म्हणून लोक विचारत—

'बाबूजी, आप हूँ ह्यां कितना पैसा लिहिए' हे नानाजींना विचारले जाणारे प्रश्न कानात पडणाऱ्या तापलेल्या तेलासारखे वाटत. ते चित्र आता बदललंय. आम्हाला या लोकांनी स्वीकारलंय. आमच्या प्रामाणिकपणाबद्दल सर्वसामान्य माणसांच्या मनात निर्माण झालेला हा विश्वास ही आमची खरी कमाई आहे. भक्कम पायाभरणीचं काम झालंय. दुसरी गोष्ट म्हणजे आमचे सर्व कार्यकर्ते तरुण आहेत आणि ग्रामीण भागातून आम्हाला कोणत्याही पक्षाची वा संघटनेची बांधिलकी न मानणारी खूप तरुण माणसे मिळालीत. ही मंडळी त्यागी आणि कष्टाळू आहेत. आमच्या संघटनेचे जाळे, तण-तणाव म्हणा हवे तर, छान पसरलंय. पुढील चार-पाच वर्षांत विश्वास बसणार नाही असे काम वाढेल. आमच्या उड्डाणाची वेळ (take off period) आलेली आहे. ग्रामीण भागातील सर्जनता (creativity) हेरून, ती विकसित करून वापरण्यात पण आम्हाला यश मिळालंय. बांबूचे नळ आणि बैलजोडीवर चालणारा पाण्याचा पंप ही त्याची उदाहरणे आहेत. या पाण्यावर वीज तयार करून उद्या आम्ही शेतकऱ्यांचे थ्रॅशर व इतर यंत्रे पण चालवू शकू !

माणसे व यंत्रे कशी विकसित होतात याची ही एक रोचक कहाणी आहे. नरहपूर खेड्यातील राम दुलारे भट या शेतकऱ्याने आठ फूट व्यासाचे एक लाकडाचे बैलगाडीचे चाक बनविले आणि त्याला रबराचा पट्टा लावून पाच अश्वशक्तीवर चालणाऱ्या एका पाणी खेचण्याच्या पंपाला तो बसवला. त्यात त्याच्या मित्रांनी सुधारणा केल्या आणि बॉलबेअरिंग बसवून तो जयप्रभाग्रामला बसविला गेला. एक माणूस सहजपणे हे चाक फिरवू शके. पाच अश्वशक्तीचे इंजिन सेकंदाला १९ बादल्या पाणी देत असे. हा पंप फक्त तीन बादल्या पाणीच दर सेकंदाला देऊ शके, गोंडा सोडून मुंबईला जाऊन स्थायिक झालेला चांद महंमद परत आला त्या वेळी त्याने हे पाहिले. आपल्या गावाला असे काही होतंय याचा त्याला खूप आनंद झाला. आपले मित्र हरिशंकर मिश्र आणि महादेव यांच्याशी त्यांनी खूप चर्चा केली. यंत्रात आणखी सुधारणा झाल्या. बैलजोडीवर चालणारे व तीन अश्वशक्तीचे काम देणारे इंजिन जयप्रभा ग्रामला उभे राहिले. त्या इंजिनमध्ये अजून खूप त्रुटी आहेत. खूप सुधारणा कराव्या लागतील; पण प्रयोगाचे, नवनिर्मितीचे, सहकार्याचे एक युग त्यातून सुरू झालंय. गावकऱ्यांनी हरिशंकरजीला आपल्या खर्चाने आणि नानांच्या मार्गदर्शनाने अलाहाबादच्या 'इन्स्टिटयूट ऑफ रूरल इंजिनिअरिंग अँन्ड टेक्नॉलॉजी'-मध्ये उच्च शिक्षणाला पाठविले आहे. पहिल्या वर्षीच्या परीक्षेत ८३ टक्के मार्क मिळवून तो पहिला आलाय ..

बोलत बोलत आम्ही ग्रामदैवत असलेल्या त्या पंपाजवळ पोचलो. बैलांचा तिथे पत्ता नव्हता ! शारदाजी सहजपणे म्हणाले, 'आपण दोघे ओढू या. पाणी भरभर बाहेर येईल !' मी शारदाजींकडे पाहिले. या म्हाताऱ्याचा काही नेम नाही. हा नक्की पंप ओढायला लागेल.—पुस्तकी वाचन करणे, बैठकीवर बसून शाब्दिक खटपटी-लटपटी करणे सगळे ठीक आहे. या शेलारमामाबरोबर असे काम करणे म्हणजे !—ते माझ्या शहरी बौद्धिक संस्कृतीत बसत नाही ! माझ्या शहरी गनिमी काव्याने मी त्यांना सहजपणे गुंगारा दिला आणि तेथून पसार झालो !

¤



¤

नानाजींबरोबर ग्रामदैवताला भेट !
समोर बैलजोडीवर चालणारा
ट्यूबवेलवरचा पंप

¤

## सात


आणखी काही दिवस येथे राहिलो तर माझा चक्क सखाराम गटणे बनेल ! चेहऱ्यावर नम्र भाव ठेवावयाचा. चेहरा हसरा राखावयाचा. समोरच्या माणसाशी हळू आर्जवी भाषेत बोलावयाचे. प्रत्येकाचा नम्रतेने जी लावून उल्लेख करावयाचा. जसे शारदाजी, दाभोळकरजी, शुक्लाजी, आचारीजी, पाणकेजी वगैरे वगैरे ! शुद्ध झालात का ? म्हणजे आंघोळ केलीत का ? मला तर कोपऱ्यात कुठे तरी बसून दोन-चार इरसाल शिव्या हासडून एकदा मोकळे व्हावेसे वाटतंय ! भाषेचे विसरा; पण हवा अशी मस्त पडलीये ! थंडी नाही, उकाडा नाही. भोवताली वसंत फुललाय ! निवांतपणे चहा घेत कांदाभजी वगैरे खावीत. समोरच्या तळयात म्हणे राऊसारखा चवदार मासा सोडलाय. पलीकडे कोंबड्या खुणावताहेत; पण जेवण वगैरे सात्त्विक असावे. आहार आणि मन यांचा जवळचा संबंध असतो, यावर मंडळींचा जाम विश्वास दिसतोय. माझे खाण्याचे फारसे चोचले नाहीत. काहीही असावे; पण हदपून खावयास असावे. तडी लावून जेवावे हा माझा खाक्या; पण मीसुद्धा जीभ पार बिघडवलेला एक शहरी माणूस आहे हे माझ्या लक्षात आलंय !

मध्यवर्ती भोजनगृहाची कळा खेड्यातील एखाद्या खानावळीची आठवण यावी अशी आहे. तसलेच तीन–चार बाक आहेत. कोपऱ्यात लाकडाच्या मोळ्या ठेवल्यात. रेल्वेत असतात तशी कप्पे असलेली जेवावयाची ताटे. भरपूर माशा सगळीकडे घोंगावताहेत. बागेतील ताजी वांगी–बटाटे आहेत; पण त्यांचे मीठ–मिरची लावलेले, चव नसलेले दबदबे आहे. तूप न लावलेले गरम गरम कोरडे फुलके आहेत. केन्द्रप्रमुख, त्यांचा ड्रायव्हर, कालचा कार्यकर्ता एक पत्रकार सगळी मंडळी घरच्यासारखी मांडीला मांडी लावून,– मांडी लावून कसली बाकावर चक्क मांडी घालून जेवावयास बसलीत. हा यांचा रोजचा कार्यक्रम. जेवण सकाळी ११–१२ ला. त्यामुळे सकाळचा नाश्ता वगैरे शहरी प्रकार यांना माहीत नाही !

– शारदाजींचा आणखी एक पैलू जेवताना माझ्यासमोर उलगडतो. शारदाजी दिवसातून फक्त एक वेळ जेवतात. हे व्रत गेली तीस वर्षे सुरू आहे. शारदाजी सांगतात बावन्न सालची गोष्ट. नेहमीप्रमाणेच संघ बिकट आर्थिक परिस्थितीतून जात होता. गुरुजींच्या सुवर्णजयंतीचा निधी अजून जमावयाचा होता. भारतातील साऱ्या संघ-प्रचारकांची सभा रजू भैय्या म्हणजे प्रो. राजेंद्रसिंगजी घेत होते. ते म्हणाले, 'तुम्ही फारसा खर्च करता असे मला म्हणावयाचे नाही; पण तुम्ही चारशे जण आहात. दररोज दिवसाला प्रत्येकी दहा पैसे खर्च कमी केलात तरी आपण दिवसाला चाळीस रुपये वाचवू !' आपण आणखी खर्च कसा काय कमी करावयाचा, शारदाजींना समजले नाही. त्यांनी आजन्म एक वेळ जेवण्याचे ठरवले ! मी अवाक् होऊन शारदाजींकडे बघत होतो. समाजाचे कोणते ऋण फेडावयास ही माणसे जन्माला येतात ? समाजाचे कोणते देणे चुकवून ही माणसे स्मृतीआड होतात ? ही मंडळी आणि गांधीवादी सर्वोदयवादी यात नक्की फरक काय हेच मला समजेना. मंडळी भलतीच गांधीवादी बनताहेत कदाचित पहिल्यापासूनच असतील. मला आज ते समजतंय.–गांधीवादी आणि ही मंडळी या दोघांनाही याचा अजूनही पत्ता नाही हा मुद्दा वेगळा !

पण शारदाजींच्या एक वेळ जेवणाचे फार वेळ कौतुक करणे मला शक्य नव्हते. जेवणाचा हा असाच प्रकार असेल तर लवकरच मी सुद्धा एक वेळचे जेवण पसंत करीन ! मी माझे शहरी डोके लढवतो. मला सुरेश देशपांडे आठवतो. उंच, शिडशिडीत, सावरकर–वाङ्मय वाचलेला ! सुरेश देशपांडे आणि गणेश पाठक हे दोन महाराष्ट्रीय तरुण येथे आहेत. इतक्या सफाईने हिंदी बोलतात की मराठी आहेत हे समजूच नये. बाहेरचे कोणी आले की त्यांना आपण परके वाटू नये म्हणून घरातसुद्धा जाणीवपूर्वक हिंदी बोलतात. त्यातून येथे नावाने हाक मारावयाची पद्धत. आडनाव वगैरेचा पत्ता नाही. हा सुरेशजी, तो गणेशजी. हे दोघे मराठी आहेत हे ओळखावयाची एकच खूण होती. यांच्या दिवाणखान्यात गुरुजी, गांधी, जयप्रकाश, दीनदयाळ यांच्या फोटोंबरोबरच मराठी कालनिर्णय पण होते ! भारतभरच्या मराठी माणसांना जोडणारी तेवढीच एक खूण हल्ली बाकी आहे ! सुरेशने सावरकर वाचून पचवलेत. त्यातून येथे तो मासे-पालन व कोंबडी–पालनविभाग बघतो. तो माझी अडचण ओळखतो. म्हणतो जेवणाला घाबरून पळून जाण्याच्या फंदात पडू नकोस ! आज संध्याकाळी माझ्या घरी झणझणीत कोंबडीचा बेत करतो. तुझ्या निमित्ताने मलाही खूप दिवसांनी खावयास मिळेल !

सुरेश अकोल्याचा. अर्थशास्त्र घेऊन तो एम. ए. झालाय. त्याचा थोरला भाऊ प्राध्यापक आहे. धाकटा प्रचारक बनलाय. घरी वृद्ध आईवडील आहेत. सुरेश पाच वर्षे महाराष्ट्र सरकारच्या वीज आणि पाटबंधारे विभागात चांगल्या नोकरीवर होता. एक दिवस याच्याही डोक्यात वारे शिरले. सहजपणे नोकरी सोडली आणि येथे आला. आल्यावर काही महिने गवताच्या झोपडीत रहात होता. आता कच्च्या भिंतीच्या पेट्यांची फळकुटे लावून खिडक्यांची दारे केलेल्या, वीज नसलेल्या घरात राहतो दारासमोरच्या हातपंपाने पाणी काढतो. येथे आल्यावरच त्याने लग्न केले. त्याची बायको कानपूरची. बायकोच्या घरचे वातावरण पण असेच आहे. तिची थोरली बहीण 'राष्ट्र सेविका समितीची' आजन्म प्रचारिका आहे. 'राष्ट्र




सुरेश देशपांडे

सेविका समिती ' म्हणून काही प्रकार असतो हे मला प्रथमच समजत होते. हा ब्राह्मण; याची बायको सी. के. पी. दोघांनीही जाणीवपूर्वक विवाह केलाय. यांचे लग्न कानपूरला झाले. याचे आईवडील, थोरला भाऊ लग्नाला आले होते; पण लग्नानंतर जयप्रभाग्रामचे काम येवढे वाढलेले होते की, लगेच हा बायकोसह जयप्रभाग्रामलाच परत आला. हनीमूनला वगैरे जाणे दूरच्या गोष्टी. लग्नानंतर सहा महिन्यांनी घरच्यांना भेटावयास अकोल्याला धावता जाऊन आला!

सुरेश सांगत होता. आज जयप्रभाग्राम पाहण्याला आम्ही कशी सुरुवात केली ते समजणार नाही. अजूनही पावसात पाऊल साफ बुडणाऱ्या चिखलातून जावे लागते. साप–विंचू या दररोजच्या गोष्टी असतात; पण तरीही पावसाळा बरा वाटतो. उन्हाळ्यात वरचे पत्रे तापतात. भट्टीची आठवण होते. झाडाखाली जावे तर धुळीची वादळे सुटलेली असतात. माठातील गार पाणी एवढा एकच आधार असतो; पण उभे राहणारे काम पाहिले की, सारे काही विसरावयास होते. कोंबडीपालन, मासे पाळणे या याला संपूर्ण नव्या गोष्टी होत्या. खूप काही शिकावयाचे होते. तो त्यात रमून जाई. बायकोने शाळेचे काम सुरू केले. तिला त्याची सवय होती. आता जयप्रभाग्राम गोकुळासारखे गजबजलंय. जोडपी आहेत. वर्षाच्या आतली चार–पाच छोटुकली मुले आहेत; पण याची बायको जयप्रभाग्राममधील पहिली बाई होती. गणेश पाटक हा जयप्रभाग्राममधला पहिला पुरुष कार्यकर्ता! या माळरानावर पहिले झेंडे रोवणारे स्त्री-पुरुष असे मराठी आहेत.

कोंबडीपालनाचे शिक्षण घेण्यासाठी सुरेश हैद्राबादच्या सिंग पोल्ट्रीफार्ममध्ये गेला. पुस्तके आणि पोल्ट्रीफार्ममधले शिक्षण यापेक्षा आपले आपणच प्रयोग करत शिकले पाहिजे हे त्याने ओळखले. या भागात कोंबडीपालन अद्याप यशस्वी झालेले नाही. अंडी अजूनही पंजाबातून आणि हरियानामधून येतात. हवा हे एक वरवरचे कारण होते. कोंबडीचे खाणे बनविणारा कारखाना दूर बनारसला होता. लखनौमार्गे येथे आणून ते कोंबडीचे खाणे सव्वादोन रुपये किलो पडे. कोंबडीच्या अर्थशास्त्रात ते बसत नव्हते. यांनी येथेच ते खाणे बनवावयास सुरुवात केली. कोंबडी पाळणाऱ्याला ते ना नफा ना तोटा या तत्त्वावर दीड रुपया किलोने देता येईल. मोठ्या पोल्ट्रीमध्ये अंडी फुटल्यावर जी पिल्ले बाहेर येतात ( chicks, चुझे ) त्यांना पहिल्या आठवड्यात ९५ फॅरेनाइट उष्णतामान द्यावे लागते. १०० वॅटचे बल्ब लावून वा इन्फ्रारेडचे दिवे लावून हे काम करतात. येथे तर वीजच नाही वीज नसलेल्या ठिकाणी पेट्रोमॅक्स, कंदील, शेगडी या सर्वांतून ही उष्णता कशी द्यावयाची ते प्रयोगाने ठरवावे लागले. कोंबडीने अंडी द्यावयाच्या वेळी जास्त वेळ उजेड राहिला तर ती जास्त खाते व चांगली व जास्ती अंडी देते हा उजेड पण कंदिलाने देता येतो हे लक्षात आले. खूप प्रयोग करून नक्की गणित ठरवावे लागले.

सुरेश पुढे सांगत होता. कोंबडीपालन इतरत्र पसरवावयाच्या बाबतीत मी वेळापत्रकाच्या थोडा मागे आहे; पण आता या कामातील विश्वास इतका वाढलाय की, पुढील वर्षाच्या अखेरीपर्यंत खूप काम झालेले असेल. आम्ही जिल्ह्याचे २५ भाग केलेत. प्रत्येक भागात एक हजार पक्षी असलेले



पुढच्या काही वर्षांतच या तलावात माशांचं पीक निघेल – सुरेश सांगत होता.

एकेक केन्द्र असेल, केन्द्रचालकांना सारे शिक्षण आम्ही देऊ. कोंबड्यांच्या आजाराचे दवापाणी जयप्रभाग्रामला आहे. कोंबडी फाडायला इंजेक्शन द्यावयाला मी शिकलोय. ते त्यांना पण शिकवले जाईल कोंबडी-पालनासाठी सरकार तेहत्तीस टक्के मदत (subsidy) देते. त्यातही आम्ही लोकांना खूप मदत करू. या हजार पक्षी असलेल्या केन्द्रांना आपल्या विभागात इतर लोकांना छोट्या–मोठ्या प्रमाणात कोंबड्या पाळण्या-साठी मदत पण करावी लागेल. गोंडा तह-सीलमधील हटियाथोप ब्लॉक आम्ही मोठ्या प्रमाणात काम करण्यासाठी निवडलाय. या एकाच ब्लॉकमध्ये आम्ही प्रत्येकी एक हजार पक्षी असलेली पन्नास केन्द्रे ( Poultry farms) उभी करणार आहोत.

मी सुरेशला मध्येच थांबवले. मी म्हटले तू उद्या काय करणार आहेस ते मला नको आहे. तू काय केले आहेस ते मला सांगतोस का ?

सुरेश पण माझ्यासारखाच मराठी आहे हे मी विसरलोय. रोखठोक प्रश्न व रोखठोक उत्तरे मराठी माणसाला आवडतात !

तो म्हणतो, काम अपेक्षेपेक्षा वा वेळा-पत्रकापेक्षा कमी झालंय हे मी तुला आधीच सांगितलंय; पण पायाभरणी, वातावरण-निर्मिती ( infrastrucuture ) तयार आहे हे तुला नाकारता येणार नाही. तुला आव-डेल अशी आणखी एक गोष्ट सांगतो ज्याला घरगुती कोंबडीपालन म्हणता येईल, जेथे पन्नास–शंभर पक्षी पाळलेत, अशी २५० घरे सध्या येथे आहेत. मी सांगतोय ते नीट लिहून घे. या २५० घरांपैकी नव्वद टक्के घरे मुसलमानांची आहेत. संघाच्या एका निष्ठावान स्वयंसेवकाने जातीची नव्हे तर धर्माची बंधने कधीच झुगारलीत आणि साऱ्या समाजाचा उद्धार करावयाचा आहे ही दीनदयाळ-जयप्रकाश यांची हाक ऐकलीये हे तरी मान्य कर ! तुझी इच्छा असेल तर या माझ्या मित्रांच्या वा भावांच्या घरी माझ्या-बरोबर चल ! सध्या काय वाचले आहेस व काय पाहिले आहेस हे तुझे आवडते प्रश्न मला उगाच विचारून तुझा वेळ उगाच फुकट घालवू नकोस ! मी बाहेरचे काही-एक वाचलेले वा पाहिलेले नाही. गेल्या तीन-चार वर्षांत कोंबडी, मासे आणि हे लोक याच्यापलीकडचे जग मला नाही. पक्ष्याच्या डोळ्यावर अचूक नेम मारावयाचा असेल तर बाकीचे सारे काही विसरायची अर्जुनाने केलेली साधना पण करावीच लागते ! मासे-पालनाच्या कामातही अजून खूपच कमी काम झालंय हे तू आपल्या चाणाक्ष नजरेने हेरलेच असशील; पण पुन्हा हे कामही नवीन होते. सुरुवातीला काही गणिते, कोष्टके चुकणे अपरिहार्य असते; पण या विभागात या कामाची खूप जरुरी आहे. बलरामपूर विभागात पूर्वीच्या राजवटीने खूप तलाव बांधलेले होते. त्यातून या विभा-गात सर्वत्र घरे नसत्या मानीची असतात. घरे बांधावयास कोणीही माणूस गावातील एका ठरलेल्या सार्वजनिक ठिकाणाहून माती मोफत आणू शके.काही काळाने तेथे आपो-आप तलाव निर्माण होत. या साऱ्या तलावांत पुढील काही वर्षांत आम्ही भरपूर माशांची शेती करू शकू. माझा बराचसा वेळ जय-प्रभाग्रामच्या मध्यावर असलेला तो तलाव बांधण्यात पण खर्च झाला. '


तीनशे फूट बाय तीनशे फूटचा आणि आठ फूट खोल असलेला तो तलाव मी पाहिलेला होता. तो मला खूप आवडला होता. त्याला लागून पवनचक्की आहे. तलावाला लागूनच दोन छोटे मासे उत्पादन करावयाचे तलाव आहेत. तलावात बसून पायाने सायकलसारखी चालवावयाची एक बोट आहे. त्यातून मी मनसोक्त फिरून पण आलो होतो; पण अद्याप तेथे मासे नाहीत. पण लवकरच हे कार्यही उभे राहील, जोमाने उभे राहील असा विश्वास वाटतो.

सुरेश म्हणाला, ' बदके पाळण्याचे मी नक्की केलंय. तू म्हणतोस तर बेडूक पाळून अमेरिकन डॉलर्स मिळविण्याचा पण प्रयत्न करीन. मला तुझ्याकडे असेल ती माहिती पाठव !'

चंद्रशेखरला माझ्याकडून पेपिन्स बनव-ण्याची माहिती हवी होती. हे सारे लोक आपल्या विभागातल्या, विषयातील ज्ञानाचे भुकेलेले आहेत हे माझ्या लक्षात आले होते.

सुरेशच्या घरचे जेवण हा एक विसरता येणार नाही असा खास अनुभव होता.त्याची बायको ही सी. के. पी. आहे म्हणून सांगित-ल्यावर ती सुग्रण आहे हे वेगळे सांगावयास नको. मध्यभागी कोंबडीचा रस्सा ठेवला होता. जेवावयास ताटे नव्हतीच, छोट्या छोट्या भांडी झाकावयाच्या वेळण्या होत्या. गप्पा मारत भात, कोंबडी, चपाती, बागेतील ताजा कांदा खात आम्ही चवीने गप्पा मारत निवांतपणे जेवत होतो. माणसे आपल्या त्यागाचा आणि साधेपणाचा बडेजाव न माज-वता आपल्याच तंद्रीत रुबाबात कशी जगू शकतात ते मला कळले. रात्री खूप वेळपर्यंत आम्ही अनेक विषयांवर बोलत बसलो होतो. मी त्याला म्हटले. या देशातील प्रश्नाला एकच उत्तर नाही. त्यातून प्रश्नही विश्वास बसू नयेत इतके वेगवेगळे आहेत. पुण्या-मुंब-ईला सध्या घटस्फोट वाढताहेत. येथील कोणीही उच्चशिक्षित तरुणाला आणि कार्य-कर्त्याला त्या प्रश्नाची साधी कल्पनाही करता येत नाही. आपापल्या गावात एकत्र कुटुंबपद्धती मोडावयास आलेली आहे. उद्या-परवा ती कदाचित मोडेल म्हणून ते तरुण अस्वस्थ आहेत. या विषयावर बोलावयास लागले की, एकत्र कुटुंबपद्धतीची आवश्यकता या विषयावर ते भान विसरून भावव्याकुळ होऊन बोलत बसतात. तुमचा संघ तरी एक-संघ असेल अशी माझी कल्पना होती. या वातावरणात राहणाऱ्या इथल्या तुमच्या तरुण कार्यकर्त्यांचे विसर. त्यांनी जातिव्यव-स्थेचे, गोरक्षणाचे, लग्नातील जातीच्या बंध-नांचे समर्थन केले तर मी समजू शकतो; पण शारदाजींच्यासारखा वंदनीय माणूससुद्धा ठामपणे वर्णव्यवस्थेचे कौतुक करतो आणि हरिजन ब्राह्मण यांचे वेगळेपण सांगत बसतो आणि त्याच वेळी नम्रपणे पण ठामपणे शार-दाजींच्या विरुद्ध आवाज उठवून सत्तेचाळीस साली हा देश स्वतंत्र झाला, संपूर्ण क्रांतीत मुसलमान येतातच. अकबराच्या राजपूतांशी लग्न करण्याच्या धोरणानेच त्याचे राज्य वाढले आणि हरिजन ब्राह्मण विवाह मोठ्या प्रमाणावर होईपर्यंत हिंदू संघटन होणार नाही म्हणून तू बनवारी वगैरे मंडळी त्यांना सांगत बसता–हा देश म्हणजे माणसे आणि प्रश्न यांनी भरलेला एक अजबखाना आहे आणि वरवरची संघटनेतील शिस्त सोडली तर विचारांच्या पातळीवर तुमचा संघ म्हणजे सुद्धा एक कुंभमेळा आहे ! सुरेश माझा फार जवळचा मित्र बनलाय. ◻

( अपूर्ण : पुढील अंकी चालू )


ब्लड कॅन्सर



**पूर्वसूत्र :** चार्लस् मार्टल हा शाफ्ट्सबरी नावाच्या गावातला मोठा संशोधक शास्त्रज्ञ. वाइनबुर्गर इन्स्टिटय़ूटमध्ये पूर्ण वेळ संशोधक म्हणून काम करणारा. कॅथरिन ही त्याची दुसरी बायको. चक, जीन पॉल आणि मिचेली ही कॅथरिनची तीन सावत्र मुलं. मिचेली ही बारा वर्षांची कोवळी मुलगी. तिला अचानक सारखा ताप येऊ लागला. मिचेली दिवसेंदिवस क्षीण बनत चालली होती.
अंगातून ताप हटेना तेव्हा कॅथरिननं मिचेलीला डॉ. विली यांच्या हॉस्पिटलमध्ये नेलं. शेजारच्या मार्गीच्या मुलाला–टेडला–अप्लास्टिक अनेमिया झाल्याची भयंकर बातमी तिनं नुकतीच ऐकली होती. कॅथरिनला एकाच शंकेनं ग्रासलं होतं–मिचेलीला तोच रोग तर झाला नाही ना ? चार्लस् मार्टल त्याच्याच व्यापात गढला होता.
त्याचं पुरं होत चाललेलं संशोधनाचं काम थांबवून डॉ. ब्रिग्टनचं 'कॅन्सरान' प्रोजेक्ट बळजबरीनं त्याच्या गळचात बांधलं गेलं होतं.

◻

अगदी वेगळ्या व नवीन विषयावरील ही हृदयस्पर्शी कादंबरी.

मागील अंकात पहिली चार प्रकरणे दिली. पुढे....

मूळ लेखक : डॉ. रॉबिन कुक : मूळ कादंबरीचे नाव 'फीव्हर.'

मुक्त अनुवाद : प्रा. म. रा. राईलकर

## पाच

वाइनबुर्गर इन्स्टिटयूट सोडून तो हॉस्पिटलकडे निघाला. त्याला कॅथरिनचं वागणं दुष्टपणाचं वाटलं. ' काय झालं असेल ? पुन्हा मिचेलीच्या नाकातून रक्त यायला तर नसेल ना लागलं ? नाही तर एखादी रक्तपरीक्षा करायची असेल आणि ही घाबरली असेल; पण काय ते तिनं फोनवरनं सांगायला हवं होतं. काही विशेष नसेलही. ही आपली नेहमीच हॉस्पिटलला भिते. '

डॉ. विलींच्या खोलीबाहेर तर पेशंट-पोरं नि त्यांच्या आया ह्यांची ही गर्दी झाली होती. कॅथरिन कुठं दिसेना. गर्दीतून वाट काढत तो नर्सच्या टेबलापाशी पोचल्या. दोन-चार आया तिला एकदम प्रश्न विचारून भंडावीत होत्या. तशातही ती शांतपणं सर्वांना उत्तरं देत होती. त्याच्याकडे जेव्हा तिचं लक्ष गेलं तेव्हा तो म्हणाला, ' इथे श्रीमती मार्टल आल्यात ना, त्यांना भेटायचंय. माझ्या पत्नी त्या. ' नर्स ताबडतोब उठली. तिचा चेहरा एकदम गंभीर झाला. आत जाऊन तिनं कु. हॅमरस्मिथला बोलवून आणलं. तिनं चार्लसला एकीकडे बोलावलं. ' माझ्या मागून या ! ' ती म्हणाली. चार्लसचा जीव थोडा थोडा झाला.

एकामागोमाग एक खोली पार करीत ती टोकाच्या खोलीपाशी आली. दार उघडून तिनं चार्लसला आत प्रवेश करायला सुचवलं आणि तो आल्यावर दार बंद केलं. त्याला पाहताच कॅथरिन उठली आणि धावत त्याच्यापाशी आली. त्याच्या गळयात हात टाकून. तिनं रडायला सुरवात केली. थोडा वेळ जाऊ दिल्यावर त्यानं हाक मारली, ' कॅथरिन ! ' त्याच्याही मनात भीतीनं घर केलं. ' कॅथरिन, काय झालं एकदम ?'

' माझंच चुकलं, ' इतकं म्हणून तिनं पुन्हा रडायला सुरुवात केली.

' आता कृपा कर आणि लवकर काय ते सांग. तुझं चुकलं म्हणजे काय ?' तो वैतागला

हुंदके देत देत ती म्हणाली, ' मिचेलीला आधीच घेऊन यायला हवं होतं. मीच हयगय केली. '

' काय झालंय मिचेलीला ?' त्याच्या पोटात एकदम खड्डा पडला.

कॅथरिननं आपली मिठी आणखी घट्ट केली. इतका वेळ ओढून आणलेलं तिचं बळ ओसरलं. मोठ्या कष्टानं त्यानं तिचे हात सोडवले आणि तत्क्षणीच ती कोसळली ! तिला एका खुर्चीवर बसवून तोही शेजारी बसला.

' कॅथरिन, काय झालं ते मला कळू दे तरी! ' तिनं मान वर केली, तिचे डोळे डबडबले होते. तितक्यात डॉ. विली आत आले. डॉक्टरना पाहताच चार्लस उठला. त्यांच्या चेहऱ्याकडे बारकाईनं पाहू लागला. त्याची आणि डॉ. विलींची वीस वर्षांची ओळख होती. तो विद्यार्थी असताना ते बालरोगचिकित्सेच्या तिसऱ्या वर्षाला होते. त्यामुळं नंतर ज्या ज्या वेळी त्याला बालरोगतज्ज्ञांची गरज भासे तेव्हा तो डॉ. विलींकडेच येई.

' बऱ्याच दिवसांनी भेटलात. बरं वाटलं ! ' डॉ. विली म्हणाले, ' प्रसंग मोठा कठीण आला आहे. '

' काय कठीण प्रसंग आहे मला सांगता जरा ! '

' म्हणजे तुला काहीच माहिती नाही ?' कॅथरिननंही मान हलवली.

' ठीक आहे. मी थोडा वेळ बाहेर जाऊन येतो. ' असं म्हणून डॉ. विली निघाले. चार्लसनं त्यांना अडवलं. ' तुम्हीच सांगा मला, काय झालंय ते ! '

डॉ. विलींनी कॅथरिनकडे पाहिलं. तिनं मान हलवताच हे म्हणाले, ' ठीक आहे. जरा खाली बसतोस का ?'

' लवकर सांगता का ?'

' मिचेलीला ल्युकेमिया झालाय! ' डॉ. विली म्हणाले. तो क्षणभर सुन्न झाला. समोरचं काही दिसेना. त्याला फक्त दूरवरून शब्द ऐकू येऊ लागले ' आम्हाला सांगायला वाईट वाटतं डॉ. मार्टल; पण तुमची पत्नी इलिझाबेथ हिला तीव्र लिम्फोमा झालाय...आम्हाला फार वाईट वाटतं ..डॉ. मार्टल, आम्हाला फार वाईट वाटतं, हा ल्युकेमिया बरा होण्यातला नाही...डॉ. मार्टल, फार वाईट झालं, तुमची पत्नी...'

' अशक्य! खोटं आहे हे! ' चार्लस इतक्या मोठ्यानं ओरडला की डॉ. विलीच काय पण कॅथरिनही चमकून पाहू लागली.

' चार्लस, ' डॉ. विलींनी त्याच्या खांद्यावर हात ठेवला.

विजेच्या झटक्याप्रमाणं त्यत डॉक्टरांचा हात झिडकारून दिला. ' काही नकोय माझं सांत्वन करायला ! '

तशा परिस्थितीत कॅथरिन चटकन उठली आणि डॉ. विली पाऊलभर मागं सरकताच, तिनं चार्लसचा हात धरला.

' मी थट्टा करीत नाही ! ' डॉ. विली सौम्यपणं म्हणाले, ' चार्लस, मला तुझ्या पत्नीचा आजार माहिती आहे. तेव्हा हे सर्व तुला किती जड जात असेल हेही मला कळतं; पण मिचेलीकरता तुला सावरलं पाहिजे ! '

कसंबसं त्यानं स्वतःला आवरलं. ' कशावरून तुम्ही ल्युकेमियाचं निदान केलंत ?' कॅथरिनही खाली बसली.

' झालेल्या परीक्षा अगदी निर्णयात्मक आहेत ! '

' कोणत्या प्रकारचा ल्युकेमिया ? लिम्फोसायटिक ?'

' माफ कर; पण तो तीव्र स्वरूपाचा मायलोब्लास्टिक आहे ! '

' सांगायला वाईट वाटतं...सांगायला वाईट वाटतं...डॉक्टरमंडळींची ठोकळेबाज वाक्यं ! ' ..काय बोलायचं कळलं नाही की आपलं बोलायचं...सांगायला वाईट वाटतं की आपल्या पत्नीला...' त्याच्या डोक्यात घण बसू लागले.

' आणि ल्युकेमिक-पेशी फिरत्या आहेत का ?' त्यानं आठवायचा प्रयत्न केला.

' सांगायला वाईट वाटतं; पण तसंच आहे. श्वेतपेशींची संख्या पन्नास हजार आहे ! ' भयाण शांतता पसरली.

' पण अस्थिमज्जेची परीक्षा केल्याशिवाय कोणीही ल्युकेमियाचं पक्कं निदान करीत नाहीत ! ' एकदम चार्लस म्हणाला.

' ती पण करून झालीय ! '

' होईल कशी ? संमती कुठं घेतली होती माझी ?'

' मी दिली होती.' कॅथरिनला वाटलं आपण फारच मोठा गुन्हा केलाय.

तिच्याकडं दुर्लक्ष करून तो म्हणाला, ‘ मला प्रत्यक्ष स्लाइड पाह्यचीय ! ’

‘ रक्ततज्ज्ञानं ती आधीच पाहून ठेवलीय ! ’ डॉ. विली म्हणाले.

‘ माझा विश्वास नाही. मला स्वतःला पाह्यचीय.’ रागानं चार्लस म्हणाला.

‘ जशी तुझी इच्छा ! ’ त्यांच्या माहितीप्रमाणे चार्लस हा भडक डोक्याचा, पण अतिशय बुद्धिमान आणि नेटका विद्यार्थी होता. अजून बदलला नव्हता इतकंच.

‘ चल.’ डॉ. विलींच्या मागोमाग चार्लस चालू लागला. काय करावं हे कॅथरिनला प्रथम समजेना. जरा वेळानं तीही त्यांच्या मागं धावली.

‘ हं, इथं पहा.’ प्रयोगशाळेत गेल्यावर मायक्रोस्कोप दाखवून डॉ. विली म्हणाले. मायक्रोस्कोपपाशी बसल्यावर त्यांनी स्लाइड काढून चार्लसच्या हाती दिली. सापळयात सापडलेल्या श्वापदाप्रमाणं चार्लस आता हिंस्र दिसू लागला !

स्लाइडवरचं नाव वाचताच त्याचा हात थरथरू लागला. ‘ मिचेली मार्टल क्र......अस्थिमज्जा ’ स्लाइड सरकवून त्यानं तेलाचा थेंब टाकला आणि मायक्रोस्कोप जुळवला. त्यातून पाहताच त्याची खात्री पटली.

ताडदिशी तो उठला आणि जणू काही त्याच्या विरुद्ध केलेल्या कटात डॉ. विलीसुद्धा सहभागी आहेत अशी त्याची खात्री झाली. रागानं त्यानं त्यांच्या शर्टाची कॉलर पकडली. ‘ का? ’ तो ओरडला आणि डॉक्टरांना धसाधसा हलवायला सुरुवात केली त्यानं.

कॅथरिन मधे पडली आणि तिनं सोडवलं दोघांना. ‘ चार्लस, आधी हात आवर ! ’ ती ओरडली. ‘ डॉ. विलींचा काय दोष आहे? दोषी असलंच कुणी तर आपणच आहोत ! ’

चार्लसनं अगतिकपणं त्यांचा शर्ट सोडला नि तो पुन्हा स्टुलावर बसला. त्याच्यातलं त्राणच संपलं.

‘ दोषी कोण हे महत्त्वाचं नाही.’ कपडे सारखे करीत डॉ. विली म्हणाले, ‘ मुलीची काळजी घ्यायला हवी ! ’

‘ कुठंय मिचेली ? ’ चार्लसनं विचारलं. मात्र कॅथरिननं त्याचा हात सोडला नाही.

‘ तिला हॉस्पिटलमध्ये भरती केलंय. सहाव्या मजल्यावर ! ’

‘ मला जायचंय तिच्याकडे ! ’ दुबळेपणानं चार्लस म्हणाला.

‘ नक्कीच ! पण आधी काय काय काळजी घ्यायची त्याचा विचार करू या. लहान मुलांना होणाऱ्या ल्युकेमियाचे सर्व जगात नाणावलेले तज्ज्ञ डॉक्टर आपल्याकडे आहेत. डॉ. स्टेफान काइत्समान आणि कॅथरिनला विचारून मी त्यांच्याशी आधीच बोललो आहे. मिचेली अतिशय आजारी आहे. तेव्हा जितक्या लवकर तिला ते पाहतील तेवढं बरं. आधी त्यांच्याशी बोलून मग मिचेलीकडे जाऊ या.’

डॉक्टर काय सांगताहेत ते विसरलं जाईल म्हणून कॅथरिननं छोटी वही आणि पेन काढलं; पण चार्लसचं लक्षच नव्हतं. मिचेलीकडे लक्ष द्यायला आता तो आला, त्यामुळं तिला हलकं वाटलं; पण पाहावं तो त्याचं सगळंच वागणं विलक्षण होतं. क्षणात तो संतापे तर क्षणात अलिप्त होई.

□

‘ थोडक्यात ’, डॉ. काइत्समान म्हणाले, ‘ मायलोब्लास्टिक ल्युकेमियाचं निदान आता संशयातीत आहे ! ’

सकाळपासून सगळयांनी मिळून आपल्याला जीवनातून उठवायचा प्रयत्न चालवलाय असं त्याला वाटू लागलं. व्यवसाय, कुटुंब सर्व काही उध्वस्त करायचं ठरवलेलं दिसतंय. आता हे खरं की, इबॅनेज आणि मॉरिसन यांच्यापेक्षा डॉ. विली आणि डॉ. काइत्समान वेगळे होते. मिचेलीला ल्युकेमिया झालाय यावर चार्लसचा विश्वासच बसेना. त्यातही मायलोब्लास्टिक म्हणजे सगळयात वाईट प्रकारचा नि बरा न होणारा ! छे ! खरं म्हणजे एकदा त्यानं हे भोगलं होतं. आता पुन्हा त्याचीच पाळी का ? आता दुसऱ्या कुणाला का नाही ?

डॉ. काइत्समानच्या बोलण्याकडे त्याचं अर्धवट लक्ष होतं. आपण आता जणु व्याख्यानच देतोय अशा थाटात, थांबत थांबत त्याचं बोलणं चाललं होतं. मधूनच ‘ मला सांगायला वाईट वाटतं ’ हे पालुपद होतंच ! त्यामुळं चार्लसला त्यात अधिकच ढोंगीपणा भासू लागला. काइत्समानपेक्षाही त्याला ह्या विषयावर जास्त माहिती असल्यानं त्यानं त्याच्याकडे दुर्लक्ष करून मिचेलीच्या बालपणापासूनच्या स्मृती आठवायला सुरुवात केली.

‘ आई–वडिलांनी स्वतःला दोष द्यायचं कारण नाही.’ डॉ. काइत्समान बोलत होते, ‘ कारण ल्युकेमियाचं कारण अजून सापडलेलं नाही; पण आनंदाची बाब म्हणजे ह्या शास्त्रात दहा वर्षांपूर्वीपेक्षा आज खूपच उपचार उपलब्ध आहेत. अगदी तीव्र स्वरूपाचा


चवदार पिठासाठी


पिठाच्या चक्क्या

•बॉल बेअरिंग्ज बसविलेल्या

•मजबूत बांधणी

•अद्यावत् यंत्र योजना

•साईज १४", १६", १८"



उत्पादक–

भिडे अँड सन्स,प्रा.लि.सांगली

महाराष्ट्र राज्य.

मायलोब्लास्टिकसुद्धा बरा करता येतो. निदान ८० टक्के उदाहरणात तसं आढळून आलंय !'

'वा, वा ! फार छान !' पहिल्यांदाच चार्लसनं तोंड उघडलं. 'पण एक सांगा की, तुमच्या उपचारांमुळ मिचेलीसारख्या आजारातील उपचारांचा परिणाम किती दिवस टिकेल ?' जी काही वाईट बातमी असेल ती काइत्समाननं लागलीच सांगावी यासाठीच जणू चार्लसनं त्याला टोचलं.

'डॉ मार्टं. इतर पालकांपेक्षा तुम्हाला ह्या रोगाची अधिक माहिती आहे याची मला जाणीव आहे; पण ल्युकेमिया हे तुमचं क्षेत्र नसल्यानं तुम्हाला नेमकं किती माहिती आहे याची मात्र कल्पना नाही. शिवाय मार्टलबाईंना तर काहीच माहिती नसणार. म्हणून मी अगदी पहिल्यापासून सांगतोय !'

'माझ्या प्रश्नाचं उत्तर का देत नाही ?'

'ठीक आहे. माझ्या माहितीतल्या उदाहरणांचा विचार करता केमोथेरपीला फारच चांगला प्रतिसाद मिळालेला आहे.'

'मिचेली सोडून !' चार्लसनं झापलं. 'इतक्या तीव्र स्वरूपाच्या मायलोब्लास्टिक ल्युकेमियाचा पेशंट ५ वर्षं जगेल याची शक्यता किती ?'

डॉ. काइत्समाननं चार्लसच्या आव्हानात्मक दृष्टीकडून कॅथरिनच्या घाबरलेल्या डोळ्यांकडे नजर फिरवली. आपल्या उत्तराचा परिणाम काय होईल याची कल्पना त्याला आली होतीच. आधाराकरता त्यानं डॉ. विलींकडे पाहिलं; पण ते खाली मान घालून बसले होते. चार्लसची दृष्टी चुकवीत सरतेशेवटी ते म्हणाले, 'फारशी शक्यता नसली तरी अशक्य नाही.'

'आता तुम्ही वळणावर आला आहात; पण अधिक अचूक बोलायचं तर तीव्र मायलोब्लास्टिक ल्युकेमियावरील उपचारांमुळं रोग्याला फार तर एक किंवा दोन वर्षांचा कालावधी मिळतो आणि मिचेलीच्या शरीरातील फिरत्या ल्युकेमिक पेशींमुळे तर ते आणखीनच अवघड आहे. काय बरोबर आहे ना माझं, डॉ. काइत्समान ?'

'तुमच्या म्हणण्यात काहीसं तथ्य आहे; पण इतर पुष्कळच कारणं असू शकतात. त्यामुळं निराशा वाटण्याचं कारण नाही.'

'मार्टलबाईंना तुम्ही खरं काय ते का सांगून टाकत नाही ? ज्यांच्या बाबतीत उपचारांचा उपयोग होत नाही त्यांचं आयुष्य केवळ...' खिडकीतून पाहात तो म्हणाला.

'त्यानं काय भलं होणार आहे...' डॉ. काइत्सामानानं बोलायला सुरुवात केली.




'काय भलं होणार आहे असं विचारायला वाटत नाही काही तुम्हाला ? सत्य कळल्यामुळं माणसांची तयारी होते. भ्रामक आशेमुळं ती निष्कारण उरी फुटेस्तो धावतात !' पायावर गर्कन वळत तो म्हणाला. कॅथरिनच्या हातातली वही हिसकून कचऱ्याच्या टोपलीत फेकून तो उसळला, 'आपल्याला टिपणं वगैरे काही नकोत आणि व्याख्यानंही नकोत. मला ल्युकेमियाची सगळी माहिती आहे.' पुन्हा काइत्समानकडं वळून म्हणाला, 'चला लवकर आटपा नि आम्हाला सांगा की पेशंटचं आयुष्य किती ?'

'ते सांगणं फारसं हितकारक नाही !'

'गुळमुळीत नको. नेमकं बोला !'

'ठीक आहे ऐक तर. काही आठवडे, फार तर थोडे महिने.'

डॉ. काइत्समानकडून जबरदस्तीनं उत्तर मिळवल्यावर मात्र त्याच्या पायातली शक्तीच गेली नि तो मटकन खुर्चीत बसला.

क्षणभर डॉ. विलींकडे पाहून डॉ काइत्समाननं पुन्हा कॅथरिनशी बोलायला सुरुवात केली. 'मृत्यूची खात्री गृहीत धरून हातपाय गाळण्यापेक्षा आला दिवस आपला समजून उपचार करणं केव्हाही चांगलं.'

'मरणाऱ्या माणसाला तू मरणाबद्दल विचार करू नकोस असं सांगताय तुम्ही.'

'डॉ. मार्टल, डॉक्टर म्हणून तुमच्याकडून यापेक्षा वेगळ्या प्रकारच्या वागण्याची अपेक्षा आहे.'

'हे दुसऱ्याला सांगणं नेहमी सोपं असतं. शिवाय माझ्यावर यापूर्वी असला प्रसंग येऊन गेलाय दुर्दैवानं.'

'आपण आता उपचारांचा विचार करू या.' डॉ. विलींनी प्रथमच संभाषणात भाग घेतला.

'बरोबर आहे आपण आजच सुरुवात करू. आधीच्या सर्व चाचण्या पूर्ण झाल्या की, उपचार सुरू करू; पण आपण जी औषधं वापरणार त्याकरता आपल्याला यांची संमती लागेल.' डॉ. काइत्समाननं चार्लसकडे नजर टाकीत म्हटलं.

'यशाची शक्यता इतकी कमी असताना तिला असली औषधं देऊन होणारे इतर दुष्परिणाम ओढवून घ्यावेत असं वाटतं तुम्हाला?' त्याच्या इलिझाबेथचे शेवटचे दिवस येत होते. तिचं तळमळणं, पुंजक्या-पुंजक्यांनी केस जाणं .. त्यानं डोळे घट्ट बंद केले.

'होय. मला तरी नक्कीच वाटतं !' डॉ. काइत्समान ठामपणं म्हणाले, 'बालकांच्या ल्युकेमियावरील उपचारांत अलीकडे खूपच प्रगती झाली आहे हे सत्य आहे.'

'हे अगदी खरं आहे.' डॉ. विली म्हणाले.

'प्रगती झाली आहे हे खरं आहे; पण ती मिचेलीला झालेल्या रोगाच्या बाबतीत नव्हे.'

कॅथरिन एकामागून एक अशी सर्वांकडे पाहात होती. तिला ह्या प्रकारच्या चर्चेतून कुठंच आशेचा धागा दिसेना.

'उपचारांच्या उपयोगाची शक्यता कितीही असो. जगणं हा प्रत्येक रुग्णाचा हक्क आहे असं गृहीत धरलं तर, मग काहीही असलं तरी उपचार हे केलेच पाहिजेत. डॉ. काइत्समान म्हणाले.

जगण्याची शक्यता वीस टक्के सुद्धा नसताना आणि उपचारांमुळं उपायापेक्षा रुग्णाचा छळच होणार हे नक्की असताना उपचार

करायचे ?' चार्लसला पुन्हा इलिझाबेथचे अखेरचे दिवस आठवले.

काइत्समान एकाएकी उठले, 'हे पहा आयुष्याकडे पाहण्याच्या आपल्या दृष्टिकोनातच मूलभूत फरक आहे असं दिसतंय. तुम्हाला तुमची मतं बाळगायला हरकत नाही. तेव्हा तुम्ही दुसरा कर्करोगतज्ञ पहावा हे बरं, शुभेच्छा !'

'नाही.' कॅथरिन किंचाळली. 'डॉ. काइत्समान तुम्ही सोडून जाऊ नका. तुम्ही आम्हाला हवेत. मिचेलीला तुमची गरज आहे.'

'शांत व्हा मार्टलबाई, तुमचं म्हणणं कबूल आहे; पण तुमच्या पतींना तसं वाटत नाही.'

'वाटतं हो. ते अगतिक झालेत म्हणून असं बोलताहेत. कृपा करा.' चार्लसकडे वळून ती म्हणाली, 'आपल्याला एकट्यानं हे झेपणार नाही. आपण बालरोगतज्ज्ञ नाही असं तू सकाळी म्हणालास ना. मग आता ऐक ना रे त्यांचं.'

'मला वाटतं चार्लस तू ऐकावंस.' डॉ. विलींनी दुजोरा दिला. ह्या सगळ्या मूर्खपणामुळं चार्लस खचला. हे लोक करीत असलेले उपचार पूर्णतः चुकीचे आहेत ह्याबद्दल त्याला जराही संशय नव्हता.

'चार्लस !' पुन्हा कॅथरिननं अजीजीनं म्हटलं.

'ठीक आहे !'

'पहा डॉक्टर, त्यानं संमती दिलीय,' कॅथरिननं डॉ. काइत्समानना उसन्या उत्साहानं म्हटलं.

'डॉ. मार्टल, मिचेलीवर मी कर्करोगतज्ज्ञ म्हणून उपचार केले तर आपल्याला चालतील ना ?'

दीर्घ सुस्कारा टाकून त्यानं मान डोलवली.

'ठीक आहे. तर मग आपण डॉनोरुबिसीनथायोग्वानाईन आणि सिट्राबीन देऊ. सध्या शिरेतून ६० मिग्रॅ/मी² ह्या प्रमाणात डॉनोरुबिसीन सुरू करू.

डॉ. काइत्समान औषधयोजनेचं वेळापत्रक करीत असताना, चार्लसचं मन डॉनोरुबीसीनच्या इतर दुष्परिणामांच्या कल्पनेनं विदीर्ण झालं. 'खरं तर तिची प्रतिकारशक्ती कमी झाल्यामुळं तिला ताप येत होता. ह्या औषधानं ती आणखीच घसरणार. परिणामी तिची पचनशक्ती नष्ट होणार, हृदय कमकुवत होणार, आणि...आणि... तिचे केस...बाप रे... !' कल्पनेनंच चार्लस हादरला.

'मला मिचेलीला भेटायचंय,' एकदम तो उठला. आणि डॉ. काइत्समानचं वाक्य अर्धवट तोडलं हे त्याच्या लक्षात आलं.

'चार्लस हे सर्व ऐक आधी,' असं म्हणून कॅथरिननं त्याचा हात धरला. तो मनानं इतका खचला होता की तेवढं त्याला पुरलं आणि तो मटकन बसला.

'तर, माझं म्हणणं असं की वयानुसार मुलांचे मी गट पाडले आहेत. शाळेतल्या मुलांच्या बाबतीत म्हणायचं तर ती आई वडलांना सोडायला तयार नसतात.'

'मला वाटतं मिचेलीला असं वेगळं ठेवून फारच मनस्ताप होईल. मध्येच कॅथरिन म्हणाली.

'शिवाय मुलांना कितपत सांगावं आणि किती नाही याचाही विचार केला पाहिजे.'

'मिचेलीला, ल्युकेमिया झाल्याचं सांगण्याबद्दल तुम्ही म्हणताय का ?'

'आताच त्याबद्दल निर्णय करण्याचं कारण नाही. दरम्यान तिला काय झालंय हे शोधायचा आम्ही प्रयत्न करतो आहोत असं सांगावं बरं तिला काही भावंडं ?'

'दोन भाऊ.'

'छान. मिचेलीच्या रक्ताशी आणि टिशूंच्या जातीशी त्यांचं रक्त आणि टिशूंच्या जाती जुळतात की नाही हे पाह्यला हवं.शिवाय आपल्याला प्लेटलेट्स लागतील, ग्रॅन्युलोसाईट्स लागतील, कदाचित त्यांची अस्थिमज्जा सुद्धा लागेल.'

लिफ्टमधून वर जात असता चार्लननं स्वतःला सावरायचा प्रयत्न केला. आपल्याला ह्या रोगाची माहिती असल्यामुळं विचाराचं प्रतिबिंब चेहऱ्यावर उमटून मिचेलीला संशय येण्याची शक्यता होती. तसं होऊ नये म्हणून त्याची आतल्या आत कमालीची धडपड चालली होती !

डॉ. विलींनी त्यांना हॉलच्या टोकाशी असलेल्या खोलीकडे नेलं. त्यांना पाहताच पाळीची नर्स चटकन उठून पुढं आली. आता मात्र चार्लसचे पाय लटपटू लागले. कॅथरिननं त्याचा हात घट्ट धरून ठेवला होता म्हणून बरं !

मिचेलीची खोली स्वतंत्र होती. भिंतीचा फिक्कट निळा रंग आणि हॉस्पिटलचं नेहमीचं साहित्य टेबलावरचं नाचणारं छोटं डुक्कर नि इतर खेळणी यामुळं भीषणता काहीशी कमी वाटत होती. कॉटच्या मागच्या बाजूला शिरेतल्या इंजेक्शनची बाटली अडकवलेली होती. पावलांचा आवाज ऐकताच मिचेलीनं मान वळवली.

'काय म्हणते आमची खारीक ?' डॉ. विली हसत हसत म्हणाले 'कोण आलंय ते पाहिलंस का राणी ?'

तिला पाहताक्षणीच चार्लसच्या मनावरचं सावट दूर झालं धावत जाऊन त्यानं तिचं डोकं आपल्या हातात घेऊन तिला उचलल्यासारखं केलं, आणि गालाला गाल लावला. तिनंही त्याच्या मानेला एकदम घट्ट मिठी मारली.

कॅथरिन हळूच कॉटच्या पलीकडे गेली. तिनं चार्लसकडे पाहिलं तो अश्रू आवरायची धडपड करीत होता. नाइलाजानं त्यानं तिचं डोकं पुन्हा उशीवर ठेवलं. मिचेलीनं कॅथरिनचा हात घट्ट धरला.

'कसं वाटतंय आता ?' आपल्या आवाजातला फरक तिच्या लक्षात येऊ नये अशा बेतानं त्यानं विचारलं.

'आता चांगलं वाटतंय मला !' तिला खूप आनंद झाल्याचं दिसत होतं पण एकदम तिचा चेहरा उतरला. तिनं विचारलं, 'डॅडी, हे खरं आहे का ?'

चार्लसच्या काळजाचा ठोका चुकला. 'म्हणजे तिला माहिती झालंय ?'

'काय खरं आहे का ?' डॉ. विलींनी सहज म्हणून प्रश्न केला.

'मला इथं रात्रभर राह्यचंय डॅडी ?'

चार्लसनं सुटकेचा निश्वास टाकला, 'अग, अगदी थोडे दिवस.'

**या औषधानं तिची पचनशक्ती नष्ट होणार, हृदय कमकुवत होणार आणि...आणि...**

'पण मला शाळा बुडवायची नाहीये.'

'शाळेची काळजी करू नकोस; पण थोडे दिवस इथं राहायला हवं. तुला सारखासारखा ताप का येतो हे तपासायचंय.'

'आता नाही माझ्या कसल्या परीक्षा करायच्या.' तिचे डोळे भीतीनं ग्रासले.

चार्लसनं तिच्याकडे निरखून पाहिलं. किती अशक्त झाली होती. आपण तिला कसलीही मदत करू शकत नाही. यामुळं तो हतबल झाला होता.

'अगदी फारच जरूर असतील तेवढ्या परीक्षा डॉ. विली आणि डॉ. काइत्समान करतील. तू आता मोठी झालीस किनई?' कॅथरिननं समजूत घातली.

चार्लसला बरं वाटलं कॅथरिनच्या उद्‌गारांनी त्यानं तेवढ्यात शिरेतल्या इंजेक्शनची बाटली फिरवून त्यावरचं नाव वाचलं, 'प्लेट-लेट्स' तो डॉ. विलींकडे वळवला. त्यानं प्रश्नार्थक मुद्रा केली.

'ताबडतोब काही प्लेटलेट्स देणं भाग होतं.' ते म्हणाले. तिचे फक्त २०,००० होते. चार्लसनं मान डोलवली.

'बरं, मला आता जायला हवं.' मिचेलीचा पाय थोपटत डॉ. काइत्समान म्हणाले, 'मी तुला पुन्हा भेटायला येईनच आणि हात फार हलवू नकोस! त्या बाटलीतूनच तुला आणखी काही औषधं द्यायचीत हं!'

चार्लसनं प्लॅस्टिकच्या बाटलीकडे पाहिलं. डॉनोरुबीसीन! त्याचं अंग भीतीनं पुन: शहारलं. तिला आत्ताच ह्या हॉस्पिटलच्या दुष्ट-चक्रातून बाहेर घेऊन जावं असं त्याला वाटलं.


**हार्दिक शुभेच्छा**

साहसे श्रीः प्रतिवसति

**दी संगमनेर मर्चंटस् को-ऑपरेटिव्ह बँक लि.**

**संगमनेर – ४२२६०५**

स्थापना : १६ मे १९६६ फोन : ९९

**बँकेची विलोभनीय स्थिती (डिसेंबर १९८२)**

| | | |
|---|---|---|
| सभासद संख्या | – | १३९० |
| भाग भांडवल | – | रु. १५·८० लाख |
| ठेवी | – | रु. २००·०९ लाख |
| गुंतवणूक | – | रु. १००·१५ लाख |
| दिलेली कर्जे | – | रु. १३९ लाख |
| नफा | – | रु. ४.५० लाख |
| खेळते भांडवल | – | रु. २५९ लाख |
| ऑडिटवर्ग | – | 'अ' वर्ग १९६८ पासून |
| डिव्हिडंड | – | १२% १९७५ पासून |

श्री. शि. रा. मणियार
चेअरमन

श्री. शि. मो. नावंदर
व्हा. चेअरमन

श्री. सु. मो. जाजू (बी.कॉम., जी.डी.सी. अ‍ॅण्ड ए.एच.डी.सी.)
मॅनेजर


'मला तुम्ही केव्हाही बोलवा बरं का!' निघता निघता डॉ. काइत्समान म्हणाले. कॅथरिननं मान हलवून स्मित करीत प्रतिसाद दिला.

'मी इथं बाहेरच आहे.' डॉ. विली म्हणाले. बाहेर डॉ. काइत्समान, डॉ. विली येतील ह्या अपेक्षेने हळूहळू चालत राहिले असणार हे त्यांच्या लक्षात आलं.

'हा चार्लस आपल्याला ह्या केसमध्ये फार उपद्रव देणार असं वाटतंय!' डॉ. काइत्समान म्हणाले.

'बरोबर आहे. मलाही तसंच वाटतंय!' डॉ. विली.

'त्या बिचाऱ्या पोरीकरता वाटतं. केमोथेरपीलाच यांचा विरोध म्हणे! आता किती प्रगती झाल्येय हे त्यांना काय माहीत असणारेय!'

'त्याला सर्व माहिती आहे. तो संतापला आहे इतकंच. त्याची बायकोही ल्युकेमियानंच काही वर्षांपूर्वी गेली!'

'तरीसुद्धा ते डॉक्टर आहेत. त्यांनी असं वागायला नको होतं'

'आता तो संशोधनक्षेत्रात उतरला आहे,' डॉ. विली म्हणाले, 'दहा वर्षं झाली, त्यानं प्रॅक्टीस सोडलीय.'

थोड्या वेळात ते नर्सेसच्या हॉलपाशी आले.

'चार्लसच्या संतापानं मीही थोडा वेळ भांबावलो होतो,' डॉ. विलींनी कबुली दिली, 'मला वाटलं त्याचा तोलच गेलाय!'

'राग मीही पाहिलाय; पण लोक आपल्या नशिबावर रागावतात, उपचार करणाऱ्या डॉक्टरवर नव्हे! कसला विचार करताय?'

डॉ. चार्लस मार्टेलची आत्ताची भूमिका किती वेळ टिकेल कुणास ठाऊक!'

'मीही तोच विचार करतोय. किती क्षणात त्यांची लहर बदलते!'

'पहिल्यापासून तो असाच आहे. तरीही अशा परिस्थितीत त्याचं वागणं उचित नव्हतं.' डॉ. विली म्हणाले.

'त्या मानानं त्यांची पत्नी फारच समजूतदार आहे.'

'नक्कीच! मुलांचं ती खऱ्या आईपेक्षाही जास्त करते. मिचे-लीच्या आजाराचं सांगताच ती इतकी खचली; पण चार्लसपेक्षा तिला आधी सांगितलं हेच बरं झालं, असं वाटतंय.'

'मला वाटतं आपण तिच्याशी पुन्हा बोलावं.'

'बरोबर आहे.' डॉ. विलींनी एका नर्सला बोलावलं आणि नवऱ्याला न कळेल अशा बेतानं कॅथरिनला निरोप द्यायला सांगितला.

'पोरीचं मात्र खरंच कठीण आहे!' डॉ. काइत्समान म्हणाले.

'तिचं रक्त पाहिलं तेव्हाच मला वाटलं नि अस्थिमज्जा तपास-ल्यावर तर शंकाच उरली नाही!'

'फार दिवस राहिले नाहीत. मला वाटतं डॉ. नावानो आणि डॉ. शीटमान यांना तिला पाहायला सांगावं आणि लागलीच उपचार चालू करावेत. अर्थात मार्टेलचं म्हणणंही खरं आहे. उपचारांचा उपयोग होणं कठीण आहे!'

'पण तुम्ही प्रयत्न थांबवू नका!'

'अर्थात, प्रयत्न चालूच ठेवणार आहे. अरे! ह्या पहा मार्टेलबाई आल्या.'

कॅथरिनला प्रथम वाटलं मार्गी शोनहौजरनंच बोलावलं आहे. कुणी तरी तुम्हाला बोलावलंय इतकाच निरोप नर्सनं तिला सांगितला

होता. डॉक्टरांना पाहताच तिला वाईट शंका आली.

'बरं झालं तुम्ही आलात ते,' डॉ. विली म्हणाले.

'काय झालं?' घाबरून तिनं विचारलं.

'घाबरण्यासारखं काही नाही. तुमच्या पतींबद्दल बोलायचंय.' सावकाशपणे डॉ. काइत्समाननी सुरुवात केली.

'ते मिचेलीच्या उपचारव्यवस्थेत व्यत्यय आणतील अशी भीती वाटते!' डॉ. विली बोलू लागले, 'त्याला या रोगाविषयी सर्व काही माहिती आहे. पुन्हा केमोथेरपीचा अंगीकार करूनही त्यांची पत्नी दगावली हा कटु अनुभव पदरी आहेच!'

'आम्हाला त्यांच्याबद्दल सहानुभूती वाटत नाही असं नाही; पण इतर दुष्परिणामांचा विचार करूनही तिला आपण जगण्याची संधी द्यायला हवीच!'

'काय बोलावं ते मला कळत नाही.' कॅथरिन दोघांकडे आळी-पाळीनं बघत म्हणाली.

'त्याच्या मनोव्यापारात होणारे अनपेक्षित बदल आम्हाला तुम्ही कळवीत जावेत. म्हणजे कसं कसं करायचं ते आधीच ठरवता येईल.' डॉ. काइत्समान म्हणाले.

'तो काही अडचण आणील असं वाटत नाही. पहिल्या पत्नीच्या वेळी देखील त्यानं उपचार व्यवस्थेत ढवळाढवळ केली नव्हती.'

'ते नेहमी असेच संतापतात काय?'

'त्याला केव्हढा धक्का बसला आहे! त्यांची पहिली पत्नी गेल्या-पासून कर्करोगाचं संशोधन हीच त्याची जीवननिष्ठा झालीय. तो रागावतो; पण त्याचा तोल जात नाही कधी!'

'हे एक बरं आहे.' डॉ. काइत्समान म्हणाले, 'असो; पण बरं झालं तुम्ही आलात. आमचं काही चुकलं असलं तर माफ करा; पण मिचेलीकरता शक्य ते सगळं आम्ही करू!' इतकं बोलून डॉ. काइत्स-मान गेले.

'डॉ. काइत्समान थोडे विचित्र वाटतात; पण असला बालकर्क-रोगतज्ज्ञ सर्व जगात मिळायचा नाही!' डॉ. विली.

'मगाशी मला वाटलं ते आता मिचेलीची केस सोडून देणार!' कॅथरिन म्हणाली.

'तसं सहसा नाही करणार; पण त्याच्या उपचारपद्धतीलाच चार्लसचा विरोध असल्यावर तो तरी काय करणार? आणि उपचार तर ताबडतोब सुरू करायला हवेत!'

'मला वाटतं, चार्लस आता काही गडबड करणार नाही!' कॅथ-रिननं आश्वासन दिलं.

'तसंच होवो; पण आमची भिस्त तुझ्यावर आहे कॅथरिन!'

'माझ्यावर? अहो, हॉस्पिटलं आणि वैद्यकीय व्यवहार म्हटलं की माझी पाचावर धारण!'

'पण तुलाच धीर धरला पाहिजे. मिचेलीचे उपचार म्हणजे किती अवघड कामगिरी आहे, याची तुला कल्पना नाही!'

तेवढ्यात कॅथरिनला चार्लस येताना दिसला. ती धावतच त्याच्याजवळ गेली आणि त्याला धरून उभी राहिली. थोड्या वेळानं दोघंही डॉ. विलींकडे आली. चार्लस आता बराच सावरला होता.

'कशी गोड मुलगी आहे!' चार्लस म्हणाला, 'तिला काळजी काय तर रात्रभर राहण्याची! घरी येऊन रोजचं रस काढण्याचं काम तिला करायचंय म्हणे!'

'तशी ती शहाणी मुलगी आहे. मी येईपर्यंत घर तिनंच संभाळलं होतं ना!' कॅथरिन म्हणाली.

'आपल्यालाच आपली मुलं कळत नाहीत. मी तिला विचारलं की, मी आता कामाला जाऊ का, तर म्हणाली कॅथरिन येईपर्यंत नको!'

कॅथरिनला भरून आलं. 'हॉस्पिटलमध्ये येता येता आम्ही बरंच बोललो. मला वाटलं आता तिला माझा विश्वास आलाय.'

'ती आणि मीसुद्धा भाग्यवान आहोत. तू आहेस त्यामुळं काळजी नाही; पण मला आता प्रयोगशाळेत गेलंच पाहिजे!'

'कळतंय मला. तू जा. कारण आता इथं तुला करण्यासारखं काहीच नाही. आईला बोलवून घरचं बघायला सांगते.'

दोघांचा परस्परांवरील इतका विश्वास पाहून डॉ. विलींना समाधान वाटलं दोघं जवळ येताच काय बोलावं हे मात्र त्यांना समजेना.

'मिचेलीचं रक्त शिल्लक आहे का तुमच्यापाशी?' चार्लसनं विचारलं, त्याचा आवाज आता व्यावसायिक झाला.

'बहुतेक असेल!' ह्या प्रश्नानं ते चकित झाले. 'चार्लस म्हणजे गूढच आहे,' त्यांना वाटलं.

'चला या तर मग!' दोघेही लिफ्टकडे निघाले.

'मी आता मिचेलीपाशी बसते. काही असलं तर कळवीन, नाही तर रात्री जेवणाच्या वेळी भेटू!'


भिकुसा पेपर्स प्रा. लि.


५३/५४ मेन रोड, नासिक

क्वालिटी क्राफ्ट पेपरचे उत्पादक

चेअरमन–विश्वनाथसा नारायणसा

फोन – घर – २२९२, ऑफिस – २४२७ / २६१२

फॅक्टरी – २४५२



¤
" पण आता मात्र आकाशच कोसळलंय." चार्ल्स म्हणाला. एलनला त्याचं बोलणं-हसणं चमत्कारिक वाटलं.
¤

तिला हात करून डॉ. विलीही चार्लसच्या मागे गेले. ' मिचेलीचं रक्त कशाला हवंय याला ? अर्थात तोही डॉक्टरच आहे, ' त्यांना वाटलं.

## सहा

मिचेलीच्या रक्ताची बाटली घेऊन चार्लस वाइनबुर्गर इन्स्टिटयूट-मध्ये शिरला आणि धावतच प्रयोगशाळेकडे निघाला.

' आलास बरं झालं ! ' एलननं टोमणा मारला. ' उंदरांना कॅन्सरा-नचं इंजेक्शन द्यायला तुझी मदत हवीच ! '

तिच्याकडे पूर्ण दुर्लक्ष करून नि मिचेलीच्या रक्ताची बाटली घेऊन तो पेशीसंयुगे वेगळी करण्याच्या यंत्राजवळ बसला.

काचसामानाच्या फडताळाच्या फटीतून त्याच्याकडे पाहात ती ओरडली, ' मी म्हणते मला मदत...'

चार्लसनं पंप सुरू केला. हात पुसून ती चार्लसकडे आली, ' मी उंदरांच्या पहिल्या तुकडीला इंजेक्शन दिलं. ' जवळ आल्यावर ती म्हणाली.

' वा: ! फारच छान ! ' ती काय बोलली याचा विचारही न करता तो म्हणाला. त्यानं यंत्रात रक्ताचा थोडा अंश सोडला आणि कॉम्प्रेसरचं बटन चालू केलं.

' काय करतोस ?'

' मिचेलीला मायलोब्लस्टिक ल्युकेमिया झालाय ! ' जणू हवामान-वृत्त द्यावं इतक्या निर्विकारपणे तो म्हणाला.

' आई ग ! ' घसकून ती म्हणाली. ' माफ कर हं, मला माहीत नव्हतं रे ! ' त्याचं सांत्वन करावं असं तिला वाटलं; पण तिनं स्वत:ला आवरलं.

' विलक्षण नाही ? येणारी संकटं इन्स्टिटयूटपुरती मर्यादित राहिली असती तर काय वाईट होतं ? पण आता म्हणजे आकाशच कोसळलंय ! ' चार्लसनं भीषण हास्य केलं.

तिला ते हसणं विचित्र वाटलं. चार्लसनं परीक्षा–औषधांचा फ्रीज उघडला.

' मिचेली कशी आहे ?'

' सध्या ठीक आहे; पण लवकरच फार वाईट दशा होईल तिची! '

एलनला काही बोलायला सुचेना. धीर करून ती म्हणाली, ' तू हे काय करतोस पण ?'

' हे मिचेलीचं रक्त आहे. कर्कपेशींवरील अँटीजेन करण्याचं आपलं तंत्र तिच्या रक्तातल्या ल्युकेमिक पेशींकरता लागू पडतं का पाहतोय ! '

' चार्लस ! ' इलिझाबेथ गेली तेव्हा किती खचला होता हे तिनं पाहिलं होतं नि आता मिचेली !

' मी आता ठरवून टाकलंय, आपलं काम थांबवायचं नाही आणि कॅन्सरानचंही काम चालू ठेवू. रात्री काम करू ! '

' पण फक्त कॅन्सरानचंच काम केलं पाहिजे असं मॉरिसननं अगदी निक्षून सांगितलंय. तू गेल्यावर तो आला होता इथं ! '

'आता मिचेलीच्या दुखण्यामुळं आपल्याच पद्धतीचा पाठपुरावा करणं मला जास्त जरुरीचं वाटतं. शिवाय कॅन्सरानचं काम आपण करणारच आहोत त्यामुळं मॉरिसनला काहीच कळणार नाही ! '

' संचालक मंडळ कॅन्सरानवर किती अवलंबून आहे याची तुला कल्पना आलेली दिसत नाही. मला वाटतं हा धोका तू पत्करू नयेस ! '

' बस, बस, ' चार्लसचा आता स्फोट झाला. ' मी काय करावं नि काय करू नये हे दुसऱ्यानं सांगितलेलं ऐकण्याचा मला आता वीट आलाय ! तुला माझ्याबरोबर काम करायचं नसेल तर जहान्नममध्ये जा ! '

क्षणभर तोही अस्वस्थ झाला नि केसात हात फिरवीत राहिला, ' नुसती शुंभासारखी उभी राहू नकोस. मगाशी सांगितलं ती बाटली घेऊन ये !'

ती फडताळाकडे गेली ती थरथरतच. तिला हे मुळीच आवडलं नाही. हळूहळू भीतीचं रूपांतर रागात झालं. आपल्याला असं नोकरासारखं वागवायचा चार्लसला मुळीच हक्क नाही. मॉरिसनला काही तरी कळवायलाच हवं.

तिनं बाटल्या आणल्या आणि टेबलावर मांडल्या.

' धन्यवाद !' काहीच घडलं नाही अशा स्वरात तो म्हणाला, ' आपल्याला बी–लिम्फोसाइट्स मिळाली की लागलीच मी ती विकसित करणार आहे. '

इतक्या झपाट्यानं बदलणाऱ्या त्याच्या लहरींशी जुळवून घेणं तिला कठीण जात होतं.

' मी आता ज्या वेळी इथं परत येत होतो, त्या वेळी मला एक कल्पना सुचली. आपल्या कामातली मुख्य अडचण म्हणजे तो अडथळा आणि त्यामुळंच कर्कग्रस्त जीवातील कर्कपेशीविरुद्ध अँटिबॉडी तयार करण्यातली असमर्थता. ही कर्कपेशीच आता आपण निरोगी प्राण्याला का टोचू नये ? त्यातून हव्या त्या अँटिबॉडीज मिळतील. तुला काय वाटतं ?'

क्षणात, भडकलेल्या लहान मुलाप्रमाणं, तर क्षणात जातिवंत शास्त्रज्ञाप्रमाणं ! तिला कळेना चार्लसचं गूढ !

उत्तराची अपेक्षा न करता तो पुढं म्हणाला, ' एकदा का निरोगी प्राण्यामध्ये कर्कपेशीविरुद्ध अँटिबॉडीज तयार झाल्या की आपण टी-लिम्फोसाइट्स वेगळ्या करू नि ट्रान्स्फर फॅक्टर प्रोटीन शुद्ध करून कर्कग्रस्त जीवामध्ये सोडू. इतकं सोपं असून आपल्याला आधी कसं सुचलं नाही याचं नवल वाटतं. तुझं मत काय ?'

तिनं खांदे उडवले. तूर्त काहीही म्हणणं धोक्याचंच होतं. हे वर्णन जरी सर्व सुसंगत वाटत असलं तरी आतापर्यंत ज्या प्राण्यांत हा तत्त्वाचा वापर केला होता तिथं ते यशस्वी झालं नव्हतं. आताच आपण थेट डॉ. मॉरिसनकडे जायला हवं असं तिला वाटू लागलं.

' पॉलिएथिलीन ग्लायकोल आणणार का ? मिचेलीच्या टी-लिम्फोसाइट्सपासून हैब्रिडोमा तयार करण्याची व्यवस्था करावी लागेल. प्राणिविभागाला कळवून प्राण्यांची नवीन तुकडी हवी असल्याचं बोलून ठेव. ह्या नव्या प्राण्यांना आपण स्तनाच्या ट्यूमरच्या अँटीजेन टोचू,' चार्लसनं पटापटा सूचना दिल्या. ' दिवस चोवीस-तासांपेक्षा मोठा हवा होता नाही ?'

¤

कॅथरिनची आई गिना लॉरेन्झो दिसायला कॅथरिनसारखीच होती. दोघीत वीसच वर्षांचा फरक होता; पण तुलनेनं ती जास्त स्थूल होती.

' कॅथरिन, तुला आणखी थोडं खाल्लं पाहिजे, ' ती म्हणाली, कसंनुसं हसत कॅथरिननं मान हलवली.

' काय झालं ?'

' मला भूक नाहीये. '

' पण तरी थोडंसं खाल्लं पाहिजे. तू सुद्धा चार्लस.' चार्लसनं मान डोलवली नि बशीतले पदार्थ खायला सुरुवात केली.

¤

एकामागोमाग आलेल्या प्रसंगांनी त्याची उमेद हरवली होती. अर्थात कामात व्यग्र झाल्याबरोबर, त्यांच्याकडे त्याचं आपोआपच दुर्लक्ष झालं; पण चकला घेऊन येण्याची आठवण झाल्यावर त्याला उठावंच लागलं. गर्दीचा रस्ता संपल्यावर, मिचेलीला ल्युकेमिया झाल्याचं त्यानं जेव्हा चकला सांगितलं तेव्हा त्यानं नुसतंच ' हूं ' असा उद्‌गार काढला. जरा वेळानं त्यानं इतकंच विचारलं की, ' त्यामुळं मला होणार नाही ना ?'

चार्लस काही बोलला नाही; पण त्याला मुलाच्या स्वार्थीपणाची चीड आली. असाच्या असा त्याला गाडीबाहेर फेकून द्यावा असं त्याला वाटलं.

हे सर्व पुन्हा डोळ्यांसमोर येत असतानाच त्यानं बशीतले पदार्थ खायला सुरुवात केली; पण एक बरं की, जीन पॉलची प्रतिक्रिया चांगली होती. त्यानं लागलीच मिचेलीला भेटता येईल का ? नि ती घरी कधी येणार असं विचारलं.

चार्लसनं मधेच कॅथरिनकडे कटाक्ष टाकला. गिनाच्या लक्षात येऊ नये म्हणून ती खाण्याचं सोंग करीत होती. ही आहे म्हणून किती बरं झालं. मिचेलीचं आजारपण आपल्या एकट्याच्यानं काही निभलं नसतं. इन्स्टिट्यूटमध्ये काय घडतंय हे तिला आपण सांगायचंच नाही. आहे हेच तिला पुष्कळ झालंय.

चार्लसच्या पानात आणखी वाढप करीत गिना म्हणाली, ' तुला आणखी खायला हवं. चार्लसनं तिच्याकडे पाहिलं. कॅथरिननं तीन मुलं असलेल्या एका विधुराशी लग्न करावं हे तिला मुळीच आवडलं नव्हतं. त्यात पुन्हा वयातलं एवढं अंतर. चार्लस हे सर्व जाणून होता.

' मिचेलीला ल्युकेमिया झाला आहे हे त्यांना कसं समजलं ?' जीन पॉलनं निष्कपटपणं विचारलं.

चमकून सगळ्यांनी चार्लसकडं पाहिलं. प्रश्न मोठा कठीण होता.

' आधी तिचं रक्त तपासलं नि मग अस्थिमज्जा तपासली.'

' अस्थिमज्जा मिळालीच कशी त्यांना ?' चकनं विचारलं.

इतरांना चकचा प्रश्न सरळ मनानं केलाय असा वाटला असता. पण चार्लसला नेहमीच त्याचा राग येत असे. कारण त्याला बहिणीची मायाच नाही अशी चार्लसची खात्री होती. ' छातीच्या किंवा कमरेच्या हाडामध्ये लांब सुई घालून काढतात, ' चकला भीती वाटून तरी मिचेलीबद्दल अनुकंपा उत्पन्न होईल अशा आशेनं त्यानं म्हटलं.

' दुखतं का त्यानं ?'

' भयंकर !'

आणि आपणच संमती दिली ह्या परीक्षेला ह्या आठवणीनं कॅथरिन कळवळली.

' बाप रे !' चक ओरडला, ' मी नाही कधीसुद्धा माझी अस्थिमज्जा काढून देणार. '

**क्षणात भडकलेल्या लहान मुलाप्रमाणं तर क्षणात जातिवंत शास्त्रज्ञाप्रमाणं !**



¤

चार्लस संतापून चकच्या अंगावर धाऊन गेला.

¤

'पण मिचेलीच्या डॉक्टरांना तुझी आणि जीन पॉल अशा दोघांची अस्थिमज्जा काढून तिच्याशी ताडून पाह्यचीय. कारण तुमच्यांपैकी कुणाच्या तरी प्लेटलेट्स, ग्रॅन्युलोसाइट्स, आणि कदाचित अस्थिमज्जासुद्धा जुळतात का ते पाह्यचंय !'

'माझी नाही,' चमचा आपटीत आपटीत चक म्हणाला. 'माझी अस्थिमज्जा मी नाही कुणाला काढू देणार.'

चार्लसनं त्याच्याकडे वळून म्हटलं, 'तू काढू देणार की नाही हे मी तुला विचारलेलं नाही. तू बालरुग्णालयात जाऊन दाखवून येणार आहेस. समजलं ?'

'जेवताना कशाला ही चर्चा ?' कॅथरिन ओरडली.

'ते खरंच माझ्या हाडात सुई खुपसतील?' जीन पॉलनं विचारलं.

'चार्लस, थांब ना. मुलांशी ह्या गोष्टी अशा रीतीनं का बोलतात ?'

'मला त्याच्या स्वार्थीपणाची किळस आलीय,' चार्लस ओरडला 'मिचेलीबद्दलची काळजी एका शब्दानं तरी त्यानं दाखवलीय का पहा !'

'मीच काय म्हणून अस्थिमज्जा द्यायला पाहिजे ?' चक कुरकुरला. 'तुम्ही तर वडील आहात. तुम्ही द्या ना, की मोठ्या डॉक्टर लोकांना मज्जा द्यायला बंदी आहे ?'

चार्लस संतापून उठला, 'तुझा अडाणीपणा आणि आप्पलपोटेपणा सारखाच आहे. अरे वडलांकडून मुलांना अर्धेच रंगपरमाणू मिळतात. माझी मज्जा तिला चालणं शक्य नाही. शक्य होईल तर तिच्याशी आयुष्याची अदलाबदलसुद्धा करायची तयारी आहे माझी.'

'तर, तर. बोलणं सोपं आहे.' चकनं टोमणा मारला.

चार्लस उठून त्याच्या अंगावर धावला. तेवढ्यात कॅथरिननं त्याला धरलं. अश्रू न आवरता तिनं म्हटलं, 'चार्लस, आधी शांत हो पाहू !'

चकनं घाबरून खुर्ची घट्ट धरून ठेवली. कॅथरिन मधे पडली नसती तर आपलं काही खरं नव्हतं. हे त्याच्या लक्षात आलं.

'हे आकाशातल्या देवा,' छातीवर हातांचा क्रूस धरीत गिना म्हणाली, 'चार्लस देवाची क्षमा माग, सैतानाच्या आहारी गेलास म्हणून.'

'अरे देवा, आता हे उपदेशाचे डोस सुरू झाले !' चार्लस डोकं धरून म्हणाला,

'देवाची निंदा करू नये,' गिनानं ठामपणं म्हटलं.

'खड्डयात गेला तुमचा देव,' कॅथरिनपासून हात सोडवीत तो म्हणाला, 'बारा वर्षाच्या कोवळ्या पोरीला ल्युकेमिया याच देवानं दिला ना ?'

'देवाच्या करणीबद्दल शंका घेऊ नये,' गिनाचा शांतपणा ढळला नाही !

'आई, आता पुरे,' कॅथरिन ओरडली.

चार्लसनं गिरकी घेतली आणि तो बाहेर चालता झाला. जाताना धाडकन दार लावल्यामुळं सगळं घर थरथरलं.

'हाय हाय, देवाची चेष्टा,' पुन्हा छातीवर हात देत गिना म्हणाली. 'खरोखर त्याचा सैतानानं कब्जा घेतलेला दिसतोय.'

¤

सगळ्या वातावरणातून सुटावंसं चार्लसला वाटलं. धावत धावत तो डोहापाशी गेला. नकळत त्याची पावलं मिचेलीच्या खेळ-घराकडे वळली.

बुटावरचं बर्फ झटकून तो त्या छोट्या घरात शिरला. खऱ्या घरासारखंच सगळं होतं. मिचेली उन्हाळ्यामध्ये दर रविवारी चार्लसकरता चहा करी. त्यासाठी ठेवलेली विजेची शेगडी पण होती. शेगडीवर त्यानं हात शेकून घेतले आणि एका छोट्या खुर्चीत तो विसावला.

तिथल्या एकांतवासामुळं तो लगेच शांत झाला. आपण चकला असं रागवायला नको होतं, हे त्याला पटलं. संकट अजून तसं दूर होतं. दिवसभरांत काय ही उलथापालथ झाली आपल्या आयुष्यात !

खिडकीतून बाहेर पाहता पाहता त्याला डोह सुद्धा बर्फानं भरलेला दिसला. आपण मिचेलीच्या बाबतीत फार दुर्लक्ष केलं. आपण अधिक लक्ष द्यायला हवं होतं. म्हणजे आपल्या संशोधनाकडेही नीट ध्यान देता आलं असतं.

सगळी कामं बाजूला ठेवून संशोधन करायला हवं. म्हणजे मिचेलीवर नीट उपाय करता येतील; पण ते तर आता फारच अवघड

आहे.' त्याला माहिती होतं की इबॅनेजला विरोध करून नोकरी गमावणं परवडणारं नव्हतं. त्याच्या वागण्यामुळं आधीच तो अप्रिय होता; पण कर्तबगारीमुळं त्याला आदरही मिळायचा. म्हणून तर त्याची कॅन्सरानकरता निवड झाली होती !

दूरवरून त्याला कॅथरिनची हाक ऐकू आली; पण तो हलला नाही. 'मिचेलीकरता काय करायचं ? तिचे शेवटी शेवटी होणारे हाल आपल्याच्यानं पाहवतील का ?'

तितक्यात त्याला मंद वास आला. खरं म्हणजे तो आधीपासूनच होता; पण त्याला तो आता जाणवला. 'कसला बरं वास ? ओळखीचा वाटतोय.' त्यानं हुंगत हुंगत वास कुठून येतोय त्याचा शोध घ्यायला सुरुवात केली. त्याला एकदम सेंद्रिय रसायनशाळेची आठवण झाली. 'बेन्झिन, टोल्विन ? झायलिन ? पण इथं कसा काय येतोय हा वास ?'

तो घरातून बाहेर आला आणि वास घेत घेत डोहाच्या जवळ आला. 'निःसंशय, डोहातूनच येतोय हा वास.' कडेकडेनं चालत तो पॉटोमॅक नदीपाशी आला. ओंजळीत पाणी घेऊन त्याचा वास घेतला. चांगला तीव्र वास येत होता. तो नदीच्या काठानं वर जाऊ लागला तसतशी वासाची तीव्रता वाढू लागली. शेवटी तो रीसायकल कंपनीपाशी पोचला. प्लॅस्टिक आणि रबर करण्याकरता बेंझिन वापरतात हे चार्लसला माहिती होतं.

बेंझिन !

त्याला चरका बसला. बेंझिननं ल्युकेमिया होतो. खरं म्हणजे मायलोब्लास्टिक ल्युकेमियाच होतो. बरोबर, मिचेली इथं खूपच वेळ असायची.

ताबडतोब तो घराकडे धावत सुटला. तीन तीन पायऱ्या एकदम चढत खाडकन दरवाजा उघडून तो आत शिरला.

कॅथरिन दचकून वळली नि तिच्या हातातली बशी पडून फुटली.

'ताबडतोब एक बाटली पाहिजे !' तिला काय वाटलं हे त्याच्या गावीही नव्हतं. त्याला धाप लागली होती.

थोड्या वेळानं तिनं विचारलं, 'कसली पाहिजे ?'

'घट्ट बुचाची बाटली दे.'

'कशाकरता ?'

'डोहातलं पाणी आणायचंय.'


गिना आणि दोन्ही मुलगे आत येऊन दरवाज्यात उभे राहिले.

'पाणी कशाकरता ?'

'उलटतपासणी कशाला चालवलीयस ?' शेवटी तोच फ्रीजकडे धावला. चक मधे आला तेव्हा त्याला त्यानं बाजूला ढकललं. 'काय चाललंय तुमचं सर्वांचं ?' त्यानं विचारलं. गिना आणि जीन पॉलला धक्का बसला, चक संतापला होता, कॅथरिन घाबरली होती.

चार्लसनं पुन्हा फ्रीजकडे लक्ष वळवलं. फ्रीज उघडला. एका बाटलीत सफरचंदाचा रस होता, तो त्यानं ओतून दिला नि बाटली चांगली धुतली. खुंटीवरचा कातडी कोट अंगावर चढवून तो पुन्हा बाहेर धावला. दरवाज्यात क्षणभर थांबून त्यानं सर्वांकडे पाहिलं आणि दार लावून तो निघून गेला.

कॅथरिनला डॉ. इबॅनेज आणि डॉ. काइत्समान यांच्याशी झालेलं चार्लसबद्दलचं बोलणं आठवलं. त्या वेळी त्यांचं म्हणणं तिला पटलं



डोहातल्या पाण्याची बाटली
तिथूनच हे हरामखोर बेंझिन येतंय.

¤

नव्हतं; पण हे आताचं रागवून घराबाहेर पळून जाणं, पुन्हा वादळासारखं आत घुसणं नि पुन्हा बाटली घेऊन धावणं, सगळंच विचित्र !

'तुला डॅडी हात सुद्धा लावू शकणार नाहीत.' चक कॅथरिनला म्हणाला.

'मला ?' चकित होऊन कॅथरिननं म्हटलं. तुझं डॅडी मला काहीही करायचे नाहीत.

'त्याच्या मानगुटीवर नक्कीच सैतान बसलाय, मला वाटतं,' गिना म्हणाली. 'एकदा असं झालं की काय होईल माणसाचं सांगता येणार नाही.

'आई, तू गप्प रहा पाहू,' कॅथरिन ओरडली.

'डॅडीच्या डोक्यावर परिणाम झालाय का ?' जीन पॉलनं विचारलं.

'तो तर केव्हाच झालाय,' चकनं उत्तर दिलं.

'तोंड बंद करा. वडलांविषयी असं अनादरानं बोललेलं मला मुळीच खपणार नाही. मिचेलीच्या आजारानं त्यांना मनस्ताप झालाय, कॅथरिननं जामलं. तिनं बशीच्या काचा गोळा करायला सुरुवात केली. खरंच चार्लसच्या डोक्यावर परिणाम झाला असेल

? डॉ. विलींशी बोललं पाहिजे. तो विचारच भयानक होता. आधार सुटल्यासारखंच वाटू लागलं तिला.

¤


बर्फ आणि चिखल तुडवीत तो काठाशी आला नि त्यानं बाटलीत पाणी भरून घेतलं. तोंड घट्ट बंद करून घेऊन तो माघारी वळला.

घरात शांतपणं शिरून बाटली त्यानं फ्रीजमध्ये ठेवली आता कॅथरिन चकित झाली ती त्याच्या शांतपणानं.

'चार्लस, तू काय करतोयस मला सांग पाहू.'

'त्या डोहात बेंझिन आहे आणि खेळ-घरात त्याचा वास भरला आहे. चार्लस पुन्हा जाण्याकरता वळला. कॅथरिन त्याच्या मागं धावली त्याचा कोट पकडून म्हणाली, 'चार्लस कुठं चाललायस ? काय झालंय तुला ?'

त्यानं झटक्यानं आपला कोट सोडवून घेतला आणि तो म्हणाला, 'रोसायकल कंपनीत चाललोय. तिथूनच हे हरामखोर बेंझिन येतंय, नक्कीच !'



'बेन्झिन' असं लेबल असलेली भली मोठी पिपं तिथं साठवली होती.

## सात

चार्लसनं आपली गाडी रीसायकल कंपनीच्या आवारात आणून उभी केली. रात्रीच्या पाळीला फार कामगार नसावेत असं दिसत होतं. आवारात सर्वत्र फुकट गेलेल्या रबरी टायर्सची चळत, प्लॅस्टिकच्या तुकड्यांचे ढीग आणि इतर कचरा पडला होता. आवारातले सांडपाणी आणि पॉटोमॅक नदीकडे धावत होतं !

गाडीतून बाहेर पडताच त्याला परिचित वास आला. इमारतीच्या ॲल्युमिनियमच्या आणि काचांच्या मोठ्या दारातून तो आत शिरला. तिथं तर वासाची तीव्रता अधिकच होती. त्यामुळं आणि इतर रासायनिक दर्पांमुळं त्याला गुदमरल्यासारखं झालं. तो आतल्या दारापाशी आला आणि त्यानं तिथली घंटा वाजवली; पण बहुधा ती कुणाला ऐकू गेली नसावी त्यानं जरा जोर करून दार उघडलं. तेव्हा त्याला प्रचंड गोंगाट आणि असह्य गंध ह्यांनी घेरलं. दुमजली इमारतीच्या त्या तळमजल्यावर अवाढव्य पिपं, इकडून तिकडे जाणाऱ्या नळ्या, भट्ट्या, लोखंडी शिड्या यांची गर्दी आढळली. विनीलचे तुकडे, प्लॅस्टिकचा कच्चा माल आणि कित्येक गोष्टी तिथं साठवलेल्या होत्या. हाफपँट नि बनियन घातलेली आणि घामानं निथळत असलेली दोन माणसं तिथं काम करीत असलेली आढळली.

'व्यवस्थापक कुणी आहे का इथं ?' चार्लसनं एकाला विचारलं. आपल्याला काहीच ऐकू आलं नाही अशी खूण करीत तो आपल्या कामाला लागला. फिरत्या पट्ट्याच्या शेवटी एक माणूस चाकूनं मोठं पोतं उघडत होता, तिथं चार्लस गेला. वाटेत इतकं सामान पडलं होतं की, त्याला एक अडथळा-शर्यतच पार केल्यासारखं वाटलं. तयार झालेले गरम टायर इथं फिरत्या पट्ट्यावरून येत होते. तो परिचित उग्र दर्प इथंच उगम पावला होता. शेवटच्या भिंतीपाशी जाळीची खोली होती. नवीन आलेला कच्चा माल तिथं साठवला

¤

होता. जाळीला धरून त्यानं आतल्या निरीक्षणाला सुरुवात केली नि त्याला 'बेन्झिन' अशा अक्षरांचं लेबल लावलेली भली मोठी पिपं दिसली त्यावर सर्व परिचित असं कवटी आणि हाडं यांचं चित्र असून 'विष' असंही लिहिलं होतं !'

पाठच्या बाजूनं एका माणसानं त्याच्या खांद्याला धरून वळवलं आणि विचारलं, 'मी काय करू शकतो आपल्यासाठी ?' एका आडदांड माणसानं तेवढ्याच आडदांडपणं विचारलं. तेवढ्यात एका बॉयलरची कर्कश शिट्टी वाजल्यामुळं बोलणं अशक्य झालं. चार्लसनं त्या माणसाचं निरीक्षण केलं. चार्लसच्या दीडपट उंच आणि तसाच रुंद होता. गालावर इतकी चरबी साठली होती की, डोळे बारीक झाले होते. दंडावर आणि छातीवर गोंदलेलं स्पष्ट दिसत होतं.

शिट्टी बंद होताच त्यानं प्रचंड आवाजात विचारलं, 'रसायनं मोजताय का ?' चार्लसनं मान डोलवली.

'मला वाटतं आता आणखी कोळसा लागेल !' तो म्हणाला. चार्लसच्या लक्षात आलं की, तो त्याला कंपनीचाच माणूस समजतोय.

'आणि बेन्झिनचं काय ?' चार्लसनं विचारलं.

'बेन्झिन रगड आहे. ते शंभर शंभर गॅलनच्या पिपातनं येतं ना!'

'नंतर तुम्ही त्याचं काय करता ?'

'म्हणजे वापरलेलं का ? इकडे या, दाखवतो !' असं म्हणून त्यानं चार्लसला आपल्या मागं येण्यास खुणावलं. गरम भट्ट्यांच्यामधून, आडव्या नळ्यांच्या खालून वाकत वाकत ते बाहेरच्या एका खोलीत आले. तिथल्या एका खिडकीतून त्यानं बोट दाखवलं, 'ते हौद पाहिलेत ?'

चार्लसनं बारकाईनं पाहिलं. चांदणी रात्र असल्यामुळं त्याला नदीच्या काठाशी असलेल्या दोन प्रचंड गोलाकार टाक्या दिसल्या.

'थोडं फार बेन्झिन नदीत जात असेलच ?' कामगाराकडे वळून चार्लस म्हणाला.

'खरं तर बहुतेक सर्व कचरा, कंपन्या कुठे तरी घेऊन जातात; पण साहेब, ह्या कंपन्यांचं काम तुम्हाला माहितीच आहे. शिवाय टाक्या भरल्या की त्या वाहतातच ! आम्ही हे काम बहुधा रात्रीच करतो. त्यामुळं दिवसा काही मागमूस राहात नाही !' एखादं गुपित सांगावं अशा आवाजात तो पुढं म्हणाला, '××× कंपन्या तर ते सर्व नदीतच सोडतात ! आम्हाला मात्र पैसे लावतात !'

चार्लसच्या शिरा ताठ झाल्या. त्याच्या डोळ्यांसमोर शिरेतलं इंजक्शन घेणारी मिचेली आली.

'व्यवस्थापक कुठं आहेत ?' आपला राग न आवरता चार्लस म्हणाला.

'व्यवस्थापक ?' त्या कामगाराला कळेना.

'कुणीही, फोरमन, सुपरवायजर ?' चार्लसनं फटकारलं.

'नॅट आर्चर. ते कचेरीत आहेत.'

'कुठं आहेत दाखवा मला !'

पुन्हा मागच्याच मार्गानं मागं येऊन त्यानं एका शिडीकडे बोट दाखवलं, 'तिथं वर जा.'

धावत धावतच तो शिडी चढून गेला. बाहेरचा आवाज आत येऊ नये यासाठी खोलीला सर्वत्र काचांची तावदानं होती. चार्लस दार उघडून आत आला. दाराचा आवाज होताच नॅट आर्चरनं खुर्ची फिरवून पाहिलं. दार उघडताच चार्लस त्याच्या अंगावर ओरडणारच होता; पण पाहताच त्यानं त्याला ओळखलं त्याचा मुलगा स्टीव्ह जीन पॉलच्याच वर्गात शिकत होता. आर्चर कुटुंब हे शापट्सबरी-मधलंच काळचा लोकांचं एक कुटुंब होतं.

'चार्लस मार्टेल !' चकित होऊन आपला हात पुढं करीत तो म्हणाला, 'इथं तुला पाहून मला इतकं नवल वाटलं ! त्याचं शरीर एका कसलेल्या खेळाडूप्रमाणं होतं.

ओळखीची व्यक्ती भेटल्यामुळं चार्लसचा पहिला आवेश थोडा ओसरला; पण त्यामुळं त्याला बोलायलाही सुचेना.

'अरे ! बसत का नाहीस ?' नॅट म्हणाला.

'नको, मी उभाच राहतो. इथं व्यवस्थापक कोण आहे ? ही रीसायकल कंपनी कोणाची आहे ?'

'न्यू जर्सीच्या 'ब्रॉयर केमिकल्स'चीच शाखा आहे ही !'

'इथला व्यवस्थापक कोण ?'

'हॅरॉल्ड डॉसन, तो बाहेर गेला आहे; पण चार्लस हे काय आहे मला सांग म्हणजे तुझं काम सोपं होईल !'

चार्लसनं त्या फोरमनकडे निरखून पाहिलं. पूर्वीची मैत्रीची भावना लुप्त झाली होती आणि आता तो सावध झाला होता.

'माझी मुलगी मिचेली हिला ल्युकेमिया झाल्याचं आज निदान झालंय.'

'अरे रे ! फारच वाईट वाटतं !' नेमकं काय बोलावं हे नॅटला सुचेना.

'वाटायलाच हवं. तुम्ही लोक उरलेलं बेन्झिन नदीत फेकता आणि बेन्झिनमुळं ल्युकेमिया होऊ शकतो !'

'काय बोलतोस ? आम्ही नदीत काहीच टाकत नाही ! कचराकंपनी सगळं घेऊन जाते !'

'हे पहा, बंडला मारू नकोस !'

'भल्या माणसा, आधी तू आपलं काळं तोंड घेऊन बऱ्या बोलानं कारखान्याबाहेर जाशील तर बरं !'

'हा कारखाना मी आता बंद पाडणार आहे समजलं ?'

'चार्लस, तुला काय झालंय ? डोकं तर फिरलं नाही ना ? आम्ही नदीत काहीच टाकत नाही !'

'तो प्रचंड माणूस आहे ना गोंदलेला त्यानं मला अगदी स्पष्टपणं सांगितलय. तेव्हा खोटं बोलू नकोस !'

नॅट आर्चरनं फोनवरून वॅली क्रॅबला ताबडतोब वर यायला सांगितलं. फोन खाली ठेवून तो म्हणाला, 'दोस्ता, आपलं डोकं तपासून घे एकदा ! मध्यरात्री कारखान्यात येतोस काय, बेन्झिन नदीत सोडल्याचं बोलतोस काय, काय झालंय तुला ? तुझ्या पोरीबद्दल मला खरंच वाईट वाटतं; पण तू इथं बेकायदेशीरपणं घुसलायस हेही खरं आहे !'

'हा कारखाना म्हणजे सगळ्या वस्तीवरचं संकट आहे.'

'छान ! पण सगळ्या वस्तीचं मत तुझ्यासारखं नसावं !'

वॅली क्रॅबला आपल्यावरील संकटाचा अंदाज आलाच होता. तो भिऊन दारात उभा होता.

'विली, आपण उरलेलं बेन्झिन नदीत फेकतो असं तू सांगितलंस असं हा म्हणतोय !'

'छः ! ड्रेपर ब्रदर्स इथला सर्व कचरा वगैरे घेऊन जातात असं सांगितलं मी त्याला !'

'डांबीस, लुच्चा !' चार्लस ओरडला.


## जिल्हा कृषि औद्योगिक सेवा सहकारी सोसायटी लि., नासिक

**पूर्वीचे नाव—नासिक जिल्हा सहकारी खरेदी विक्री संघ, नासिक**

देवळाली नाका, नवीन मुंबई—आग्रा रोड
नासिक ४२२ ००१

तार : डिस्ट मार्केट फोन नं. : २५०६, ३२४३

शेतकऱ्यांच्या विकासासाठी प्रयत्नशील असलेली नासिक जिल्ह्यातील नव्हे, तर महाराष्ट्रातील एक अव्वल दर्जाची सहकारी संस्था, सहकारमहर्षी कै. भाऊसाहेब हिरे यांनी स्थापलेली नासिक जिल्ह्यातील जनतेच्या सेवेचे व्रत अंगीकारलेली अग्रगण्य संस्था.

लोखंड, अँगल्स, गज, पत्रे, सिमेंट आणि सिमेंट-पत्रे, खते, अन्नधान्ये, साखर, तेल, व्हिजिटेबल ऑईल, रवा, मैदा, डाळी, कापड यांची विक्री.

चांगदेव मागवत होळकर
चेअरमन

माधव पाटील — जनरल मॅनेजर

भाऊसाहेब पोपटराव खरात — व्हाइस चेअरमन

'शिव्या द्यायचं काम नाही,' चार्लसच्या दिशेनं येत वॅली म्हणाला.

'सबूर!' वॅलीच्या छातीवर हात ठेवत नॅट म्हणाला.

'तूच तर म्हणालास,' संतापानं वॅलीकडे बोट करून चार्लस म्हणाला, 'टाक्या भरून गेल्या की रात्रीच्या वेळी आम्हीच नदीत सोडतो म्हणून. तेच मला हवंय. हा कारखाना बंद केल्याशिवाय राहात नाही मी!'

'शांत हो पाहू,' वॅलीच्या छातीवरील हात काढून चार्लसचा हात धरून नॅटनं त्याला दारापाशी नेलं.

चपळाईनं त्यानं नॅटला बाजूला ढकललं, 'अंगाला हात लावू नकोस माझ्या!' तो ओरडला.

नॅटनं पुन्हा चार्लसला भिंतीपाशी दाबून धरलं आणि तो म्हणाला, 'काय सांगतो ते ऐक. आधी तू इथं परवानगीवाचून आलायस. तेव्हा गडबड न करणं तुझ्याच हिताचं आहे. मात्र पुन्हा आवारात दिसलास तर आत्ताच्या इतकं सोपं राहणार नाही. तेव्हा तू आता लवकर इथून कटावंस हे बरं!'

क्षणभर विचार करून चार्लस शिडीवरून वेगानं उतरला आणि धावत बाहेर आला. गाडीत बसून त्यानं सुसाट गाडी सोडली. बाहेर आल्यावर त्यानं पुन्हा प्रतिज्ञा केली की, 'मिचेलीच्या आजाराचा सूड म्हणून कारखाना मी नष्ट करीन!' अर्थात हे साधायचं कसं त्याला कळेना. घराच्या आवारात गाडी लावून तो तिथंच थांबला.

भलत्या वेळी रीसायकल कंपनीत अशा प्रकारं घुसणं गाढवपणाचं होतं हे त्याला पटलं; 'पण एक तर नक्की की, डोहातलं बेन्झिन तिथूनच येतं हे तरी आपल्याला कळलं. या सगळ्यापेक्षाही मिचेलीची काळजी घेणं जास्त जरुरीचं आहे.' शिवाय शास्त्रज्ञ म्हणून त्याला माहिती होतं की, बेन्झिनमुळं इतर प्राण्यांना ल्युकेमिया होत असला तरी माणसांनाही होतो असं अजून सिद्ध झालं नव्हतं. मिचेलीच्या आजारामुळं त्याचा इतका तोल गेला होता की, आपला राग तो रीसायकल कंपनीवर काढीत होता.

गाडीतून बाहेर येता येता त्यानं विचार केला, आपण गेली काही वर्षं अधिक वेगानं काम करायला हवं होतं. म्हणजे आता मिचेलीसाठी आपल्याला त्याचा उपयोग झाला असता. दरवाज्यात त्याला कॅथरिन भेटली. तिचे डोळे भरून आले होते नि हुंदके आवरत नव्हते.

'काय झालं?' अनामिक भीतीनं त्यानं विचारलं. त्याला मिचेलीबद्दलची शंका आली.

'नॅन्सी शोनहौजरचा फोन आला होता. टॅड आज सकाळी गेला!'

त्यानं कॅथरिनला जवळ घेतलं. प्रथम त्यानं सुटकेचा निश्वास टाकला; पण लगेच त्याच्या लक्षात आलं की, टॅडसुद्धा पॉटोमॅक नदीपाशीच राहात होता. थोडा दूरच!

'मला वाटतं मार्गीला भेटून यावं!' कॅथरिन पुढं म्हणाली, 'खरं तर तिलाच धक्का बसल्यामुळं हॉस्पिटलात ठेवावं लागलंय. मी जायला पाहिजे ना शोनहौजरांच्या घरी? तुला काय वाटतं?'

चार्लसचं लक्षच नव्हतं. बेन्झिननं अप्लास्टिक अनेमियाही होतो आणि ल्युकेमियाही होतो. म्हणजे आता मिचेली आणि टॅडप्रमाणं पॉटोमॅक नदीकाठची किती पोरं बळी पडतील कुणास ठाऊक. त्याचा राग पुन्हा उफाळून आला नि तो कॅथरिनपासून दूर झाला.


## सांगली अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड
## हरभट रोड, सांगली.

( PENSION WITHOUT TENSION )

**– निरंतर योगक्षेम ठेव –**

**एक अभिनव ठेव योजना–**आपण दरमहा कमीत कमी रुपये ५०/–अगर त्याच्या पटीत रक्कम ७१ महिने भरा आणि आयुष्यभर रु. ५०/–अगर त्याचे पटीत रक्कम दरमहा मिळवा.

**किंवा**

आपण दरमहा कमीत कमी रु. ५० अगर त्याच्या पटीत रक्कम ११० महिने भरा आणि आयुष्यभर रु. १०० अगर त्याचे पटीत रक्कम दरमहा मिळवा.

शिवाय वरीलप्रमाणे दरमहा योगक्षेमाची रक्कम चालू झाल्यानंतर ठेवीदाराचे इच्छेनुरूप मध्यंतरी केव्हाही पुढील योगक्षेमाची रक्कम घेण्याचे बंद करून खालीलप्रमाणे एकरकमी भरघोस रक्कम ठेवीदारास अगर त्याचे नेमलेले वारसास मिळेल.

(१) ७१ महिने दरमहा रु. ५० भरलेले असल्यास रु. ५१८५.

(२) ११० महिनेसाठी दरमहा रु. ५० भरलेले असल्यास रु. १००३८.

* बँकेच्या नजीकच्या कोणत्याही शाखेशी आजच संपर्क साधा! *

**पं. भा. टाकवेकर** — कार्यकारी संचालक

**बा. भा. पुजारी** — कार्याध्यक्ष

'मी काय म्हणते.' कॅथरिननं विचारलं. चार्लसनं तेवढ्यात टेलिफोन डिरेक्टरी उचलली. नंबर पाहून त्यानं फोन करायला सुरुवात केली. कॅथरिनला जणू तो विसरूनच गेला होता. 'चार्लस, मी तुला काही तरी विचारतेय !'

त्यानं मान वर करून पाहिलं; पण त्याच्या चेहऱ्यावर उमजल्याचा भाव नव्हता. 'हॅरॉल्ड डॉसन का ?' तेवढ्यात फोन लागल्यामुळं त्यानं विचारलं.

'होय !' मॅनेजरनं सांगितलं.

'मी डॉ. चार्लस मार्टल. मी आत्ताच रीसायकल कंपनीत गेलो होतो !'

'मला नॅट आर्चरनं सांगितलं. तुम्हाला त्रास झाला याचं वाईट वाटतं; पण तुम्ही अशा रीतीनं जाण्यापेक्षा नेमलेल्या वेळात भेट ठरवून गेला असतात तर आम्ही तुम्हाला अधिक चांगली सेवा देऊ शकलो असतो आणि आपली भेटही झाली असती !'

'मला तिथं झालेल्या त्रासाचा इतका राग नाही; पण बेन्झिन-सारख्या धोकादायक वस्तू नदीत टाकल्या जातात त्याचा राग जरूर आहे !'

'आम्ही नदीत काहीच टाकत नाही !' हॅरॉल्ड ठामपणं म्हणाला. 'विषारी रसायनांचे आमचे सर्व रिपोर्ट अद्यावत आहेत EPA कडे आम्ही सर्व कागदपत्रे वेळच्या वेळी सादर करीत असतो !'

चिडून चार्लस म्हणाला, 'नदीच्या पाण्यात बेन्झिन आहे आणि तुमच्याच एका कामगारानं सांगितलं की, ते तुम्ही नदीत सोडता ! बेन्झीन विषारी आहे. माझ्या मुलीला ल्युकेमिया झालाय आणि आमच्या पुढच्याच घरातला एक मुलगा आजच अप्लस्टिक अनेमियानं गेला! हा काही योगायोग नव्हे. तुमचं काम मी बंद पाडणार आहे !'

'हे सर्व असभ्य आणि आचरट आरोप आहेत !' हॅरॉल्ड शांतच होता. 'रीसायकल ही ब्रॉयर केमिकलसची शाखा आहे आणि सामाजिक गरज म्हणून त्यांनी ती चालवली आहे. त्यांना वाटलं तर ते स्वत:च ती बंद करतील !'

'बंद व्हायलाच पाहिजे !' चार्लस ओरडला.

'ह्या गावातल्या एकशेऐंशी कामगारांना तसं वाटत नाही !' आता त्याचाही संयम सुटला. 'महाराज तुम्ही ह्या फंदात पडून उगीचच संकट ओढवून घेताय !'

'मी......' पण पलीकडला फोन बंद झाला होता. तो रिसीवर हलवत राहिला.

कॅथरिननं त्याच्या हातून रिसीवर घेऊन जागेवर ठेवला. तिनं फक्त चार्लसचंच बोलणं ऐकलं होतं. त्याला हाताला धरून जेवणघरातल्या खुर्चीवर बसवलं आणि बोटानं आईला गप्प राहण्याची खूण केली. कारण तेवढ्यात ती आलीच होती.

'मला हे बेन्झिनचं सांगतोस का नीटपणं ?'

'बेन्झिन हे एक विष आहे. अस्थिमज्जा नाहीशी होते किंवा कमी होते !'

'पोटात न जातासुद्धा ?'

'नुसतं हुंगलं तरी पुरतं. थेट रक्तात जातं. छे ! तिकडे खेळ-घर बांधून केवढा गाढवपणा केला मी !'

'त्यामुळंच मिचेलीला ल्युकेमिया झाला असेल असं वाटतं का तुला ?'


## पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळ मर्यादित, पुणे.

### इंजिनियर उद्योजकांसाठी व्याज अनुदान योजना !

**पदवी व पदविकाधारक अभियंत्यांनी स्वत:चा उद्योग सुरू केल्यास त्यांना केंद्र शासनाच्या व्याज अनुदान योजनेनुसार खालील सवलती मिळतात.**

(१) राष्ट्रीकृत बँका या वित्तसंस्थांकडून घेतलेल्या कर्जावर त्या आकारत असलेले व्याज व ७% व्याज ह्यातील फरकाची रक्कम अनुदान म्हणून मिळते.

(२) उद्योग प्रगत भागात काढला असल्यास व्याज-अनुदान सुरुवातीच्या तीन वर्षांसाठी मिळते व अप्रगत भागात काढला असल्यास सुरुवातीच्या पांच वर्षांसाठी मिळते.

(३) व्याज-अनुदान रूपाने दरवर्षी जास्तीत जास्त वीस हजार रुपयांची रक्कम मिळू शकते.

**तपशिलासाठी संपर्क साधा :**

**जिल्हा उद्योगकेंद्रे:**-पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, अहमदनगर, नाशिक, धुळे, जळगाव.

'शंकाच नाही ! किती काळ बिचारी बेन्झिन हुंगत होती देव जाणे ! मिचेलीला झालाय तसला ल्युकेमिया बेन्झिनमुळं होतो. हा काही नुसता योगायोग नव्हे आणि टॅडला अप्लास्टिक अनेमिया झाला तो ?'

'तो पण बेन्झिनमुळंच ?'

'निश्चित !'

'आणि रीसायकल कंपनी, हे बेन्झिन नदीत सोडतात ?'

'तेच तर मी आज शोधून काढलं. त्यांना हे सोपं जाणार नाहीये. कारखाना बंद पाडणार मी !'

'आणि ते कसं ?'

'आत्ता कसं सांगणार ? उद्या EPA शी बोलेन !'

कॅथरिननं चार्लसकडे पाहिलं. तिला डॉ. विली आणि डॉ. काइत्सशी झालेलं बोलणं आठवलं. 'चार्लस, ' तो धीर करून म्हणाली; 'तुझं सगळं मला पटतंय; पण ही वेळ नव्हे !'

'वेळ नव्हे ?' आश्चर्यानं त्यानं विचारलं.

'मिचेलीला ल्युकेमिया झालाय. तिची काळजी घेणं हे आपलं मुख्य लक्ष्य आहे. कारखाना केव्हाही बंद करता येईल; पण आत्ता मिचेलीला तुझी गरज आहे.'

चार्लसनं कॅथरिनकडे टक लावली. हिला कसं समजवावं की मुख्य प्रश्न हाच आहे. मिचेलीच्या आजारावर आता काही उपाय नाही हे, तो डॉक्टर आणि ह्याच विषयाचा संशोधक असल्यानं त्याला कळत होतं. प्रथम पत्नीचा मृत्यू ह्याच कारणानं झाला होता आणि आता मुलगीही त्याच मार्गानं चालली होती हे बाप म्हणून त्याला सहन करवत नव्हतं.


साचा पद्धतीने एका महिन्यात
फाडफाड इंग्रजी बोलायला शिकविणारे
**जगातील पहिलेच प्रचंड लोकप्रिय पुस्तक !**

## कोकाटे हमखास इंग्लिश

**लेखक : महादेव कोकाटे**

- २० महिन्यातील ४ थी आवृत्ती संपत आली सुद्धा.
- किंमत ३० रुपये.
- सवलतीत २० रुपये. सर्वत्र मिळते.
- घरपोचसाठी २५ रु. पाठवा.
- व्ही. पी. नाही.

## श्री स्वाती प्रकाशन

कादंबरी सहवास, वसईरोड,
**जि. ठाणे ४०१ २०२**


हे सर्व तिला कळणं शक्य नव्हतं कळलं असतं तर तिला आताच खचल्यासारखं झालं असतं. तिला न सांगता सर्व काही आपणच सहन करायचं त्यानं ठरवलं खरं; पण तो उन्मळून तिच्या अंगावर पडला.

'काय कठीण दिवस गेला, ' चार्लसला आधार देत ती म्हणाली, 'चल थोडी झोप घे पाहू आता.'

'छे ! मी जरा आधीच वेगानं काम केलं असतं तर...'

¤

अंथरुणावर पडल्या पडल्या मिचेली चार्लस आणि कॅथरिनची वाट पाहात होती. त्यांनी लवकर येऊन आपल्याला घरी घेऊन जावं असं तिला वाटत होतं. आपल्याला काहीच झालं नाही असं सगळी सांगतात, मग हॉस्पिटलमध्ये का ठेवलंय. तिला कळेना.

तिनं उठायचा प्रयत्न केला त्यासरशी तिला उमासे येऊ लागले. हातातलं इंजेक्शन सांभाळत तो बेसिनपाशी गेली; पण उलटी न झाल्यानं कशीबशी परत येऊन निजली.

तिला रात्रभर झोप नव्हती. एकसारखे उमासे तर येतच होते. पोट आणि गुडघे दुखत होते आणि आता तर पुन्हा तापही भरला होता. रात्रभर एकटी असल्यानं ती कंटाळून गेली.

हळूहळू उजाडत होतं. तिची हालचाल पाहून नर्स पुढं आली. तिनं खिडक्या उघडल्या. 'राणी उठली का ?' तिनं विचारलं. मिचेली स्वस्थ राहून तिची हालचाल टिपत होती. तिनं थर्मामीटर काढला, झटकला आणि मिचेलीच्या तोंडात घातला. नर्स गेल्याबरोबर लगेच तिनं थर्मामीटर बाहेर काढला. ताप आल्याचं कुणाला कळू नये असं तिला वाटत होतं. नाही तर आणखी राहावं लागलं असतं ! मात्र थर्मामीटर अगदी तोंडाशी धरून ठेवला.

एक माणूस आत आला. तिनं पटकन् थर्मामीटर तोंडात घातला; पण तो रक्त घेण्यासाठी आला होता. रक्त घेऊन झाल्यावर कापसाचा बोळा दाबून धरायला सांगून तो निघून गेला. एका हातात शिरेतलं इंजेक्शन आणि दुसरा हात मिटून धरलेला. तिला अवघडल्यासारखं झालं.

'पाहू किती ताप आहे ?' नर्सनं आत येऊन विचारलं. तेव्हा कुठं मिचेलीला तोंडात थर्मामीटर असल्याचं आठवलं. थर्मामीटर जागेवर ठेवून नर्सनं तापाची नोंद केली. 'नाश्ता इतक्यात येईलच हं. असं म्हणून ती निघून गेली; पण ताप किती आहे हे तिनं सांगितलंच नाही.

'ओ डॅडी, लवकर या नं. मला कंटाळा आला. धावत या बघू!' मिचेली पुटपुटली.

¤

चार्लसचा खांदा हलवून कॅथरिनन त्याला उठवलं. 'सात वाजले.' हातात कॉफीचा कप घेऊन ती हसत म्हणाली.

'सात ! बाप रे !' अशानं आपल्या कामाला वेग कसा यायचा ? त्यानं विचार केला.

'तुला इतकी छान झोप लागली होती की, उठवायला मन घेईना. चल नाश्ता तयार आहे.' तिचं हसणं खोटं होतं हे त्याला कळत होतं. 'गिनानं मी उठायच्या आधीच सर्व तयार करून ठेवलंय.' गिना अजून आहे हे लक्षात येताच तो त्रासला. कॉफीचा कप हातात घेऊन तो मिचेलीच्या खोलीकडे गेला. दरवाजा उघडून त्यानं

आत डोकावलं. अंथरूण नीट होतं. 'ठीक आहे. तिला मायलोब्लास्टिक ल्युकेमिया झालाय. आता चालू असलेल्या उपायांचा तूर्त तरी उपयोग होऊ दे, इतकीच प्रार्थना आहे.'

नाश्ता करता करता दिवसभराच्या कामाचा तो विचार करू लागला. 'काल कर्कपेशींचं इंजेक्शन दिलेल्या उंदरांची प्रतिकारशक्ती तपासायची. बहुध इतक्या लहान डोसाचा काही उपयोग व्हायचाच नाही. मग आणखी मोठा डोस द्यायचा. नंतर तोच डोस कॅन्सरान दिलेल्या उंदरांना द्यायचा. त्यानंतर आपल्या संशोधनातला मुख्य अडथळा असलेल्या अज्ञात घटकाकडे वळायचं.'

'मग असंच करू या ना?' कॅथरिननं विचारलं.

'काय?' त्यानं काहीच ऐकलं नव्हतं!

'तुझ्या गाडीतून तू मला हॉस्पिटलात सोड. चक स्वत: स्टेशन वॅगन घेऊन जाईल आणि जीन पॉलला सोडील. गिना स्वयंपाकाचं पाहील घरी. जर मला लवकर घरी परतावं लागलं तर मी चकच्या कॉलेजातून वॅगन घेऊन घरी येईन. नाही तर तुझ्याबरोबर येईन. कसं?'

त्याच्या डोक्यात ही सर्व प्रदीर्घ योजना शिरलीच नाही. 'मला चालेल,' शेवटी तो म्हणाला. त्याचं लक्ष चककडे गेलं. त्याला तो म्हणाला, 'काल मला तुझ्या कॉलेजातून फोन आला होता.'

'मीच नंबर दिला,' चक म्हणाला.

'कर्जासाठी बँकेकडे अर्ज दिलाय. ते मंजूर झालं की तुझी फी भरू.'

'छान!' चक म्हणाला.

'छान? हीच तुझी प्रतिक्रिया? पाहिलंस कार्ट काय म्हणतंय?' कॅथरिनकडे वळून त्यानं विचारलं.

'चला, आता निघायला हवं.' कॅथरिननं विषय बदलला.

बाहेर पडताच चार्लस वैतागला, 'हॅट, ती पाण्याची बाटली राहिलीच घ्यायची.' बाटली आणून नीटपणं ठेवून त्यानं गाडी चालू केली. काल आपण इतकं बोलल्यानंतर तरी तो इतर विषय सोडून मिचेलीकडे अधिक लक्ष पुरवील असं कॅथरिनला वाटलं; पण पुन्हा त्याचा लंबक दुसरीकडे गेल्याचं तिला जाणवलं. बरंच काही बोलायचं तिच्या मनात आलं; पण ती चूप राहिली.

'कसं काय वाटतंय तुला?' कॅथरिननं विचारलं.

'का? ठीक आहे की.'

'गप्प, गप्प का? नेहमीसारखा दिसत नाहीस.'

'विचार करतोय?'

'मिचेलीचा?'

'होय आणि कामाचाही.'

'रीसायकल कंपनीचा विचारं नाही ना करत?'

चार्लसनं चमकून तिच्याकडे पाहिलं. पुन्हा रस्त्याकडे पाहात तो म्हणाला, 'थोडासा. ती कंपनी म्हणजे एक सामाजिक आपत्ती आहे असं अजूनही मला वाटतं.'

'चार्लस, तू काही तरी लपवतोयस माझ्यापासून. खरं सांग.'

'छे:! असं का वाटतं तुला?'

'ते नाही सांगता येत; पण मिचेलीचं कळल्यापासून तू इतका दूर गेल्यासारखा वाटतोस. क्षणोक्षणी तुझे भाव बदलत असतात.'

चार्लसच्या चेहऱ्यावर काही प्रतिक्रिया झाली असली तरी तिच्या लक्षात आली नाही.

'डोक्यावर बराच ताण आहे सध्या.'

'मला नाही सांगणार? म्हणून तर मी आहे ना. म्हणून तर मी मुलांचा स्वीकार केलाय ना? तू मला सगळं काही सांगितलं पाहिजेस.'

चार्लसला तिच्याबद्दल पूर्ण विश्वास होता. तरीही सगळं काही तिला सांगता येण्यासारखं नव्हतं. मिचेलीच्या उपचाराचे काय परिणाम होणार आहेत हे, तो डॉक्टर असल्यामुळं त्याला कळत होते; पण कॅथरिनला कळले तर ती खचून जाईल असं त्याला वाटलं.

कॅथरिनच्या हातावर हात ठेवून तो 'पोरांना कल्पना नाही की, आपण किती भाग्यवान आहोत!'

गर्दीच्या रस्त्यावर आल्यानं वेग कमी करावा लागला. कॅथरिन म्हणाली, 'हे अस्थिमज्जा जुळणं वगैरे मला काही माहिती नाही; पण आपण चकवर जबरदस्ती करू नये असं मला वाटतं.' चार्लसनं काही न बोलता तिच्याकडे नुसतं पाहिलं. 'त्याला पटलं की, तो आपसूक तयार होईल.'

चकचा विषय काढला की, त्याचं डोकं फिरत असे. 'अर्थात कॅथरिनचंही बरोबर आहे,' त्याला वाटलं.

'पण त्याला मिचेलीची काही काळजी आहे का? एका शब्दानंही त्यानं विचारलं नाही.'

'पण त्यालाही तिच्याबद्दल वाटतं. सगळ्यांनाच दाखवता येतं असं नाही.'


**अवश्य भेट द्या!**

# KE कमल इलेक्ट्रिक्स

**डेकोरेटर्स अँड कॉन्ट्रॅक्टर्स**

११८४/६, गोकुळनगर

ज्ञानेश्वर पादुका चौक, पुणे ५.

फोन : ५२०२२

**प्रोप्रा.–श्री. कुमकाले**

**आमची वैशिष्ट्ये–**

* हाउस वायरिंग
* मेन्टेनन्स
* सेल्स अँड सर्व्हिस

टेलिव्हिजन, रेडिओ, फॅन, इस्त्री, टू इन् वन्, गिझर, बॉयलर, बल्ब, ट्यूब इत्यादि.

कुत्सितपणं चार्लस हसला, 'पक्का स्वार्थी आहे. त्याच्या फीकरता कर्ज काढल्याचं सांगितल्यावर कसा खूष झाला होता पाहिलंस ना?'

'पण फी तर खरं म्हणजे गेल्याच महिन्यात भरायला हवी होती ना?'

'छान! तुम्ही त्या हरामखोराचीच बाजू घ्या.'

हे आपण बोलायला नको होतं असं तिला वाटलं. तिनं त्याच्या खांद्यावर हात ठेवून म्हटलं, 'मी उगीच फीचं तसं बोलले; पण चक तुझ्यासारखा नाही हे तू लक्षात घ्यायला हवंस. तरीही मुळात तो चांगलाच आहे.'

क्षणभरानं ती पुन्हा म्हणाली, 'तुला कल्पना आहे की नाही कुणास ठाऊक; पण तुझ्याशी वागणंसुद्धा इतरांना जड जातं. तुझ्या यशामुळं तू अतिशय कठीण स्वभावाचा झालायस.' चार्लसला ते पटलं नाही. मात्र त्यानं कोणतीही प्रतिक्रिया दाखवली नाही.

'पण काही म्हण. कार्ट अगदी पक्कं आपमतलबी आहे. मिचेलीचं कळल्यावर तो असाच वागणार हे उघड होतं.'

'तरीसुद्धा हा काही आपल्या चिंतेचा मुख्य मुद्दा नाहीये,' शेवटी कॅथरिन म्हणाली.

'ठीक आहे. त्याच्यावर मी सक्ती करणार; पण त्यानं कबूल होईतो त्याच्या फीचा पुढचा हप्ताही भरणार नाही मग.'

कॅथरिननं सुस्कारा सोडला. 'ही सक्ती नव्हे तर काय?'

हॉस्पिटल एव्हाना पेशंटांनी भरून गेलं होतं. गर्दीमधून वाट काढणं मोठं कष्टाचं झालं होतं. सहाव्या मजल्यावर नर्सेसच्या खोलीशी आल्यावर तो म्हणाला, 'माफ करा. मी डॉ. मार्टल. माझ्या मुलीवरच्या उपचारांना सुरुवात केली का?' प्रयत्नानं आवाज स्थिर ठेवून तो म्हणाला.

'मला वाटतं झालीय; पण पाहून नक्की काय ते सांगते!'

शेजारच्या लिपिकाने हे ऐकताच चार्ट काढून दिला.

'काल तिला डॉनोरुबीसीन दिलं. आता सकाळी थायोग्वानाईन दिलं आणि दुपारी सिट्राबीन द्यायचंय.'

ह्या औषधांचे दुष्परिणाम चार्लसला माहिती असल्यामुळं नावं ऐकताच त्याच्या हृदयाचा ठोका चुकला.

'औषधांचा उपयोग तरी होऊ दे,' तो स्वतःशीच म्हणाला.

नर्सला धन्यवाद देऊन तो मिचेलीच्या खोलीकडे वळला. जसा जवळ जवळ येऊ लागला तसा त्याचा धीर खचत गेला.

'इथं छान छान चित्रं लावलेयायत ते चांगलं झालंय नाही?' कॅथरिन म्हणाली.

दरवाज्याच्या बाहेर चार्लस क्षणभर उभा राहिला आणि त्यानं धीर गोळा केला.

'अरे हीच खोली,' कॅथरीन म्हणाली. तिला वाटलं तो खोली विसरला.

मिचेलीला बसती केली होती. चार्लस दिसताच तिला रडू कोसळलं. त्यालाही धक्का बसला. तिची अवस्था अधिकच वाईट दिसत होती. नुकतीच तिला उलटी झाली असावी असं खोलीत भरलेल्या आंबूस वासावरून कळून येत होतं.

धावत जाऊन तिला पटकन उचलून घ्यावं असं त्याला वाटलं. तिनंही हात पुढं केले होते; पण तो थबकला.

तिचा रोग जबरदस्त होता नि इलिझाबेथप्रमाणंच मिचेलीलाही आपण काही सुद्धा मदत करू शकणार नाही हे उघड होतं. कुठल्याही उपचारांचा उपयोग होणार नाही याचं ज्ञान असल्यामुळंच तो थबकला.

कॅथरिनला त्याच्या या वागण्याचा उलगडा झाला नाही; पण तिनं पुढं जाऊन मिचेलीला जवळ घेतलं. तिच्या खांद्यावरून मिचेलीनं चार्लसच्या डोळ्याकडे पाहिलं. तिची खात्रीच झाली की डॅडी आपल्यावर रागावलेत.

'कित्ती बरं वाटलं तुला पाहून. कशी आहेस तू आता!'

अश्रू आवरत ती म्हणाली, 'मी आता बरी आहे. मला घरी यायचंय. डॅडी मी घरी येऊ?'

चार्लसचे पाय लटपटले. कॉटच्या आधारानं तो उभा होता म्हणून. 'बघू या,' त्यानं प्रश्न उडवून लावला; पण त्याला वाटलं, तिला हॉस्पिटलमधून घेऊन जायलाच हवं. तेच अधिक चांगलं.

'मिचेली, तुला चांगलं बरं वाटेतो, तू हॉस्पिटलमध्ये राहायला हवंस,' कॅथरिन लगबगीनं म्हणाली. 'डॉ. विली आणि डॉ. काइत्समान तू लवकर बरी व्हावीस म्हणून धडपडताहेत. आम्हालाही तू नसल्यानं कंटाळा येतो; पण तू शहाण्यासारखी वागणार ना?'

'डॅडी', मिचेली म्हणाली.

तो काहीच बोलला नाही.

'मिचेली, तुला हॉस्पिटलमध्ये राहायला हवंच!'

'का पण? डॅडी. मला काय झालंय?'


हार्दिक शुभेच्छा

## पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, मर्यादित, पुणे २

**मुख्य कार्यालय : ८५५, बुधवार पेठ, लक्ष्मीमार्ग, पुणे–४११ ००२**

**दूरध्वनी : ४४५९१५/१६/१७ तारेचा पत्ता : 'सेन्को बँक'**

**– आमची वैशिष्टचे –**

* पुणे जिल्ह्यात एकूण १३४ शाखांचा विस्तार.
* चालू, बचत, आवर्तक याशिवाय मुदतठेव, आपोआप मुदतवाढ, मासिक उत्पन्न–ठेव, शिक्षण–ठेव या बचतीच्या आकर्षक फलदायी योजना.
* पुनर्गुंतवणूक ठेव–योजना अर्थात दामदुप्पट ठेव–योजना.
* व्याजाचा आकर्षक दर. * बँकिंगच्या सर्व सुविधा.
* सोनेतारण कर्ज-व्यवहाराची सोय.
* मुख्य कचेरीसह ११८ शाखा.

| य. अ. प्रधान | कि. श्री. टेमगिरे | र. शं. सातकर |
|---|---|---|
| व्यवस्थापक | उपाध्यक्ष | अध्यक्ष |

चार्लस गप्प राहिला.

'माझ्या खऱ्या आईला झालं होतं तेच दुखणं झालंय का ?'

'छे: ! छे: !' घाई घाईनं तो म्हणाला. 'मुळीच नाही.' अर्थात हे अर्धसत्य होतं. कारण इलिझाबेथला जरी लिम्फोमा झाला होता तरी शेवटी ती ल्युकेमियानंच गेली होती. त्याला काही सुचेना.

'मग काय ते सांगा', मिचेलीनं आग्रह धरला.

'ते शोधून काढण्यासाठीच तर तुला हॉस्पिटलात ठेवलंय. कॅथरिन तुझ्याजवळ सोबत राहील – हं. मला आता प्रयोगशाळेत जायला हवं.'

तेवढ्यात मिचेलीला जबरदस्त अशी उलटी झाली. तिनं जे काय थोडं फार खाल्लं होतं तेही एकदम उलटून पडलं. चार्लस ताबडतोब बाहेर धावला आणि त्यानं नर्सला पाचारण केलं.

'तू मुळीसुद्धा काळजी करू नकोस राणी', नर्स म्हणाली. 'आपण आत्तांच सगळं स्वच्छ करून टाकू हं.'

चार्लसनं मिचेलीच्या कपाळाला हात लावला तेव्हा त्याला चटका बसला. औषधांमुळंच उलटी झाली हे त्याच्या लक्षात आलं होतं. त्यामुळं त्याची चिंता जास्तच वाढली.

मिचेलीनं त्याचा हात धरून पाहिलं; पण त्याच्या डोळ्यात आश्वासनाऐवजी चीड दिसल्यामुळं निराशेनं तिनं हात सोडला.

औषधांचे दुष्परिणाम सुरू झाले हे लक्षात येऊन त्यानं नर्सला म्हटलं, 'उलटी येऊ नये यासाठी तिला काही दिलं होतं का ?'

'तर, तशी सूचनाच आहे. कॉम्पॅझिन PRN आणतेच मी आता.'

'म्हणजे सुई का ?' मिचेलीनं विचारलं.

'नाही, गोळी आहे. अर्थात ती तरी तुझ्या पोटात टिकली पाहिजे नाही तर खालून द्यावी लागेल.'

'मी जरा चार्लसबरोबर लिफ्टपर्यंत जाते हं,' कॅथरिन म्हणाली.

बाहेर आल्या आल्याच तिनं चार्लसचा हात पकडून म्हटलं, 'चार्लस, तुला काय झालंय ?' चार्लस चालतच राहिला.

'चार्लस !' ती ओरडली आणि त्याच्यापुढं जाऊन उभी राहिली, 'काय झालंय ?'

'मिचेलीचे हाल मला पाहवत नाहीत. काय करावं समजत नाही. ती औषधं देणं बरोबर आहे असं मला मुळीच वाटत नाही.'

'औषधं द्यायची नाहीत ?' तिला आठवलं. डॉ. विली आणि डॉ. काइत्समान यानी शंका व्यक्त केलीच होती की चार्लस एखादेवेळी मिचेलीच्या औषधयोजनेत व्यत्यय आणील म्हणून.

'तिला उलटी झाली ती कशामुळं माहितीय ?' चार्लस रागानं म्हणाला. 'ही नुसती सुरुवात आहे.' एकदम तो बोलायचा थांबला. आपण आणखी काही बोललो तर तिची उरली सुरली आशासुद्धा नष्ट होईल, त्याला वाटलं.

'पण औषधं तर द्यायलाच हवीत'. तिनं विनवलं.

'मी आता जातो, उशीर झालाय. लागलं तर लगेच फोन कर. मी प्रयोगशाळेतच आहे.'

डॉ. विली तिला म्हणाले होते की, आमची तुझ्यावर भिस्त आहे. आता तिला त्याचा अर्थ कळू लागला.

(क्रमशः)



*With Best Compliments*

*From*

# THE LAXMI VISHNU TEXTILE MILLS LTD.

**199, Churchgate Reclamation,**
**BOMBAY - 400 020**

**Phone : 22 08 87 / 22 09 12**

**Gram : SPINSTER**
**Bombay-400 020**

# माणुसकीचा झरा

आपल्या संपूर्ण देशाला सध्या भेडसावणारा एक महत्त्वाचा प्रश्न... बेरोजगारीचा.

कृषिविकास, ग्रामसुधार योजना इत्यादींसारख्या देशाच्या महत्त्वपूर्ण उपक्रमात सक्रिय सहभाग घेणारी महाबँक याही आघाडीवर मागे नाही. महाबँकेचा माणुसकीचा झरा या क्षेत्रात असे चैतन्य आणीत आहे –

होतकरू तरुणांना स्वतःचा स्वतंत्र व्यवसाय उभा करता यावा यासाठी महाबँकेने हाती घेतलेले उपक्रम –

- मार्गदर्शक मेळाव्यांचे आयोजन.
- आठशेचेवर नमुना प्रकल्प अहवाल बँकेच्या सर्व विभागीय कचेऱ्यांत उपलब्ध.
- प्रकल्प अहवाल तयार करावयास लागणारी मदतही उपलब्ध.
- नवीन व्यवसाय सुरू करणाऱ्यांसाठी मदत करणाऱ्या अन्य संबंधित संस्थांचा समन्वय

  आणि
- कर्जरूपाने आर्थिक मदत.

**आपल्या आशा-आकांक्षांना सुफलित स्वरूप देणारी बँक....महाबँक**





**बँक ऑफ महाराष्ट्र**

[ भारत सरकारचा उपक्रम ]

मुख्य कचेरी : " लोकमंगल " १५०१, शिवाजीनगर, पुणे – ४११ ००५